|| ॐ ||

आचार्य म्हणजे एकत्व। आचार्य म्हणजे अभेदत्व।
आचार्य म्हणजे समानत्व। आचार्य म्हणजे साक्षात्ज्ञान ||

मुखिच्या सदा जयजयकार। आत्मतेजाचा जणू सागर।
वंदिले मी आदि शंकर। कलियुगातील ज्ञानावतार ||

© www.madhaveeraghuveer.com

MADHAVEE R. JOSHI
Phone 020 25386964
9373366611

# श्री शंकराचार्य वंदना

श्रुतिस्मृतिपुराणानामालयं करुणालयम् ।
नमामि भगवत्पादं शंकरं लोकशंकरम् ॥

शंकरं शंकराचार्यं केशवं बादरायणम् ।
सूत्रभाष्यकृतौ वन्दे भगवन्तौ पुनः पुनः ॥

---

निर्मला गणेश जोशी विरचित

- श्री आदिशंकर लीलामृत -

श्रीमद् जगद्गुरु श्रीमद् आद्यशंकराचार्य
यांचे पोथी चरित्र

---

© www.madhaveeraghuveer.com

ॐ

# अध्याय पहिला

अथ प्रारम्भः।

श्री गणेशाय नमः। श्री सरस्वत्यै नमः। श्री गुरुभ्यो नमः।
श्री रामेश्वराय नमः। श्री मातृपितृभ्यां नमः॥

ॐ नमो श्री गणराया। भावे वंदिते तुमचे पाया।
अल्पमती मी यावे सहाय्या। प्रार्थिते मी पुनः पुन्हा॥१॥

कैसे वर्णू रूप मोहक। हाती शोभतो छान मोदक।
लाभता तुष्टती सर्व साधक। सहज पावती मुक्तीस॥

अनाथांचे तुम्हीच नाथ। स्वभक्तांसी तारावयास।
मारिले दुष्ट असुरास। तुम्हीच देवा विनायका॥३॥

काळाचाही जो महाकाळ। शिवपार्वतीचा सुंदर बाळ।
अर्पुनी त्यासी चिंतनमाळ। प्रार्थिते द्या लेखनबळ॥४॥

आता वंदिते श्री शारदा। जिच्या कृपे लाभे संपदा।
लयास जाई अज्ञान विपदा। होतसे चांडाळही वक्ता॥५॥

आई मी तर हीन दीन। सांग तुझिया कृपेवीण।
कोण हरिल माझा शीण। कैसी सद्गती तुजवीण॥६॥

पूजार्चन मी काही न जाणी। ठेविते माथा भावे चरणी।
सर्वस्वाची तू आई भवानी। सिद्ध करी गे लेखणी॥

जगद्गुरु श्री आदिशंकरा। वर्णिते आपुल्या अवतारा।
अल्प ही कामना पूर्ण करा। वंदिते द्या आधारा॥८॥

आपण साक्षात ज्ञानावतार। मजसि नाही काही अधिकार।
संकल्प उठे परी वारंवार। मनी लीलामृत रचण्याचा॥९॥

© www.madhaveeraghuveer.com

आपण रचिली स्तोत्रे अपार। शब्दसौंदर्याचे ते भांडार।
मजलागी होऊनि कोठार। पुरविले सामग्री लेखनाची।।१०

चरित्र लिहिणे भावपूर्ण। आद्य श्री आपुले अर्थपूर्ण।
म्हणुनी आले सर्वस्वी शरण। प्रार्थिते द्या आशीर्वचा।।११।।

भाविक विद्वान श्रोतृगण। अधीरपणे करता श्रवण।
जरी लेखकु मी अजाण। घ्यावे लेकीस सांभाळून।।१२।।
सरस्वती माझी माता थोर। देई सर्वांसी सदा शिकवण।
स्वतः आचरुनि शुद्धाचरण। परमार्थाचा आधार।।१३।।

माझा पिता नामे गणेश। भाषा इतिहासादि विषयांचे तज्ञ।
कोणतेही अपत्य न रहावे अज्ञ। यालागी सदा सावध।।१४।।
ऐसी मातापिता लाभली थोर। कन्या म्हणुनि न करता अव्हेर।
सर्वतोपरी देऊन आधार। घडविले माझे जीवन।।१५।।

जरी दोघे झाले देवासी प्रिय। घडी घडी त्यांचे स्मरण।
मनोमनी वंदुनि त्यांचे चरण। प्रार्थिते द्या आशीर्वाद।।१६।।
सत्य संकल्पाचा जो दाता। आदिनारायण सर्व कर्ता।
जोगकुलोत्पन्न दत्तात्रेया। माहिबिबुद्धीचा मी तव शिष्य।।१७

आचार्यभक्ती तुमची थोर। शिष्यांवरी अनंत उपकार।
शिकविले तुम्ही वेदांतसार। आणि भगवद्गीता सभाष्य।।१८
पदवी आपुली उपनिषदतीर्थ। वेदांताचे निरुपण यथार्थ।
तेणे जीवनी झाला कृतार्थ। स्मृतिवंदन हे आरंभाला।।१९।।

आद्य श्री शंकरांचे चरित्र। वर्णाविया मी नाही पात्र।
परी पंगुने लंघावा पर्वत। मिळो दैवाची साथ पूर्ण।।
मायबाप गुरु परमेश्वर। करिती माझे प्रेमे कवतुक।
बाळे होऊ नको अगतिक। उचल लेखणी श्रद्धाभावे।।

~~अचल~~ ~~लेखणी~~ श्रध्देचे स्थान वैदिक धर्म
नरजन्माचे जो सांगे मर्म। त्याचे रक्षक शंकराचार्य
नेवोत पूर्णत्वा संकल्प।।२२।।

© www.madhaveeraghuveer.com

श्री विष्णूचे दशावतार। दुष्टांचे करण्या निर्दालन।
साधुसज्जनांचे परिपालन। म्हणुनि म्हणती स्थितिकर्ता॥२३॥
द्वैताचे अंगी बुद्धावतार। राजादि शिष्यांचा परिवार।
करिती सरसहा संहार। वेदांतधर्माचा अज्ञाने॥२४॥

जागविण्या तो वेदांतधर्म। आदि गुरु श्री महेश्वर।
व्यास शंकर नि ज्ञानेश्वर। रुपे प्रकटले अवनीवर॥२५॥
वैदिक धर्माच्या या भूमिवरी। पाखंडी मातोनि पृथ्वीवरी।
वेदपुराणोक्त कर्मे सारी। नष्ट करण्या सरसावले॥२६॥

जैन मुनींचे मत आगळे। सर्वत्र जणू पसरु लागले॥
तेणे योगे वर्ण सगळे। झाले मूढमति किं कर्तव्य॥२७॥
त्या मतांचे करण्या खंडन। शंकर नामे अति सुंदर।
धारण केला अवतार। साक्षात शंभु महादेवे॥२८॥

सर्व भेदांचा करुनि लय। शास्त्राधारे साधुनि समन्वय।
अद्वैत प्रतिष्ठापनेचे ध्येय। नेले श्रीशंकरे सिद्धीस॥२९॥
आदि शंकराची एकता कथा। जाणेल श्रोता अद्वैत तत्वा।
अथवा जीवन्मुक्ती सर्वथा। अधिकारानुरुप पावेल॥३०॥

मनातील द्वैताचा करिता नाश। कळेल प्रत्येका स्वरुप।
सच्चिदानंद मी शिवरुप। आत्मविश्वास प्रकटेल॥३१॥
भेदबुद्धी म्हणजे अज्ञान। अद्वैत भान हेचि ज्ञान।
वेदांताचे तत्व महान। माणुसकीचा धर्म सुंदर॥३२॥

चारी वेदांची वाक्ये चार। सांगति गर्जुनि तत्व थोर।
उपाधीस विसरता पार। जीव+शिव ऐक्य उमजेल॥३३
शांकर रचनांचे करता पठण। सहज कळते तत्वज्ञान।
प्राप्त करण्या आत्मज्ञान। चित्तशुद्धि हे आद्यकर्म॥३४

चित्तशुद्धिचे सोपे साधन। सदा वंदावे संत सज्जन।
गावे आदरे गुणगान। अथवा करावे चरित्र श्रवण॥३५

©www.madhaveeraghuveer.com

आदि शंकराचे लीलाचरित्र। देईल सुख इह परत्र।
रोमहर्षित होतील गात्र। श्रवण करिता आदरे ॥३६॥
खंडप्रायसा भारत देश। केरळ नामे प्रांत विशेष।
कालडी ग्राम निवडे ईश। जन्मे होऊनि आदि शंकर ॥३७॥

पूर्णा अथवा अलवाई। नदी वाहे धाई धाई।
आंबे नारळ पोफळादि। फोफावले वृक्ष काठावरी ॥३८॥
त्या गावी थोर द्विज चुडामणी। शिवगुरु नंबुद्रि ब्राह्मण।
पतीपत्नीचे शुद्धाचरण। सर्वांसी करी आकृष्ट ॥३९॥

पत्नी विशिष्टादेवीसहित। सदा राहती धर्मरत।
परमेश्वराचे पूजन अविरत। करिती दोघेही आनंदे ॥४०॥
ब्राह्मण वर्णाचे विहित कर्म। अध्ययन आणि अध्यापन।
अत्यादरे करिती पालन। मनी सदा संतुष्ट ॥४१॥

हळूहळू वार्धक्य दिसू लागे। परि पोटी अपत्य नुपजे।
तेचि कारणे दुःख उपजे। विशिष्टादेवींच्या मनात ॥४२॥
पत्नीस देखिता असंतुष्ट। गृहस्थाश्रमाचे मर्म नष्ट।
शिवगुरु जाणुनि स्पष्ट। उपाय शोधू लागले ॥४३॥

कैसे झाले दुःख दूर। तपाचरणाचा कोणता स्तर।
शिवगुरु छेडती हृदवीणेवर। जाणावे पुढील अध्यायी ॥
इति श्री आदि शंकर लीलामृत। पहिला अध्याय समाप्त।
कृपा व्हावी सदा प्राप्त। करण्या ग्रंथ पूर्ण सार्थ ॥

शुभं भवतु। शुभं भवतु। शुभं भवतु॥

४.४.२०१६

© www.madhaveeraghuveer.com

|| ॐ ||

५

# अध्याय दुसरा

जगद्गुरु श्री आदिशंकरा । वर्णावे आपुल्या अवतारा ।
अल्प ही कामना पूर्ण करा । वंदिते द्या आधारा ॥१॥

प्रथमाध्यायी करुनि वंदन । ज्ञानावताराचा हेतू मूळ ।
वर्णिले आचार्यांचे कूळ । लीलामृताचा शुभारंभ ॥ २॥

साकारला भूमीवरी महेश । करावया वेदांताचे मंडन ।
आणि नास्तिकांचे खंडन । केरळ प्रांती कालडी गावी ॥३॥

शिवगुरु नम्बुद्री ब्राह्मण । वेदांती ठेवून श्रद्धा पूर्ण ।
आश्रम धर्माचे आचरण । मनी इच्छा ब्रह्मचर्येची ॥ ४॥

परी पिता विद्याधर । एकुलत्या पुत्रावर सारा भार ।
सांगे करी रे संसार । चालविण्या पुढे वंश थोरा ॥५॥

पित्यास द्यावे समाधान । हाच पुत्राचा सदाचार ।
शिवगुरु करिती स्वीकार । गृहस्थाश्रमी जाण्याचा ॥ ६॥

विशिष्टादेवी नामे पत्नी । आर्याम्बाही तिजसी म्हणती ।
पतीसमवेत सदा राही । प्रसन्नचित्त समाधानी ॥७॥

पुत्रस्नुषेचे आनंदी जीवन । देई विद्याधरा समाधान ।
परी काळाचे येता निमंत्रण । झाले विद्याधरांचे निधन ॥

देवोत्तर संपत्ती झाली प्राप्त । शिवगुरूंवर पडला भार ।
गुरुकुलाचा वाढता विस्तार । आर्याम्बेची साथ पूर्ण ॥९॥

संपली वर्षे वर्षामागून । संसारी दिसे एक न्यून ।
वाटे नाही होणार संतान । आर्याम्बा काहीशी मनी खिन्न ॥
ब्रह्मचर्येची मनी ओढ । नेणे शिवगुरुसी नाही दुःख ।
पत्नीस द्यावे कैसे सुख । हेचि चिंता मनासी जाळी ॥१०

गृहस्थाश्रमाचा नियम। परस्परांचे राखावे मन।
जाणती पूर्ण मनोमन। शिवगुरु तैसी आर्याम्बा॥७२

शिवगुरुंचा योग्य विचार। पत्नीचे मनातील शल्य।
काढोनि स्थापावे मांगल्य। कामनाव्रत आता अपरिहार्य॥

शास्त्रावरती निष्ठा थोर। सर्व श्रमाचा तेणे अंत।
वध्यत्वाची ना जावी खंत। शिवगुरुसी एकही क्षण॥७

होवो न होवो पुत्र। ऐशा त्रुटी लहानथोर।
आत्मज्ञानास नाही अडसर। हाच खरा वेदांतधर्म॥७५॥

शिवगुरुंनी सोडिला संकल्प। पत्नीचे राखावया मन।
स्वीकारिले घोर अनुष्ठान। चंद्रमौलिश्वर पूजनाचे॥

गावाजवळ वृष पर्वत। तेथे मंदीर सुंदर शांत।
चंद्रमौलिश्वर सदा जागृत। तपस्येसाठी निवडीले॥७६॥

पतीचे जाणून मनोगत। आर्याम्बा शिवगुरु समवेत।
सहाय्य करण्या अनुष्ठानात। जाऊन राही मंदिरात॥७८॥

संसारी जे घडे समोर। अनुकूल वा प्रतिकूल।
रक्षिण्या आपुले घरकुल। पतिपत्नी हवेत समचित्त॥

आहाराचे करुनि नियमन। कंदमुळे शाक खाऊन।
अहोरात्र महेशाचे पूजन। दोघे करिती श्रध्दाभावे॥

पुढे पुढे तेही वर्ज्य। चरणामृत मात्र सेवून।
जप तप शिवाचे अर्चन। करिती मनापासून।
कष्टमय साधना वर्षभराची। शरीरे वाळली दोघांची॥
प्रभा फाके आत्मतेजाची। दिसती दोघे तेजःपुंज॥

© www.madhaveeraghuveer.com

चंद्रमौलीश्वर होई प्रसन्न। शिवगुरूंना देई स्वप्नी दर्शन।
अष्टसात्त्विक भाव झाले उत्पन्न। दिसता कर्पूरगौर सदाशिव॥

हसुनि बोले भक्तास। झालो मी पूर्ण प्रसन्न।
माग हवे ते वरदान। जीवनी जे वांछिसी॥२४॥

शिवगुरू गेले भांबावून। भाग्याचा तो सुवर्णक्षण।
धरूनि महेशाचे दृढचरण। मागणे मागति विनम्रपणे॥२५

देवा तुम्ही तर सर्व जाणता। तरिही मजसि का विचारता।
पत्नीस गांजे नित्य चिंता। संतानप्राप्ति ना आजवरी॥

सर्वज्ञ आणि दीर्घायु पुत्र। हीच वासना मनी धरून।
केले दोघांनी अनुष्ठान। कामना करावी देवा पूर्ण॥२७

भक्ता तुमची तपस्या थोर। प्रसन्न मी तुम्हा दोघांवर।
परी निश्चये मागे पुत्रवर। दीर्घायु अथवा सर्वज्ञ॥२८॥

विनम्र नम्र भाव धरून। शिवगुरूंचा निश्चय विवेकपूर्ण।
वेदांतधर्माचे करण्या रक्षण। मागती पुत्र सर्वज्ञ॥२९॥

वरमेको गुणी पुत्रो। ध्यानात आणुनि सुंदर सूत्र।
सुभाषिताचे जाणोनि मर्म। मागति शिवगुरू वरदान॥३०

कैसे शिवगुरूंचे मागणे। विवेकबुध्दीचे अपूर्व लेणे।
निःश्रेयस हित ते साधणे। सर्वज्ञ पुत्राकरवी आता॥

महेश्वरही मोहित झाला। शिवगुरूकुलाचा लोभ जडला।
मनी निश्चय पूर्ण केला। जन्मावे आर्याम्बेच्या उदरी॥
आश्वासुनि शिवगुरूंना। आदेश दिधला घरी जाण्या।
कष्टमय तप थांबविण्या। चंद्रमौलीश्वरे स्वतः॥

म्हणे तुम्हा हवा सर्वज्ञ। तरी मीच पोटी येईन।
मनोरथ पूर्ण करीन। आनंद भरीन संसारी॥

शिवगुरु झाले जागृत। पूर्ण शरीर रोमांचित।
आर्याम्बेस उठवूनि सांगत। तप झाले आपुले पूर्ण॥

येतील पोटी साक्षात शंकर। सर्वज्ञ तो ज्ञानावतार।
सुफलित आपुला संसार। होईल आता निश्चये॥

आर्याम्बा होऊनि सद्गदित। शिवगुरुसी वारंवार पुसत।
का न घडले मज दर्शन। कसे संपवू अनुष्ठान॥

शिवगुरु तिजसी समजावित। शंका नको निष्कारण।
पूर्णत्वा गेले तपाचरण। येईल पोटी उमारमण॥

सुखे परतले आपुल्या घरा। अखंड ध्याती शिवशंकरा।
अन्य विचारा नाही थारा। दोघे झाले शिवमय॥

आधीच पतीपत्नीचे मनोमीलन। त्यात भगवंताचे वरदान।
दिसू लागले स्पष्ट लक्षण। आर्याम्बा झाली गरोदर॥

आनंद तर गगनी मावेना। भावना कोणा आवरेना।
नित्य करिती रुद्रावर्तना। भक्तीचा दाटे महापूर॥

साक्षात श्री दक्षिणावतार। कैसा प्रकटला भूतलावर।
चरित्र रसाळ सुंदर। जाणावे पुढील अध्यायी॥२४॥

इति श्री आदिशंकर लीलामृत। दुसरा अध्याय समाप्त।
कृपा व्हावी सदा प्राप्त। करण्या ग्रंथ पूर्णत्वार्थ॥

शुभं भवतु। शुभं भवतु। शुभं भवतु॥

५.४.२०१६

© www.madhaveeraghuveer.com

॥ ॐ ॥

# अध्याय तिसरा

जगद्गुरु श्री आदिशंकरा। वर्णिवे आपुल्या अवतारा।
अल्प ही कामना पूर्ण करा। वंदिते घ्या आधारा॥१॥

शिवगुरु आर्याम्बेचे अनुष्ठान। शिवाने केली कामना पूर्ण॥
कैसे फळले तपाचरण। वर्णिले द्वितीय अध्यायी॥२॥

अगणित भक्तांचे चार प्रकार। आर्त जिज्ञासू अर्थार्थी ज्ञानी।
त्यातही श्रेष्ठ भक्त ज्ञानी। निर्णय हा भगवंताचा॥३॥

ज्ञानी नव्हे शास्त्री ना पंडित। ब्रह्मज्ञानाने ज्ञानी मंडित।
दावी जनासी मार्ग जो निश्चित। आपुले निजरूप जाणण्याचा।

ज्ञानमार्गाचा आदि गुरु। श्री शिवशंकर जगद्गुरु।
दाक्षिण देशी घेई अवतारु। तोचि श्री दक्षिणामूर्ती॥५॥

आदि नारायण तोचि शंकर। ब्रह्मदेव वसिष्ठ शक्ती पराशर।
व्यास शुक गौडपाद। शिष्य परंपरा क्रमे मानिती॥६॥

गौडपादांचे शिष्य गोविंदयती। नर्मदाकाठी वेदांसी जपती।
अधीरपणे वाट पाहती। सत्‌शिष्य केव्हा भेटेल?॥७॥

वेदांताची परंपरा थोर। वाटे जणु होईल लुप्त।
म्हणुनि तिजला ठेवुनि गुप्त। कोणी पाहती सांभाळू॥

तेणे लोक झाले वंचित। निर्माण झाले पंथोपपंथ।
भेदांना ना उरला अंत। रूढी माजल्या अतोनात॥९॥

सुज्ञ करिती मनी खंत। केव्हा येईल भगवंत।
पुनरपि स्थापेल वेदांत। करुनि सर्वांचा समन्वय॥१०॥

© www.madhaveeragjuveer.com

जेव्हा येणे तेव्हा यावा। मूळ ग्रंथाचा त्या लाभ व्हावा।
पोथी ग्रंथाचा जपाने ठेवा। गोविंदयती अति आदरे॥

व्यास मुनी तर चिरंजीव। वास त्यांचा असे सर्वत्र।
परी निवडिले बदरीक्षेत्र। वैदिक धर्माचे आश्रयस्थाना॥

कुमारिल भट्टांचे कार्य थोर। जैन मतांचे करुनि खंडन।
मीमांसक तत्वाचे यथार्थ मंडन। यज्ञसंस्था केली प्रतिष्ठित॥

आपापल्या परी निष्ठापूर्वक। प्रयत्न करिती सर्व साधक।
होऊनि वैदिक धर्माचे रक्षक। वाट पाहती अवताराची॥

नव्हता मोठा राजाश्रय। कैसी व्हावी साधकांची सोय।
जनांस कळेना करावे काय। कोण टिकवेल परंपरा॥ १५॥

अवतारापूर्वीची ही स्थिती। गुंग होई सर्वांची मति।
परी मनी जाणती वेदांती। अवतरेल जगद्गुरु॥ १६॥

निर्गुणासी होणे सगुण। ज्ञानाज्ञानापल्याडचे तेज।
साकार होण्यास्तव अधीर। अवतारार्थ शोधी उपाधी॥

शिवगुरु आर्याम्बेचे शुद्धचित्त। कैलासपती झाला मोहित।
दोघांचे शुभ मीलनात। प्रवेशला जीवरूपे॥ १८॥

आर्याम्बेस झाली जाणीव। उदरात वाढतो गर्भ कोणी।
प्रसन्न झाला शूलपाणी। शिवगुरु जाणती मनोमनी॥

प्रकटेल साक्षात शंकर। जीवमात्रासि कल्याणकर।
दुःखाचा करुनि परिहार। शाश्वत सुख देईल॥

© www.madhaveeraghuveer.com

नवमास भरले पूर्ण। रात्रंदिन शिवाचे स्मरण।
वैशाख शुध्द पंचमीचा दिन। मध्यान्ही पुत्र प्रसवला॥२१॥

मध्यान्हीचा प्रखर सूर्य। शिवगुरुंच्या पवित्र कुटीत।
आर्याम्बेच्या स्निग्ध कुशीत। प्रसन्नतेने हासला॥२२॥

शिवगुरु पाहती न्याहाळून। शिरी चक्र भाळी नेत्रचिह्न।
स्कंधावरी शूलचिन्ह। निश्चये झाला शिवावतार॥२३॥

पुत्राचे मुख अवलोकिता। धनदान भूदान गोदानादि।
संकल्प सोडले नानाविधी। आनंद हृदयी मावेना॥२४॥

पुत्राचे करणे नामकरण। सर्वज्ञा साजेलसे नाम कोण।
चंद्रमौलीश्वराचे फेडावे ऋण। नाव ठेविले शंकर॥२५॥

ध्यानी मनी मुखी शंकर। चित्ती येई आनंदाचा पूर।
जन्माचे जणू सार्थक थोर। कृतकृत्य झाले मायबाप॥२६

जन्मकुंडली झाली तयार। ग्रह सांगती झाला अवतार।
सर्वज्ञताच जणू साकार। परी अल्पायुषी होणार॥२७॥

शिवगुरुसी वाटले धन्य। हक्क अग्रहाराचा आधीच मान्य।
कुलात झाले साकार ज्ञान। जणू पूर्णत्वा पावले जीवन॥

पूर्णेच्या काठी पूर्णत्व प्रगटे। बालशंकर हळूहळू वाढे।
परी बुध्दीतेज अतीव गाढे। संस्कारापूर्वीच व्यक्त झाले॥

शिवगुरुंचे श्रेष्ठ गुरुकुल। क्षणोक्षणी वेदवाणी ऐके मूल।
पाठ होई मंत्र तत्काळ। अपूर्व मेधा शंकराची॥३०॥

© www.madhaveeraghuveer.com

लागले भगवताचे पाय। सज्जन म्हणती कालडीचे भाग्य।
सामान्य जन करिती आश्चर्य। कैसा पुत्र अपूर्व॥३१॥

श्रेष्ठांच्या मते थोर वेदांती। कोणी म्हणती साक्षात भक्ती।
कोणास भासे कर्ममूर्ती। पहाता शंकर गुंगे माति॥

शंकराच्या बाललीला। भक्तिज्ञानाचा अपूर्व मेळा।
सदैव लोक भोवती गोळा। प्रत्येकासी भेटे आनंद॥३३॥

आधीच बाल्यावस्था मनोहर। त्यातून हा ज्ञानी शंकर।
चरित्रकथा सहज सुंदर। संतोषवील श्रोतृगणास॥३४॥

कैसा वाढे शंकर बाळ। कैसा हो त्याचा प्रतिपाळ।
शिवगुरु घरी हर्षाचा सुकाळ। जाणावा पुढील अध्या[illegible]॥

इति श्री आदि शंकर लीलामृत। तिसरा अध्याय समाप्त।
कृपा व्हावी सदा प्राप्त। करण्या ग्रंथ पूर्ण सार्थ॥३६॥

शुभं भवतु। शुभं भवतु। शुभं भवतु॥

६.४.२०१६

© www.madhaveeraghuveer.com

॥ॐ॥

# अध्याय चौथा

जगद्‌गुरु श्री आदि शंकरा। वर्णिवे आपुल्या अवतारा।
अल्प ही कामना पूर्ण करा। वंदिते द्या आधारा॥१॥

कैसी भारताची पूर्वस्थिती। महेश्वर प्रगटले कोण्या रीती।
जन्मकथा श्री आदिशंकराची। वर्णिली मागील अध्यायी॥

जे जे बाळाच्या श्रवणी। शंकर धरी तत्काळ स्मरणी।
सर्व करिती वाखाणणी। एकपाठी म्हणून॥३॥

बोल बोबडे मुखातून। जैसी संगीताची उठे धून।
गोड शांत स्वरातून। वाटे वर्षते अमृत॥४॥

बोबडेपण संपले सहज। शुध्द मंत्र श्लोकांची उपज।
स्पष्टोच्चारे प्रकटे तेज। आश्चर्यचकित होती जन॥५॥

सुवर्णकांतिची फळे रसाळ। तेजस्वी परी वाणी मधाळ।
ऐकत राहावी अनंतकाळ। वाटे वाणी शंकराची॥६॥

थोर पोर कोणी असू दे। सर्वांसी शंकर हवा वाटे।
प्रेमभरे प्रत्येका भेटे। परी अंतरी सदा अलिप्त॥७॥

कोणा न कळे का वृत्ति असंग। व्यवहारात प्रकटे प्रेमसंग।
आनंद संतोषाचे विविध रंग। त्याही रिपूशी मात्र निःसंग॥

शिवगुरु देती नित्य संथा। आर्यम्बा सांगे लोककथा।
श्रवणी पडती वेदकथा। पुराणकथाही सार्थ॥९॥

शिवगुरु योजिती उपनयन। अलौकिक बुध्दि जाणून।
पाचवे वर्षी व्रतबंधन। संस्कारासी योग्य समय॥१०॥

© www.madhaveeraghuveer.com

द्यावा पुत्रास उपदेश। परी जाणती तो विश्वेश।
कोण्या अधिकारे आदेश। देऊ मी बाळ शंकरा।। ११।।

परी पुत्रमोह अनावर। शिवगुरु म्हणती येये शंकर।
बाळा जाणे मजसी दूर। आता आहे अनिवार्य।।१२।।

शंकर पुसे लडिवाळपणे। "सांगा तात कोठे जाणे।"
शिवगुरु सांगती "आता पोचणे। शाश्वत पद ते गाठणे"।।

शंकर पुसे पुन्हा हासून। "का ते सांगा मजसि तात"।
पिता सांगे पुत्राप्रत। देह आपुला अशाश्वत।। १४।।

पुत्रप्राप्ति उतारवयातील। पित्यासी करी उतावीळ।
कारण जाणे आपुला काळ। आता आला समीप।।

शंकर पुसे शाश्वत काय। शिवगुरु वदती आत्मा शाश्वत।
बाळ बोले "कळले तात। मजसि सारे काही।"

शिवगुरु पुसती "काय कळले"। शंकर बोले गंभीरपणे।
तुम्हा न कोठे जाणे येणे। आत्मा तर अमर।।१७।।

अलौकिक बुद्धीचे ते बोल। पित्यास लाभले रत्न अमोल।
हृदयी आनंदाचा कल्लोळ। आवरताही आवरेना।।१८।।

आपुला शंकर जरी लहान। जाणतो मूळ तत्त्वज्ञान।
आता सांगावे उकलून। मृत्यूचे ते सत्य रूप।।

साक्षात मृत्यु दिसता पुढती। सारेजण हतबुद्ध होती।
डोळे आपुले मिटून घेती। जाणती ना मृत्यूचे मन।।

© www.madhaveelaghuveer.com

परी तुज बाळा सांगतो। मृत्यु दिसता नको घाबरु।
अरे तो नर सर्वांचा सुहृदु। राहतो सदैव बरोबर॥ २१॥

जन्मासवे येते मरण। हातात हात गुंफून।
हृदयास हृदय जोडून। जीवनभर देण्या साथ॥२२॥

शिवगुरुंचे चरण वंदुनिया। शंकर गेला खेळावया।
शिवगुरुंची रोमांचित काया। सात्त्विक भावे निःश्वास॥२३

शिवगुरुंचे होता निधन। सर्वांस वाटे आपण दीन।
झालो शिवगुरुंवाचून। कोण पुढे सांभाळील?॥ २४॥

आर्याम्बेसही दुःख भारी। कैसे जगावे पतीचे माघारी।
अल्पवयी पुत्र असता परी। धर्माज्ञा नाही सती जाण्या॥

पुत्र जरी आपुला सर्वज्ञ। परी गुरुगृही गेल्यावीण।
गुरुकुल परंपरा राखेल कोण। आर्याम्बा विचार करी॥

आर्याम्बेच्या शुद्ध वर्तनाने। सर्वांस सापडे पुढील वाट।
शंकराच्या व्रतबंधाचा थाट। करिती सर्व बिनबोभाट॥२७॥

पुत्रसंगतीचा सोडून मोह। सत्‌शील आर्याम्बा अति सुजाण॥
कर्तव्याचे करण्या पालन। झाली सर्वतोपरी सिद्ध॥२८

उपनयनाचा दिव्य संस्कार। शंकर निघे सोडून घर।
विद्येस्तव गुरुकुली संचार। करणे प्राप्त काही काळ॥२९॥

स्वीकारुनि पहिला ब्रह्मचर्याश्रम। ब्रह्मचर्येचे करी पालन।
मनोभावे गुरुंचे आज्ञापालन। शंकर बटुचे व्रती जीवन॥३०

©www.madhaveeraghuveer.com

साठवुनि मनी मातेचे रूप। पाही गायत्रीत अरूप।
भिक्षा मागे मंत्र उच्चारून। ॐ भवति भिक्षां देहि।

दूर करुनि माया छत्र। हाती घेउनि भिक्षापात्र।
घेई अन्न आणि ज्ञान मात्र। वेदांती शंकर निरासक्त॥

गुरुगृही पाठ घेता। भोवताली काही घडता।
शंकराचे मनी चिंता। सत्यासत्य कैसे जाणावे॥

विद्याध्ययन कैसे झाले। जग कैसे अनुभविले।
विद्याव्रती शंकरे काय केले। जाणावे पुढील अध्यायी॥

इति श्री आदिशंकर लीलामृत। चौथा अध्याय समाप्त।
कृपा व्हावी सदा प्राप्त। करण्या ग्रंथ पूर्ण सार्थ॥

शुभं भवतु। शुभं भवतु। शुभं भवतु॥

७.४.२०१६

© www.madhaveeraghuveer.com

॥ॐ॥

# अध्याय पाचवा

जगद्गुरु श्री आदिशंकरा। वर्णिवे आपुल्या अवतारा।
अल्प ही कामना पूर्ण करा। प्रार्थिते द्या आधारा॥१॥

पित्याचा वियोग, मृत्यूचे दर्शन। मातेचे ते कर्तव्यदक्ष मन।
मौंजीबंधन गुरुगृही प्रयाण। वर्णिले चवथ्या अध्यायी॥२॥

शंकराची अपूर्व स्मृति। गुरुचरणी नम्र वृत्ति।
प्रसन्न गुरु जे जे शिकविती। सहज करी आत्मसात॥३॥

दोन वर्षांचा अल्पकाळ। न्याय सांख्य योगशास्त्र।
सर्व वेदविद्या पारंगत। परोक्ष ज्ञानी झाला शंकर॥४॥

विद्याव्रतीचे आचरण। नित्य करणे भिक्षाटन।
फक्त तीन वेळा उच्चारण। एका दारी मंत्राचे॥५॥

पाच घरी भिक्षा मागून। भिक्षेत मिळेल जे अन्न।
गुरुसी करुनि अर्पण। गुरु देईल ते खाणे॥६॥

भिक्षेसाठी यावा शंकर घरी। वाट पाहती सुवासिनी दारी।
उत्तम अन्न आपापल्या परी। वाढण्यास्तव आसुसती॥७॥

परी वारंवार एकाच घरी। भिक्षा मागणे नाही रीती।
भिक्षेसाठी सहज फिरती। शंकर आणि इतर बटु॥८॥

एके दिवशी असाच शंकर। भिक्षेसाठी गाठी ब्राह्मण घर।
भिक्षा मंत्राचा करी उच्चार। ॐ भवति भिक्षां देहि॥९

करील ब्राह्मणपत्नी काय। भिक्षा देण्याची इच्छा तीव्र।
परी दारिद्र्य घरी अतीव। नाही धान्याचा एक कण॥१०

शंकर करी मनी विचार। नसेल पडला कानी मंत्र।
गृहिणीस सांभाळणे किती तंत्र। पुन्हा उच्चारी भिक्षामंत्र॥

गृहिणी मनी अस्वस्थ। बटु जाईल परतुन।
भिक्षेवीण माझ्या दारातून। गृहस्थाश्रमास लागेल डाग॥

लगबग धावे दाराकडे। परंतु मनी पडले साकडे।
जाउनी आता बटुपुढे। वाढू कोणती भिक्षा मी॥१३॥

अधीर झाला शंकर बाळ। लागली काना चाहूल।
परी कळले अडले पाउल। माय अडखळे मध्यावरी॥१४॥

शंकरासी ग्रासे खिन्नता। कैसी या मातेची अवस्था।
देण्याची इच्छा तीव्र असता। मिळे ना का काही हाता॥ १५

उच्चारिता तीनदा मंत्र। जावे लागेल रिक्त हस्त।
माता होईल अपमानित। मार्ग कैसा काढावा॥१६॥

गृहिणी पाहे इकडे तिकडे। नजर जाता वर शिंक्याकडे।
एक आवळा दृष्टीस पडे। घेउनी धावे दाराकडे॥१७॥

अत्यंत मंद स्वरात। शंकर उच्चारी भिक्षामंत्र।
गृहिणी बोले गद्गद स्वरात। थांब रे मी आले बाळा॥

आनंदे शंकर झोळी पसरे। परी गृहिणी मनी बावरे।
तुच्छ भिक्षा वाढू कशी रे। होई कावरी बावरी॥

प्रेमादरे बोले शंकर। माय गे वाढ ना भिक्षा आता।
आश्वस्त झाली बोल ऐकता। घाली आवळ्याची भिक्षा

© www.madhaveeragniweer.com

पाहे शंकराच्या नेत्रात। अर्थपूर्ण आदर भाव।
आनंदोर्मिचा अंतरी उद्‌भव। वाटे भेटला साक्षात देव॥२१॥

शंकर वळला माघारी। मनी सतत विचार करी।
लक्ष्मी होईल प्रसन्न जरी। आधार सदा गृहिणीसी॥२२॥

भिक्षा अर्पुनि गुरुसी। शंकर जाउनि एकांतवासी।
अनन्यचित्ते महालक्ष्मीसी। विनवी आर्त भक्तिभावे॥२३

महालक्ष्मी तुझे ऐश्वर्य महान। ब्राह्मणपत्नी तर धनहीन।
दोघीही मज मातसमान। भेद एवढा का दोघींची॥२४॥

मनात दाटे कारुण्यभाव। म्हणे 'लक्ष्मी तू माझी माय।
ब्राह्मणपत्नीस का दयनीय। करी काही योग्य उपाय॥२५

आर्तस्वर उमटे कंठातून। काव्यशक्ति होई जागृत।
म्हणे होई गे कृपावंत। जगन्माते महालक्ष्मी॥ २६॥

विद्याव्रती शंकराचे वागणे। स्वतःसाठी नाही मागणे।
परी श्रेष्ठाघरी धरी धरणे। हरण्या दुःख दीनांचे॥२७॥

नव्हते जाणणे केवळ शास्त्र। शास्त्राचाराचे करुनि शस्त्र।
जीवन जगणे यथार्थ। सुसंस्कारित राहो चित्त॥२८॥

बाल शंकराचे शुद्ध चित्त। न मागे स्वतःसाठी वित्त।
महालक्ष्मी होउनि मोहित। म्हणे माग वरदान॥ २९॥

झालीस महालक्ष्मी प्रसन्न। म्हणासि माग वरदान।
मागणे इतुकेच वरदान। ब्राह्मणपत्नीस दे अपार धन॥३०

© www.madhaveeraghuveer.com

भिक्षेसाठी जाता दारी। होते नव्हते जे घरी।
आवळ्याची भिक्षा पदरी। कैसी गे ती उदार माय॥३१

शंकराची मधुर वाणी। महालक्ष्मीची अगाध करणी।
ब्राह्मणपत्नीची धर्मकहाणी। कनकवृष्टीने पूर्ण होई॥३२

सुवर्ण आवळ्यांचा पाऊस। पडला ब्राह्मणाचे अंगणात।
लोक झाले आश्चर्यचकित। म्हणति काय चमत्कार॥

शंकराने गाईले जे स्तोत्र। कनकधारा नामे प्रसिद्ध।
पठण करील जो सश्रद्ध। होईल जीवनी धन्य धन्य॥

बाह्यत: हा चमत्कार। जाणावया हवे त्यातील मर्म।
सावधचित्ते श्रवणकर्म। करून जाणावे पुढील अध्यायी॥

इति श्री आदिशंकर लीलामृत। पाचवा अध्याय समाप्त।
कृपा व्हावी सदा प्राप्त। करण्या ग्रंथ पूर्ण सार्थ॥३६॥

शुभं भवतु। शुभं भवतु। शुभं भवतु॥

८.४.२०१६
वर्षप्रतिपदा
गुढीपाडवा

© www.madhaveeragiluveer.com

॥ ॐ ॥

# अध्याय सहावा

जगद्गुरु श्री आदिशंकरा । वर्णावे आपुल्या अवतारा ।
अल्प ही कामना पूर्ण करा । प्रार्थिते ह्या आधारा ॥१॥

कनकधारा स्तोत्र रचिले । कोणत्या प्रसंगी शंकरा स्फुरले ।
भिक्षा मागता काय घडले । वर्णिले पाचव्या अध्यायी ॥२॥

पडला पाऊस सोन्याचा । कथा ही सत्य की असत्य ।
कथेचे कोणते नेमके तथ्य । विचारमंथन स्वाभाविक ॥३॥

प्रश्न नाही चमत्काराचा । आहे तो पूर्ण श्रद्धेचा ।
शक्ती करुणेची असते का । अघटित ते घडविणारी ॥४॥

पूर्ण श्रद्धा म्हणजे काय । अंतरीचा अढळ विश्वास ।
आत्मबलाचा पूर्ण विकास । करुनि घडवी अघटित ॥५॥

शिवगुरु आर्यांबेची शिकवण । शंकराच्या जागविती विश्वास
भक्तिने आळवीता देवास । भक्तकामना करी पूर्ण ॥६॥

पूजिता चंद्रमौलीश्वर । लाभलास आम्हा गुणाढ्य ।
पुत्र तू आमचा सर्वज्ञ । ठेवी ध्यानात सर्वदा ॥७॥

मायपित्यांचा तो स्वानुभव । शंकराच्या मनी स्थिरावे भाव ।
ईशशक्तीचा घेता ठाव । इच्छिले ते होईल पूर्ण ॥८॥

पाहता ब्राह्मण स्त्रीची दुर्दशा । करुणा उपजे अंतःकरणी ।
शंकर लागे लक्ष्मीचरणी । सुखावो ही गृहिणी ॥९॥

श्रद्धा ठेवुनी महालक्ष्मीवर । आळवी तिजला बटु शंकर ।
करुणालयाचा आर्त स्वर । सर्वांचे भेदी काळीज ॥१०॥

© www.madhaveeradhuveer.com

ऐकणारे लहान थोर। म्हणती यास हवे काय।
तरी धरिले लक्ष्मीचे पाय। तरी ती का येईल साक्षात्॥

ऐकता स्तोत्राचे मधुर बोल। काही धनिक गावातील।
विचार करिती सखोल। काय करता येईल?॥१२॥

भिक्षा मागता याने जाणले। झाले सज्जन दारिद्र्यग्रस्त।
विवेक नाही आमुचा आमुत। आता तरी व्हावे धर्मरत॥१३॥

आमच्यापाशी धन अपार। ते का न कामी येणार।
रक्षिण्या विद्या सदाचार। आमचे काय कर्तव्य॥१४॥

एक करितो चंगळ। दुसरा रही कंगाल।
सांगतो शंकर बाळ हा नाही वैदिकधर्म॥

लक्ष्मी तर चंचल। आज ना उद्या जाणार।
शोधुनिया सत्शीलाचे घर। आपणचि तेथ पोहोचवावी।

गुपचुप गेले आपल्या घरी। मध्यरात्र झाल्यावरी।
ब्राह्मणपत्नीच्या दारी। ठेविती सुवर्णराशी॥१६॥

पहाट होता पाहुनि धन। पतीपत्नीचे आनंदले मन।
म्हणती झाली लक्ष्मी प्रसन्न। शंकराच्या शुभचिंतने॥

देवदेवता जरी अनंत। माणसाच्या वसति मनात।
योग्य काली प्रकटुनि बुध्दित। घडवितात्ती अघटित॥

बालशंकराचा पूर्ण विश्वास। मनापासून घेता नाम।
प्रकटोनि करितो काम। अंतर्यामिचा परमेश्वर।

© www.madhaveeraghuveer.com

जीवन धन्य सांगे स्तोत्रफल। त्यापुढे वैभवाचे काय मोल।
अखेरी सांगे शंकर बाळ। स्तोत्राचे हे चि अमोल मर्म॥

कनकाची धारा अव्याहत। पृथ्वीवरी करो वर्षाव।
असा सार्थ होण्या भाव। आर्त धावोनि दीनाजव॥२२॥

स्वार्थासाठी करिती व्रते। कर्मानुसार देती दैवते।
परी आळविता निःस्वार्थपणे परमेश्वर देई अपार॥२३॥

पूर्वीही पुराणी ऐसी कथा। ब्राह्मणासाठी मागे रघुराजा।
सुवर्णवृष्टी करी कुबेरराजा। आठवण देई दसरा॥२४

ईप्सित साधण्या सज्जनांचे। सामर्थ्य वापरती श्रेष्ठ साचे।
भक्ति, बुद्धि, शक्ति वा संपत्तीचे। साधते तेव्हा प्रजा सौख्य॥

विवेकासह नांदे बुद्धी। मृदु कनवाळू चित्तवृत्ती।
ऐशा आचरती श्रेष्ठ विभूती। वैदिक धर्माचे आदर्श॥

साक्षात् भगवान शंकर। होऊनि जगति आदिशंकर।
लीलेतून घडविती साक्षात्कार। प्रत्येकातील आत्मशक्तीचा॥

जन्मा येई जो जो प्राणी। आत्मशक्ति वसे अंतर्यामी।
परी नोळखे निज अज्ञानी। समजे स्वतःसि दुर्बल॥२८

ती आत्मशक्ति जागविणे। स्वस्वरूपास ओळखणे।
नरदेहाचे सार्थक करणे। थोर शिकवण वेदांताची॥

गुरुगृही शंकराचे हे वर्तन। गुरुही झाले अतिप्रसन्न।
कोणती विद्या आता करू दान। मी पराभूत शिष्याकडून॥

सांभाळण्या परी व्यवहार। संगती शंकरा गृही परतणे।
तुजविला शिकविली पूर्णपणे। ज्ञान नी शास्त्रे पुराणे॥

धरुनि चित्ती नम्र भाव। शंकर धरी गुरुचे चरण।
म्हणे तुम्ही दिली शिकवण। तीच उजळे मार्ग माझा॥

गुरुगृह सोडुनि परते घरी। आर्याम्बेस संतोष भारी।
स्वाभाविक विचार करी। शंकर धरो गृहस्थाश्रम॥

आप्तेष्टांहीही तोच विचार। थाटणे शंकराचा संसार।
शोधावी वधू सुंदर। आर्याम्बेसि विचारुनि॥३४॥

काय घडले परी प्रत्यक्ष। गृहस्थाश्रमी केला का प्रवेश।
मातेचा शंकरा काय आदेश। जाणावे पुढील अध्यायी॥

इति श्री आदि शंकरलीलामृत। सहावा अध्याय समाप्त।
कृपा व्हावी पूर्ण प्राप्त। करण्या ग्रंथ पूर्ण सार्थ॥

शुभं भवतु। शुभं भवतु। शुभं भवतु॥

९-४.२०१६

© www.madhaveeraghuveer.com

||ॐ||



# अध्याय सातवा

जगद्गुरु श्री आदिशंकरा। वर्णिते आपुल्या अवतारा।
अल्प ही कामना पूर्ण करा। प्रार्थिते द्या आधारा॥१॥

ब्रह्मचर्याश्रमीचे जीवन। शंकराचे झाले परिपूर्ण।
सकलास आदर्श उदाहरण। वर्णिले सहाव्या अध्यायी॥२

वेदविद्या शास्त्रे शिकून। शंकर आला परतून।
मातेची सेवा रात्रंदिन। कर्तव्याचे करी पालन॥३॥

आर्याम्बा जेव्हा दिसे प्रसन्न। मनीचे ध्येय दावी बोलून।
माते ब्रह्मचर्य आजीवन। पाळून व्हावे मी कृतार्थ॥४॥

मातेस कैसे पटावे। पुत्राविणा विधवेचे जिणे।
जगावे कोणत्या कारणे। आर्याम्बा राखी मौन॥५॥

शंकर जेव्हा दिसे प्रसन्न। माय बोले मनीचा विचार।
शंकरा करी रे संसार। मज वाटेल अति सुख॥६॥

मातापुत्र आपापल्या परी। विचार करिती यथायोग्य।
संसार किंवा ब्रह्मचर्य। होता होईना निर्णय॥७॥

हेतु माझे जीविताचा। वैदिक धर्म दृढ करण्याचा।
जरी आशीर्वाद ना मातेचा। कैसा पूर्णत्वा जाईल॥८॥

कैसे आईस समजवावे। मज तो विश्वाची चिंता करणे।
संसारात ना केव्हा रमणे। साध्य माझे धर्मप्रसार॥

साध्याचे या एकच साधन। वैराग्यपूर्ण असावे जीवन।
त्यातून घडावे स्वरूपदर्शन। परी सर्वांचे मूळ संन्यास॥

© www.madhaveeraghuveer.com

शब्द ऐकता संन्यास। आर्याम्बा होई कासावीस।
नको रे ऐसे बोलूस। मजसि केवळ तुझा आधार॥

मातेच्या पूर्ण सम्मतीविण। संन्यासदीक्षा कोण देणार।
किती काळ अजून जाणार। मातेचे मन शांतविण्या॥

काळाची करिता विवंचना। काळाचि जणू करी योजना।
पूर्ण करण्या कामना। संन्यासाची शंकराच्या॥

शांत समंजस शंकराचे। मित्रात मित्रासम वागणे।
चढाओढीने खेळणे पोहणे। हुंदडणे सर्वत्र बालपणी॥

एके दिनी पूर्णेच्या पात्री। नित्याप्रमाणे स्नानास जाता।
पैज लागली पाहता पाहता। जाईल कोण खोल नदी(

आपुली शक्ती करण्या प्रगट। शंकर सुटला मोकाट।
न राखता भान नीट। जाई खोल पात्री धीट॥

साधुनि संधी नामी। मगर रुपाने काळ धावला।
पाय शंकराचा धरिला। हाहाःकार काणवर॥

मित्र सारे घाबरले। सर्वत्र बोभाट करीत सुटले।
आर्याम्बेसह सर्व धावले। त्वरित गाठली नदीतीर॥

शंकरासी आली जाण। भय दाखविण्या आले मरण।
आदरे दोन्ही हात जोडून। विनवी आईस आर्तपणे॥

आता तरी पुरवी कामना। संन्यासाची मनी वासना।
आई तुझ्या सम्मतीविना। राहील गे अतृप्त॥

© www.madhaveengurjveer.com

आर्याम्बेची मति कुंठित। चित्त झाले सदगदित।
म्हणे बाळा मज सम्मत। संन्याससंकल्पे हो मुक्त॥ २१॥

मातेची मिळता सम्मती। आनंदोर्मिची उसळे शक्ति।
मगरमिठीतून होई मुक्ति। पाय झाला मोकळा॥२२॥

त्वरेने गाठी किनारा। मातेच्या पायांचा घे आसरा।
म्हणे वाचविलेस लेकरा। आज मृत्यूपासुनि॥ २३॥

मातेच्या नेत्री अश्रूंचा पूर। अभिषेक शंकर मस्तकावर।
हृद आलिंगून आर्याम्बा दूर। शंकर कावरा बावरा॥२४

म्हणे बाळा मोह गेला। विवेक पुरता जागा झाला।
तुला चालणे मार्ग निराळा। जग कल्याणाचा सर्वज्ञा॥२५

सम्मती दिली आपत्काली। बुद्धीत परी स्थिरावली।
मनास शांति प्राप्त झाली। चालवी तू जगसंसारा॥२६॥

तुझ्या पित्यासही होय ओढ। संन्यासाश्रम वाटे गोड।
परी पित्याची इच्छा आड। गृहस्थाश्रम स्वीकारला॥२७॥

पूर्ण उजळिले जीवन। सदा जाणुनि माझे मन।
कुटुंबात नांदे समाधान। तुझ्या पित्याच्या त्यागाने॥

परी शिवगुरुंची खरी कामना। सर्वज्ञ पुत्राने करावी साधना।
वैदिकधर्माची पुनःस्थापना। व्हावी सर्व दिशात॥२८॥

पित्याचे फेडावया ऋण। सात पिढ्यांचे उद्धरण।
ज्ञानवैराग्याधिष्ठित संन्यास। बाळा घेई आनंदे॥३०॥

©www.madhaveeraghuveer.com

तुझी आजवर ओढाताण। कसे दुखवावे मातेचे मन।
परी आज संतुष्ट होऊन। सम्मती देते संन्यासा ॥३१॥

शंकरासी हर्ष झाला। मातेच्या चरणी झेपावला।
म्हणे जन्म सार्थ झाला। आई तुझ्या अनुमोदने ॥३२॥

घेवोनीही संन्यासाश्रम। तुझ्या अंतसमयी येऊन।
अंत्यसंस्कार मीच करीन। सर्वांसमक्ष देतो वचन ॥३३

आर्याम्बेस काही बोलवेना। पुत्राने जाणून मनोवेदना।
आश्वस्त केले माझ्या मना। आता लागणे पुढील कामा ॥

जमलेले जन भांबावती। आदरे मस्तक नमविती।
धर्मास्तव सुख त्यागिती। कैसी ही मायलेकरे॥ ३५

संन्यास कोण देणार। शंकर कोठे जाणार।
मातेची व्यवस्था कैसी करणार। जाणावे पुढील अध्यायी॥

इति श्री आदिशंकर लीलामृत। सातवा अध्याय समाप्त।
कृपा व्हावी सदा प्राप्त। ग्रंथ करण्या पूर्ण सार्थ ॥३७॥

शुभं भवतु। शुभं भवतु। शुभं भवतु॥

१०.४.२०१६

© www.madhavenagarkar.com

॥ ॐ ॥

# अध्याय आठवा

जगद्गुरु श्री आदिशंकरा। वर्णावे आपुल्या अवतारा।
अल्प ही कामना पूर्ण करा। प्रार्थिते द्या आधारा॥१॥

संन्यास घेण्या सम्मती। मातेने शंकरा कैसी दिधली।
कथा संक्षेपे वर्णिली। सप्तमाध्यायी श्रद्धेने॥२॥

संन्यासदीक्षा गुरुकडून। घेणे वाटे शंकरा उचित।
परोक्ष ज्ञान जरी प्राप्त। व्हावी अपरोक्षानुभूती॥३॥

संन्यास म्हणजे काय। सम्यक् न्यास म्हणजे संन्यास।
जे ते योग्य तेथे ठेवण्यास। हवे वैराग्य आणि ज्ञान॥४॥

श्री गोविंदयतींच्या शोधास। मज जाणे उत्तरदिशेस।
मातेची व्यवस्था करण्यास। हवा थोडा कालावधी॥५॥

अग्रहाराच्या हक्क कुलास। चालविण्या कुटुंब चरितार्थ।
आवश्यक तितुके द्रव्य अर्थ। मिळेल मातेस चिंता व्यर्थ॥६॥

बोलावुनि आप्त इष्टास। सांगोनि व्यवस्था शिष्यांस।
मातेस न पडेल सायास। विनवी शंकर प्रत्येका॥७॥

परी मातेचे थकले शरीर। आचरता नित्याचे व्यवहार।
जाणे रोज नदीवर। कैसा त्रास चुकणार?॥८॥

हळू हळू थांबत थांबत। सावकाश पाऊल उचलत।
वृद्धत्वावर करीत मात। आर्यम्बा गाठी पूर्णाकाठ॥९॥

शंकर होई खिन्न पाहुनि। आई होईल का बापुडवाणी।
कोणास सांगेल आणा पाणी। काय करावा उपाय?॥

© www.madhaveeraghuveer.com

एकांती चिंतन करी शंकर। कर्ता करविता तो ईश्वर।
त्यालाच उचलणे चिंताभार। मी तर भक्त पामर॥

परमेश्वराची करी आळवणी। जाणतोस ना सरी कहाणी।
पूर्णेस आणावे येथे अंगणी। टळावे कष्ट आईचे॥

प्रार्थना ऐकता म्हणती कोणी। कैसी ही विचित्र मागणी।
नदी कैसी येईल अंगणी। हवी कराया समजावणी॥

दुसरे कोणी देती स्मरण। शंकरे धरिता लक्ष्मीचरण।
स्तवने झाले ब्राह्मण प्रसन्न। तैसेच काही घडेलही॥

लोकप्रवादा दुर्लक्षुनि। अनन्यभावे ईश्वरा वंदुनि।
शंकर करी आर्त विनवणी। पूर्ण निष्ठा धरुनि मनी॥

पावसाळ्याचे होते दिवस। पूर्णेस आला महापूर।
दगडबांधे करीत दूर। धावे पात्र बदलुनि॥ १६॥

बघता बघता प्रवाह आला। आर्यांबेच्या घराशी वळला।
स्तंभित करी सकलाला। सेवेस्तव जणू आसुसला॥

शंकर झाला सद्गदित। मायेसह पूर्णेस पूजित।
परमेश्वरासी जोडूनि हात। म्हणे कृपा आपुली अपार॥

निरोप घेऊनि मातेचा। समय कालडी सोडण्याचा।
गंभीर तैसा उत्कटतेचा। प्रसंग एकमेवाद्वितीय तो॥

एकाकी मी आजपासुनि। आई नको आणू मनी।
चाललो जरी संन्यास घेऊनि। कर्तव्या ना विसरेन॥

© www.madhaveeragniveer.com

असो दिवस अथवा रात्र। आधारास्तव जर स्मरशील।
धावत येईन मी तत्काळ। सार्थ करीन तुझे बोल॥२१॥

रुढी असतील काही। संन्याशास अधिकार नाही।
परी वचन देतो आई। करीन तुझे अंत्यसंस्कार॥२२॥

आता देई आशीर्वाद। पित्याचे होवो पूर्ण स्वप्न।
वैदिकधर्माचे सुस्थापन। वेदमातेचे फिटेल पांग॥२३॥

उदासीन तरीही प्रसन्न। आर्याम्बेचे भरले नयन।
कर्तव्यदक्ष अंतःकरण। उमटले बोल 'विजयी भव'।

घेवोनि मोजके सामान। सकल जनांचे आशीर्वचन।
शंकरे ठेविले प्रस्थान। उत्तरदिशेने प्रवास सुरु॥२५॥

पूजावा केशवराज प्रथम। सोडण्यापूर्वी ग्राम धाम।
पूजावे दैवत सार्वभौम। मंदिरी प्रवेशला शंकर॥२६॥

पुजारी सांगे हात जोडून। पूर्णेने बदलता पात्र।
मंदिर झाले उपेक्षित। कैसे होईल पुन्हा स्थापित॥२७॥

शंकर सांगे पुजाऱ्यास। कर्ता करविता केशवराज।
तुमच्ये आमुचे एक काज। श्रद्धेने करावे पूजन॥२८॥

भोवताली जमले भाविक जन। त्या सर्वांशी प्रेमे बोलून।
स्वतः मूर्ती स्वस्थानी स्थापून। जीर्णोद्धाराचा शुभारंभ॥२९॥

उद्ध्वस्त वैदिक धर्मास। पुनरपि करण्या प्रस्थापित।
जीवनकार्याची सुरवात। केशवराज हे निमित्त॥३०॥

©www.madhaveeraghuveer.com

उत्तरदिशेस कोणीकडे। गोविंदयती राहती तिकडे।
शंकराचे पाऊल पडे। झटपणे गुरूंच्या शोधार्थ॥३१॥

होता ऐकून शंकर। गोविंदयतींचे चरित्र सुंदर।
साक्षात पातंजलीचा अवतार। मानिती त्यांना आदरे॥३२

यतिवरांचे शोधून स्थान। मनःपूर्वक त्यांना विनवून।
संन्यासदीक्षा त्यांचेकडून। घ्यावी आपण विधीपूर्वक॥३३

चालला वेगे शंकर। शांत धीर आणि गंभीर।
कृतनिश्चय मनी खंबीर। अवर्णनीय पदक्षेप॥३४

मस्तकाचे केलेले मुंडन। भगवे वस्त्र परिधान।
दंड कमंडलु हाती धरून। साकारले जणू चैतन्य॥३५

इतक्या बालवयात संन्यास। कोणी दिधला असेल यास।
येवढे तीव्र तपसायास। कोणत्या उद्देशे करीत हा॥३६।
पाहता शंकराचे अद्भुत बाल्य। मनी उपजे वात्सल्य।
वाटे हा आपुलाच पाल्य। प्रेमे अर्पिती भिक्षा त्यास॥
परी न थांबे कोठे शंकर। चालत राही तो झरझर॥
नगरे अरण्ये करी पार। ध्येय ना विसरे क्षणभर॥
नामस्मरण अथवा चिंतन। सदाशिवाचे करी भजन।
किती चालला नुरे देहभान। देह थकता विश्राम॥
शिवशिव म्हणे वाचे। सच्चिदानंद रूप तयाचे।
आठवीत प्रेमे मनी साचे। उल्हसित रत्नवृत्ति सदा॥
बहर येई कवित्वाला। छंद लागला वाणीला।
वारंवार गाई चरण पहिला। चिदानन्दरूपः शिवोऽहं शिवोऽहम्।
मनी जो चरण स्फुरला। तोचि सोबत शंकराला।
धीर देई चित्ताला। मार्ग चालता एकला॥
इति श्री आदिशंकर लीलामृत। आठवा अध्याय समाप्त।
कृपा व्हावी सदा प्राप्त। ग्रंथ करण्या पूर्ण सार्थ॥
शुभं भवतु। शुभं भवतु। शुभं भवतु॥ ११.४.१६

||ॐ||

- अध्याय नववा -

जगद्गुरु श्री आदिशंकरा । वर्णवे आपुल्या अवतारा ।
अल्प ही कामना पूर्ण करा । प्रार्थिते द्या आधारा ॥१॥

केली मातेची व्यवस्था नीट । मायलेकरांची ताटातूट ॥
निघे गुरुस्तव शंकर धीट । वर्णिले मागील अध्यायी ॥२॥

दक्षिण सोडूनि उत्तरेकडे । चालता शंकर घेई धडे ।
भोवताली जे प्रत्यक्ष घडे । ते ते देई शिकवण ॥३॥

निसर्गाचे रूप उदार । दावी कधी क्रोध अनावर ।
परी सदा सृष्टीवर । सौंदर्याची उधळण ॥४॥

फळे मुळे करिती क्षुधा शांत । तृष्णा शमविण्या उदकस्रोत ।
रंगाची सर्वत्र बरसात । नेत्रा देई परमानंद ॥५॥

कैसे फिटेल निसर्गाचे ऋण । आहे का कोठे शास्त्रवचन ।
नातेसंबंध सांगेल कोण । निसर्ग आणि मानवाचा ॥६॥

शंकराच्या मनी उपजे कोडे । केव्हा कैसे कोण उलगडे ।
अनुभवाने ज्ञान वाढे । पदोपदी शंकराचे ॥७॥

रौद्र रूप भयानक । निसर्ग दाखवी अचानक ।
मृत्यूचे थैमान एकटक । शंकर पाही साक्षित्वे ॥८॥

आधार सदैव मंत्रांचा । मुखोद्गत केल्या मंत्रांचा ।
वेदातील मूळ ऋचांचा । प्रसंगानुरूप घेई शंकर ॥९॥

मार्गात दिसता मंदिर । बाळ शंकर होउनि अधीर ।
न हालवता आपुले अधर । मानसपूजा करी सादर ॥१०

© www.madhaveeraghuveer.com

कैसा चालतो व्यवहार। माणसामाणसात परस्पर।
रूढीचे किती गैरप्रकार। मार्गी अनुभवे शंकर॥७१

शांतीमंत्राचा त्यावर घोष। करिता शंकरासी संतोष।
ऐकणाऱ्याचा विरे रोष। श्रोते होती गंभीर शांत॥७२

शंकराचे सदा गूढ चिंतन। मी करेन पण मी कोण?
शरीर इंद्रिय अथवा मन। कोणते माझे सत्य रूप॥७३

प्रवास चालला उत्साहात। प्रवेशला नर्मदेच्या प्रदेशात।
कानावर येई वृत्तांत। हकूहक श्री गोविंदयतींचा॥७४

गुहेत लावून समाधी। बैसली शांत पवित्र मूर्ती।
सरल्या कित्येक दिनराती। परी बाहेर का न येती॥७५

पसरली कीर्ति दूरवर। शिष्य भक्तांचा वाढता परिवार।
गोविंदयतींचे नयन आतुर। कोणासाठी कळेना॥७६॥

पूर्वाश्रमीचे चंद्रशर्मा नाम। श्री गौडपादांचे शिष्योत्तम।
ज्ञानभक्तीचा जेथे संगम। तेच हे श्री गोविंदयती॥७७

गौडपादांनीही पाहिली वाट। केव्हा घडेल शिष्याची भेट।
घेऊन चंद्रशर्म्याची परीक्षा नीट। सोपविले त्या ज्ञानभांडारा॥

चंद्रशर्मा म्हणजेच गोविंदयती। गौडपाद घेता निवृत्ती।
त्यास गुह्य समजाविती। शिष्योत्तमासच ज्ञानदान॥

म्हणून यतीश्वर वाट पाहती। सर्वोत्तम शिष्याच्या भेटीची।
सोपवुनि पुंजी शास्त्राची। हस्तरूपी जाणे आपणही ८०
गौडपादद्वारे पातंजल योग। शुकमुनिद्वारे वेदान्त
तत्त्वज्ञान सगळे आत्मसात। गोविंदयतींनी केले॥८१॥

© www.madhaveeraghuveer.com

अपूर्व ठेवा हा ज्ञानाचा। शिष्योत्तमास द्यावयाचा।
योग परी केव्हा यावयाचा। सुवर्णक्षण तो मुक्ततेच।।२२।।

बाद्रव्यासव बदरिकाश्रम। नर्मदाकाठी अमरानक आश्रम।
स्थापुनि रक्षण्या वेदानधर्म। सदा राहती कार्यमग्न।।२३।।

शिष्यपरिवार जरी मोठा। परंपरा सांभाळेल ऐसा पठ्ठा।
केव्हा येईल नर्मदाकाठा। वाट पाहती रात्रंदिन।। २४।।

राखावया मन शांत। जाउनि नर्मदाकाठी गुहेत।
बैसले सविकल्प समाधीत। गोविंदयति सद्यःकाली।।२५।।

ऐकून सारा वृत्तांत। शंकर झाला आनंदित।
नर्मदातीरीच्या गुहेत। सद्गुरुभेट निश्चित।।२६।।

झपझपा मार्ग चालत। पोचला गुहेच्या दारात।
भक्त शिष्य किती तिष्ठत। यतिवर्यांच्या दर्शनार्थ।।२७।।

ते सर्वांचि झाले विस्मित। पाहुनि बालशंकर दारात।
तेजस्वी रुप नयन आर्त। स्वरा भासे अलौकिकत्व।।

पुसति कोठून येणे इकडे। जाणता पूर्वेपासून नर्मदेकडे।
हे कैसे बालवयात घडे। अपूर्व हट निष्ठेविणा।।२९।।

शंकर पुसे नम्रभावे। गुहेमाजी कैसे जावे।
दर्शन मज कैसे घडावे। काय पद्धत येथली।।३०।।

म्हणाति बाळा यतिदर्शना। मनाई नाही येथे कोणा।
कोण येईल अधिकाराविना। हवी येथे शुद्ध भावना।।

शंकर झाला अधीर। अंतरी गुरुदर्शनाचा हुंकार।
अष्टसात्विक भावांचा पूर। गुहेत जाई भावविभोर।।३२।।

© www.madhaveeraghuveer.com

देह घडाने आस्थिमय। गोविंदयती दिसती ज्योतिर्मय।
शंकर झाला तन्मय। गुहा कोष आनंदमय॥

गुरुशिष्यांची सिद्ध भेटी। लहरी उठल्या वातावरणी
दोघांच्याही नेत्रज्योति। आपोआप विस्फारित॥३४॥

गुहा पूर्ण प्रकाशित। दोघेही परस्पर पाहत।
शब्द उच्चारिती नकळत। ॐ नमः शिवाय॥३५॥

पडता कानी मंत्रोच्चार। सर्वमुखी आश्चर्योद्गार।
गोविंदयति आणि बालशंकर। हळूहळू येती गुहेबाहेर॥

लौकिकरूप देण्या भेटीस। गोविंदयति पुसती शंकरास।
बाळा सांग तुझा वृत्तांत। कोण तू दे ओळख॥

प्रश्न जरी वाटे सामान्य। गुरु शिष्य दोघे असामान्य।
उत्तर होते ज्ञानजन्य। चिदानन्दरूपः शिवोऽहं शिवोऽहम्॥

वेदान्तधर्माचे नेमके सार। बाल शंकराचे हे उत्तर।
शब्दात दडला अर्थ गंभीर। जाणावा पुढील अध्यायी॥

इति श्री आदि शंकर लीलामृत। नववा अध्याय समाप्त।
कृपा व्हावी सदा प्राप्त। ग्रंथ व्हावा पूर्ण सार्थ॥४०॥

शुभं भवतु। शुभं भवतु। शुभं भवतु॥

१२.४.२०१६

© www.madhaveenagruveer.com

॥ॐ॥

# अध्याय दहावा

जगद्गुरु श्री आदि शंकरा। वर्णिवे आपुल्या अवतारा।
अल्प ही कामना पूर्ण करा। वंदिते द्या आधारा॥१॥

मार्ग चालता प्रौढत्व। शंकरास जगदानुभवे कळे तत्त्व।
गुरु गोविंदयतींचे माहात्म्य। वर्णिले नवव्या अध्यायी॥

गोविंदयति पुसति प्रश्न। बाळा सांग रे तू कोण।
पटविण्या अंतरीची खूण। शंकर गाई आत्मषटक॥३॥

अहंकार अथवा बुद्धि मन। मी नाही अंतःकरण।
तसाच नाही पंचप्राण। रुप माझे सच्चिदघन॥४॥

ज्ञानेंद्रिय अथवा कर्मेंद्रिय। वायु तेज जल वा व्योम।
मी नाही महाभूत। रुप माझे सच्चिदानंद॥ ५॥

लोभमोहादि मनोभाव। पापपुण्यासि नाही ठाव।
पुरुषार्थाही नसे वाव। रुप माझे म्हणजे शिव॥६॥

मार्गी जे स्फुरले स्तोत्र। शंकर गाई उत्स्फूर्त।
मधुर स्वर भाव आर्त। सर्व झाले मंत्रमुग्ध॥७॥

संपता स्तोत्र सुंदर। नतमस्तक झाला शंकर।
गोविंदयतिंच्या पायावर। स्वतःस अर्पिले शिष्यभावे॥

कळली अंतरीची खूण स्पष्ट। गोविंदयति झाले संतुष्ट।
संपले आता पहाणे वाट। समोर उभा पट्टशिष्य॥ ९॥
सांभाळीत लोकव्यवहार। म्हणति प्रेमे सर्वांसमोर।
वाट पाहिली आजवर। भेटलास बाळा शिष्यवर॥१०

तुझे मनोरथ पूर्ण करीन। संप्रदायाचे सर्व ज्ञान।
तुझ्या हाती सोपवीन। वैदिकधर्मा प्रस्थापी॥ ११॥

© www.madhaveeraghuveer.com

दण्डग्रहणादि चिन्हांकित। सन्यास दिला विधीपूर्वक।
नाम दिधले नवीन। श्रीमत् शंकर भगवत्पादाचार्य॥

गुरूशिष्याची अपूर्व जोडी। वेदान्ताची समान गोडी।
शास्त्रातील गूढ कोडी। गुरु सांगे उलगडोनि॥१३॥

प्रथम वर्षी शिकवला हठयोग। दुसरे वर्षी राजयोग।
तिसरे वर्षी ज्ञानयोग। शंकर करी आत्मसात॥१४

अनुभूतीसह अध्यात्म। गुरुकडून होता प्राप्त।
संशय होऊनि सारे समाप्त। अनुभवले जीव तोच शिव॥

गाईल्या स्तोत्रांचे मर्म। शंकर मनी ठसले पूर्ण।
आत्मज्ञाने भरे अंतःकरण। उमजे निर्वाणातील पूर्णत्व

शंकर जणू ज्ञानातीत। गोविंदयति समाधान पावत।
नर्मदातीरी आपुल्या गुहेत। पुन्हा बैसले समाधिस्थ॥
संकल्प शंकराच्या कसोटीचा। क्षण कठोर परीक्षेचा।
सिद्धी शास्त्र तत्व सर्वांचा। समन्वय साधेल हा कैसा?

जरी कसोटीस पुरा उतरेल। नर्मदाकाठ सोडून जाईल।
काशीक्षेत्री पुढे होईल। शंकराचे कार्य विस्तारित॥१८॥

वर्षाऋतुचा होता समय। नर्मदा वाहे दुथडी भरून।
सविकल्प समाधि लावून। गुहेत बैसले गोविंदयती॥
अचानक येई महापूर। पाणी गुहेपर्यंत काठावर।
चढत चालले भराभर। भयभीत झाले सर्वजण॥२१

शंकरास म्हणती सांगा सांगा। नर्मदेचा वेगळा रंग।
जरी ना केला समाधिभंग। यतिवर कैसे वाचतील?
तुज घेणे निर्णय काही। काय करू सांग लवलाही।
कालक्षेप करणे योग्य नाही। पूर वाढतो क्षणोक्षणी॥२२॥

© www.madhaveeraghuveer.com

होऊ नका गलितगात्र। शंकर म्हणे आळवा शास्त्रा।
माता का गिळते कधी पुत्रा? आतुर ती चरणस्नाना॥२५

कमंडलु ठेविला गुहाद्वारी। तथेच बैसला हात जोडुनि।
प्रार्थी मधुर स्तोत्र गाऊनि। विनवी अनावर नर्मदेसी॥

कैसा शंकराचा विश्वास। पूर्वी वळविले पूर्णेस।
आता अडविणे नर्मदेस। होईल का तो यशस्वी?॥२६॥

गुहेपर्यंत येई पाणी। कमंडलुत शिरता थबकुनि।
संपूर्ण संतुष्ट होऊनि। परते मागे क्षणोक्षणी॥२७॥
गाऊनि नर्मदाष्टक आर्तस्वरे। शिष्योत्तम तो संकट निवारे।
हळूहळू नर्मदा ओसरे। गुरु समाधि ना भंगली॥२८॥

निश्चये कैसा बैसला शंकर। चित्त विचलित ना क्षणभर।
लोक करिती जयजयकार। वार्ता पसरे सभोवार॥२९॥

संकल्प समाधिचे उत्थान। गोविंदयति सोडून आसन।
विचारती का जमले जन। कशास्तव हा जयघोष?३०॥

जन सगळे अचंबित। सांगाति घडला वृत्तांत।
जल कैसे अडवले कमंडलुत। वर्णन पूर्ण रसभरित॥३१॥

शिष्याचा तो पराक्रम। गोविंदयतिसी सांगावा यथाक्रम।
प्रत्येकास हवा अग्रक्रम। शंकर मात्र उभा मौन॥३२॥
ऐकून प्रसंग सविस्तर। म्हणति उतरला पुरेपूर।
कसोटीस माझ्या शंकर। खरा भगवद् पादाचार्य॥३३॥

यतिवर्यांना पडला मोह। शंकराचा प्रेमळ संग।
का करावा आताच भंग। आश्रमी रंगाचा बेरंग॥३४
लोकांची मति झाली गुंग। स्मरति तो अघटित प्रसंग।
शंकराचे गुण गाण्यात दंग। म्हणति खराच शिष्योत्तमा॥३५

© www.mdraveeraghveer.com

गोविंदयति विचारात मग्न। न-हेत-हेचे करुनि तर्क।
शंकरासि दाविणे काशी मार्ग। विलंब नको फार॥

बोलाविती शंकरास जवळ। जाणिले रे तुझे तपोबळ।
व्यर्थ जाता नये काळ। प्रस्थान ठेविणे काशीचे॥

काशीत राहती श्रेष्ठ पंडित। विद्वत्सभा चाले नित्य।
आपले मत मांडणे यथातथ्य। तेथेच पूर्ण उमगेल॥

मजजवळी होते ते दिले। तूही ते सर्वस्वी संपादिले।
परंतु यश लौकिकातले। आवश्यक जीवन ध्येयास्तव॥

संपता हा वर्षाकाळ। नर्मदाकाठीचा संपवी खेळ।
पाहुनि सुयोग्य वेळ। जावे बाळा काशीस॥

दूर राहिली पूर्णा मातेसह। सोडणे नर्मदाही गुरुसह।
गंगाकाठ गाठणे शिष्यांसह। शंकर कष्टीसा खिन्न॥

मनी योजिले जे कार्य। त्यास्तव कष्ट अनिवार्य।
आदेश देती जे यतिवर्य। सिद्धीस नेईल माझे ध्येय॥

समजावी मनास विवेके। भावभावनांचा कल्लोळ आवरे।
गोविंदयतींना अत्यादरे। विनवी द्यावा उपदेश॥४३॥

नर्मदाकाठी गुरुगृही। गोविंदयति शंकराचार्यास।
देती कोणता उपदेश। जाणावा पुढील अध्यायी॥

इति श्री आदि शंकर लीलामृत। अध्याय दहावा समाप्त।
कृपा व्हावी सदा प्राप्त। ग्रंथ होवो पूर्ण सार्थ॥

शुभं भवतु। शुभं भवतु। शुभं भवतु॥

१३.४.२०१८

© www.madhaveeraghuveer.com

॥ॐ॥
## अध्याय अकरावा

जगद्गुरु श्री आदिशंकरा। वर्णावे आपुल्या अवतारा।
अल्प ही कामना पूर्ण करा। वंदिते या आधारा॥१॥

गोविंदयति आणि शंकर। गुरुशिष्याची जोडी अमर।
परस्परांवर प्रेम अपार। वर्णिले दहाव्या अध्यायी॥२॥

शंकरास प्रेमे आलिंगिले। हृदयी त्या दृढ धरिले।
हृदयीचे गुह्य प्रकट केले। उपदेशाती प्रसन्नपणे॥३॥

कमंडलुत नर्मदा लीन। नास्तिकादि वादांचे खंडन।
अद्वैत मता दे उथ्यस्थान। करावा सर्वत्र संचार॥४॥

गौडपादे जी विद्या दिधली। ती सर्व तुज शिकविली।
सांग काही आहे का उरली। जिज्ञासा एखादी तुझ्या मनी॥

मी जाणते रे शंकरा। अवतरलास तू चंद्रमौलिश्वरा।
अद्वैताची दीर्घ परंपरा। उजळण्या आलास भूवरी॥६॥

लौकिकातील व्यवहार। करुनि घे प्रसन्न विश्वेश्वरास।
तसेच माता भवानीस। आता गाठावे काशीक्षेत्र॥७

जरी तुज काही विचारणे। विचार बा निःसंकोचपणे।
आता आहे मजासि जाणे। निजधाम ने गाठणे॥८॥

शंकर बोले गद्गद स्वराने। गुरुवर्यांची धरुनि चरणे।
कशाचे काय मागणे। तुम्ही दिधले अपार॥९॥

पितृऋण तसेच गुरुऋण। आहे मज फेडणे पूर्ण।
दाखविला जो मार्ग आपण। चालेन त्यावर आयुष्यभर॥

परी मनी एक आशा। भेटतील का मज गौडपाद।
देतील का मज दर्शन। जगद्गुरु व्यास बादरायण।।

संतोषले गुरु गोविंदयति। म्हणती कैसा हा शुद्धमती।
जा बाळा तू काशीक्षेत्री। लाभेल तुज जे वांछिसी।।

आलास एकटा नर्मदेपाशी। शिष्यांसह जावे गंगेपाशी।
तेथून पुढे बदरीक्षेत्री। ज्ञानयज्ञाची पूर्णाहुती।।१३।।

मनी साठवून गुरुमूर्ति। त्यांच्याच आज्ञेची करायपूर्ति।
जनमनी स्थापण्या वेदमूर्ति। शंकराचार्य निघाले काशीस।।

मार्गी असती जरी काटे। कधीही ना त्या भय वाटे।
वेद-स्तोत्र गाता स्वर दाटे। प्रवास भल्या पहाटे।।

लोकांस वाटे कौतुक। वाढत चालला लौकिक।
मार्गात भेटती अनंत लोक। वैदिक धर्माचे अभिमानी

मनात म्हणती चालला कोण। नास्तिक मतांच्या कळोखात।
वेदांताचा महिमा गात। मिळाला आम्हा आधार।।

आला कालडी गावातून। नर्मदाकाठी संन्यास घेऊन।
ऐकता म्हणती हासून। आमच्यातील आमुचा हा।।१८।।

रक्षावया नास्तिकांच्या हल्ल्यातून। उत्तरेतील ब्राह्मण।
पूर्वी गाठती दिशा दक्षिण। त्यांच्यातील हा धर्मरक्षक।।

शंकराचार्य घेती अनुभव। जनमानसाचा कैसा स्वभाव।
नास्तिकांचा करण्या पराभव। आहे का समाज समर्थ।।
जाणत नाहीत हे समर्थ। परी अंतरी भाव यथार्थ।
व्यक्त करिती इच्छितार्थ। वैदिकधर्म व्हावा सुस्थापित।।

© www.madhveeragriweer.com

प्रार्थिती लोक देवतास। घ्यावे आता अवतारास।
वेदांतध्वजा उभारण्यास। समर्थ ज्याचा ज्ञानाभ्यास॥२२॥

अल्पही सामर्थ्य दिसता। आशादीप मनी तेवता।
सहाय्यास उभारुनि हाता। स्वेच्छेने पुढे येतात॥२३॥

शक्तिसंपन्नांच्या जोरावर। इतरांचा करणे पराभव।
मार्ग उद्भवला हा अभिनव। परी वेदान्त्या तो अमान्य॥

अनुभूतीसह आत्मज्ञान। हेच वापरुन साधन।
वैदिक घेती जिंकून। परमतवाद्यांचे अंतःकरण॥२५

त्यासाठी वादभिक्षा मागून। अशास्त्रीय मते खंडून।
शास्त्रीय मतांचे मंडन। वेदधर्माचे प्रस्थापन॥२६॥

परी ऐसा ज्ञानसूर्य। केव्हा प्रगटेल भूतलावर।
जगद्गुरुंचा व्हावा अवतार। मनी आतुर हे सर्वजण॥

ऐसी वेदनिष्ठा अपार। शंकराचार्य देती आश्वासन।
करील श्री विश्वेश्वर पूर्ण। मनोरथ तुम्हा सर्वांचे॥२८

प्रवास करिता ऐसा नित्य। आचार्य समजले यथातथ्य।
का धाडिती मज गुरुवर्य। करण्या दीर्घकाल देशाटन॥

विखुरलेले देशाभिमानी। कोणते स्वप्न राहती धरुनि।
याविषयी मी अज्ञानी। होतो राहिलो गुरुगृही॥३०॥

सुरु करिता देशाटन। सरत चालले अज्ञान।
प्रत्यक्ष भेटता विविध जन। अनुभवकक्षा विस्तारल्या॥

जरी सर्वसम्मत मूळ वेद। अर्थान्तरे होती मतभेद।
वाढले किती हे पंथोपपंथ। हवा साधाया समन्वय॥

© www.madhaveeraghuweer.com

ऐसी परिस्थिती पाहुनि। वादविवादांचे मर्म जाणुनि।
पराजित करणे पंथाभिमानी। भेद नाशुनि ऐक्य साधणे॥

जरी कोणी करील वितंड। आपणासी साधणे संवाद।
मान्यता पावेल अद्वैतवाद। ऐक्यसमत्वाचे तेच मूळ॥

काशीत कित्येक विद्वान। भेटतील अनेक पंडित।
आपापल्या पंथाचे महंत। त्यांच्याही वादाचा हवा अनुभव॥

कैशा होतात वादसभा। कैसे चालतात वादविवाद।
कैसी ठरते हारजीत। न्यायाधीश बनते कोण?॥३६॥

सहयात्रींचे मनोगत। जाणून घेत शंकराचार्य।
गोविंदयतींची। आज्ञा शिरोधार्य। मानून प्रवेशती काशीस।

कैसा झाला काशीवास। मिळाली का दिशा जीवनास।
गंभीर गहन लीलाचरित। जाणावे पुढील अध्यायी॥

इति श्री आदि शंकर लीलामृत। अकरावा अध्याय समाप्त।
कृपा व्हावी सदा प्राप्त। ग्रंथ होवो पूर्णसार्थ॥३७॥

शुभं भवतु। शुभं भवतु। शुभं भवतु॥

१४.४.२०१६

© www.madhuraveeraghuveer.com

॥ ॐ ॥

## अध्याय बारावा

जगद्गुरु श्री आदिशंकरा। वर्णावे आपुल्या अवतारा।
अल्प ही कामना पूर्ण करा। वंदितो द्या आधारा॥१॥

आशीर्वाद गुरुंचे घेउनि। काशी गाठी नर्मदा सोडुनि।
अनुभव लाभला यात्रेतुनि। वर्णिला मागील अध्यायी॥२॥

विश्वेश्वराचे दर्शन घेणे। भावे भवानीसी विनवणे।
भोवती जे घडे ते पाहणे। त्रिकाल गंगास्नाना॥३॥

हाच नेम श्री शंकराचार्यांचा। काशीस येता सुरु झाला।
वरपांगी सर्वांना विरंगुळा। प्रवास अन्ती प्राप्त झाला॥४॥

आचार्यांना एकच ध्यास। प्रसन्न होवो शूलपाणी।
भिक्षा देवो आई भवानी। वैराग्य आणि ज्ञानाची॥५॥

सर्व शिष्य भक्तांसाठी। करिती श्रद्धेने अनुष्ठान।
घाटावर चाले प्रवचन। नित्य गंगेकाठी अध्ययन॥६॥

श्रवणार्थ जमती जिज्ञासु। शिष्यभावाने ज्ञानपिपासु।
संन्यासदीक्षेस्तव मुमुक्षु। नित्य शंकराभोवती॥७॥

सर्वांचे करिती समाधान। वेदान्तविचारी नसावे न्यून।
त्यासाठी सतत चिंतन। आणि चाले आत्मशोध॥८॥

जैसा विचार तैसाचि आचार। हाच शुद्ध व्यवहार।
वेदान्ताचा करण्या प्रसार। आचार्य पाळिती निष्ठेने॥

निर्वाणषट्काचे अंतरंग। अनुभविले जे गुरुकृपेने।
लोकांपर्यंत यथार्थपणे। कैसे कधी पोचेल?॥१०॥

प्रत्येकाचे स्वस्वरुप। जेथे नाही जातिभेद।
ऐसे सांगती चारी वेद। कैसे पटावे सर्वांस? ॥११॥

एके दिवशी शिष्यभक्तांसह। मनी ह्याच विचार करीत।
गर्दीतून वाट काढत। निघाले विश्वेश्वर दर्शना ॥१२॥

आधीच वाट लहान। जा ये करिती थोर सान।
शिवाशिवाचे राखीत भान। सर्वांची चाले लगबग॥

दिसता आचार्यांचा जथा। वाट देती ज्यादरुन।
दूर होती आपण होऊन। भाविक भक्त इतरजन ॥१४॥

मार्गात एका बोळापाशी। चार कुत्री हाती धरुन।
एक चांडाळ वाट अडवून। उभा दिसे शांत रीती ॥ १५

रुष्टीस धरुन आचार्य। म्हणती चांडाळा होई दूर।
शब्द येती कानावर। परि वाट सोडेना ॥१६॥

उच्चस्वरे सांगे शंकर। मार्ग माझा मोकळा कर।
चांडाळा तू दूर सर। दूर सर दूर सर ॥१७॥

न करता वाट मोकळी। चांडाळ पुसे शंकरासि।
कोणास दूर सर म्हणसि। सांग जरा समजावुनि ॥ १८

मी अज्ञानी चांडाळ। न समजे हा भेदाचा खेळ।
तुझा माझा का नाही मेळ। सांग कैसे व्हावे दूर ॥१९॥

तुझ्या माझ्या देहात। फरक कोणता निश्चित।
अन्नमय असते ना पोशित। अस्थिमासमय देह आपुले॥

आहे जर सर्वत्र एक। चेतविणारे चैतन्य।
मग का करणे दोघां भिन्न। कोण शिव कोण आशिव॥

©www.madhaveeraghuveer.com

ऐकता प्रश्न चांडाळाचे। सर्वजण भांबावले।
म्हणति हे चांडाळ माजले। कैसे प्रश्न हे उर्मट ॥२२॥

परी आचार्य मनि उमजले। वेदान्ताचे मर्म सगळे।
चांडाळमुखे स्पष्ट झाले। अंतर्यामीचा शिव प्रगटला ॥२३॥

धावुनि धरती चरण। चांडाळास जाती शरण।
म्हणती गुरुसमान आपण। सर्वांसमक्ष दिधला बोध ॥२४

देहाच्या बाह्य उपाधिमुळे। अज्ञाने भेदाभेद सगळे।
जीवाने व्यर्थ हे कल्पिले। अंतर्यामी एकचि शिव ॥२५॥

हे तत्त्व ज्यासी कळले। कोणतेही जाति लिंग असले।
त्याची मी वंदीन पाउले। मजासि तो गुरुसमान ॥२६॥

या घटनेचा मूळ भाव। अद्वैत तत्त्वाचा अनुभव।
मनी राखावा सद्‌भाव। तरीच मिळेल खरी वाट ॥२७॥

संतोषे हासे चांडाळ। शंकरास उठवी आलिंगून।
बघता बघता गेला मिसळून। गर्दीत कोठे दिसेना ॥२८॥

लोक पुसती काय घडले? स्पृश्यास्पृश्यतेचे बंधन ढिले।
सर्वांसमक्ष आपणचि केले। काय कारण सांगावे ॥२९॥

आचार्य सांगती सर्वांस। स्तुनि मनीषापंचक स्तोत्रास।
विसरावे बाह्य रूपास। जरी जाणणे सत्य रूप ॥३०॥

सामान्यास पटावे तत्त्व। म्हणति प्रकटले महादेव।
घेऊनि अमंगळ चांडाळभाव। कृपा करण्या सर्वांवरी ॥३१

©www.madhaveeraghuveer.com

अरे अहिंसेचे माजवुनि बंड। बौद्ध मतवाघोचा अहेगंड।
अस्पृश्यतेचे निर्मी पाखंड। मांसाहारी जना ठेवी दूर॥३२

करिता खोल विचार। माणसापासून माणूस दूर।
करणारी रूढी क्रूर। हळूहळू सर्वत्र फैलावली॥३३॥

अस्पृश्यता व्हावी अमान्य। जाणावे अंतरीचे चैतन्य।
मोडावी रूढी अज्ञानजन्य। म्हणुनि प्रकटले विश्वेश्वर॥३४

घेउनि विश्वेश्वराचे दर्शन। आपापल्या मार्गे जाती जन।
अंतरी घुमे आचार्यवचन। भेदाभेद अमंगळ॥३५॥

शंकराचार्य मनी प्रसन्न। गैररूढींचे करण्या खंडन।
कोणत्याही रूपे भगवान। होईल मज सहाय्यवान।

ऐसे मनोरम प्रसंग। काशिक्षेत्री घडले कित्येक।
परी त्यातील प्रत्येक। प्रकटवी वैदिक धर्म॥३७॥

किती काळ गेला काशीत। प्रकटति सप्तरंग जीवनात।
कैसे होई कार्य वृध्दिंगत। जाणावे पुढील अध्यायी॥

इति श्री आदि शंकर लीलामृत। बारावा अध्याय समाप्त।
कृपा व्हावी सदा प्राप्त। ग्रंथ होवो पूर्णसार्थ॥ ३९॥

शुभं भवतु। शुभं भवतु। शुभं भवतु॥

१५.४.२०१६
रामनवमी.

©www.madhaveeraghu.com

॥ॐ॥

# अध्याय तेरावा

जगद्गुरु श्री आदिशंकरा। वर्णावे आपुल्या अवतारा।
अल्प ही कामना पूर्ण करा। प्रार्थिते द्या आधारा॥१॥

श्री विश्वेश्वराने होऊन प्रकट। आचार्यांसी दाविली वाट॥
थोर सूत्रांचा करावा नायनाट। वर्णिले द्वादश अध्यायी॥२॥

प्रसंग गेला घडून। आचार्य करिती एकांती मनन।
माझ्या विचारातील काही न्यून। गेले ईशकृपे सरून॥३॥

पुन्हा सुरु नित्यनेम। घाटावर अध्ययन अध्यापन।
सर्वांस करावे विद्यादान। योग्यतेनुरूप॥४॥

उरकुनि गंगेचे स्नान। चढता गंगेचा घाट।
कानी व्याकरणाचा पाठ। स्वर वार्धक्ये जर्जर॥५॥

शंकराचार्य पाहती थबकून। कोणी एक वृद्ध ब्राह्मण।
सर्व शक्ति एकवटून। करीत बसला घोकंपट्टी॥६॥

वृद्धाच्या हाती सुटले बळ। निसटले हातातून पंचपात्र।
पायऱ्यांवरून गडगडत। शब्द उमटे ठण् ठण्॥७॥

आचार्य मनी दाटे करुणा। पंचपात्र देत ब्राह्मणा।
हासून करिती गोड भजना। चर्पटपंजरिका नामे सार्थ॥

वृद्धा आता नको व्याकरण। समीप येत आहे मरण।
आता सांग रक्षिल कोण। तुजला गोविंदावाचून॥९॥

धरुनि धनाची कामना। आप्तेष्ट हे होती गोळा।
परी होता लोळागोळा। कोणी ना विचारतील॥१०॥

लोक कोण आपण कोण। प्रपंच मिथ्या आता जाण।
सोडूनि सारे मीपण। करावे नामस्मरण॥ ११॥

व्रते दान वा उपासना। तीर्थाटन वा उपासना।
करी न जाणता आत्मज्ञाना। मोक्षप्राप्ति कदापि ना॥

आचार्यांचा स्वर मधुर। भावभक्तीला आला पूर।
सहजच कंठी उमटे सूर। नारायण नारायण॥ १३॥

निमित्त झाला वृद्ध ब्राह्मण। सहजचि घडले तत्त्वनिरुपण।
नको घालवू हरिभजनाविण। मानवा रे आपुले जीवन॥

झाली वर्षे दोन सहस्रांवर। चर्पटपंजरिका स्तोत्रचि सुंदर।
आजही तोषवी अंतर। भज गोविन्दं भज गोविंद॥

महिमा नामाचा जरी थोर। सहस्र नामे श्री विष्णुस।
योग्य कोणते परी स्मरणास। गोविंद किंवा नारायण॥

सामान्यांचे साधे प्रश्न। त्यांचे करणे समाधान।
विष्णुसहस्रनामावर। करिती भाष्य सर्वप्रथम॥

प्रत्येक नावाचा योग्य अर्थ। स्पष्ट करिती शब्दांचीगुंफण।
अथवा सांगून व्याकरण। तेणे होई सोपे स्मरण॥

रचिली पुढे ती अनेक भाष्ये। मानिती विद्वान सर्वश्रेष्ठ।
त्याचीच झाली मुहूर्तमेढ। विष्णुसहस्रनाम भाष्याने॥

छोट्या मोठ्या कार्यातून। विशाल कार्याचा श्रीगणेशा।
करुणा घ्यावा तुम्ही महेशा। आचार्य विनविती
परमेश्वरा॥ २०॥

© www.madhaveeragnuveer.com

सामान्यपणे लोक म्हणति। कैसी अपुर्व काव्यस्फूर्ति।
भाषा किती ओघवती। लालित्यपूर्ण रसाळ कृति॥२१॥

जैसी जैसी वाढे कीर्ति। गावोगावींचे निपुणमति।
शिष्य व्हावया धावूनि येती। आचार्यांपाशी प्रतिदिना॥२२॥

ऐसा वाढता शिष्यगण। परस्परात चाले वरचढपण।
आचार्यांसि प्रिय कोण। आपल्यातील मी का तो॥२३॥

शिष्यांच्या मनी जरी भाव। गुरुसी व्हावे प्रिय आपण।
अगाध गुरु निष्ठेवीण। होईल कैसा भाव पूर्ण॥२४॥

एखाद्या प्रसंगानिमित्ते। गुरुनिष्ठेचे दर्शन घडावे।
गुरु शिष्य नाते स्पष्ट व्हावे। सर्व संशय संपुष्टा जावे॥

आचार्यांच्या मनीचा विचार। प्रत्यक्षात आणणार ईश्वर।
त्याचेच कार्य तो करणार। योग्य समयी पृथ्वीवर॥

एके दिवशी शिष्य सनंदन। उभा होता पैलतीरावर।
शंकराचार्य म्हणती येई लवकर। खोळंबा साऱ्या कामाचा॥

नव्हती काठावर नाव। पोहण्याच्या नव्हता सराव फार।
हाक मारिती गुरुवर। सनंदन धावला सत्वर॥२८॥

अपूर्व निष्ठा आचार्यांवर। सनंदन म्हणे गुरु तारणार।
साहसे पाय ठेवी पाण्यावर। सांगे ओरडून आलो आलो॥

लोक म्हणती कैसा अविचार। होणार नाही पैलपार।
नक्कीच हा बुडणार। पात्र गंगेचे का आहे उथळ?॥३०॥

© www.madhaveeragnuveer.com

सनंदन जेथे ठेवी पाऊल। तेथेच प्रकटे विशाल कमळ।
वेगे पावला आचार्यांजवळ। लक्ष्मीनृसिंहाची कृपा॥

लोक म्हणती खरोखर। गुरुच शिष्या तारणार।
पैल पार करणार। ज्याची निष्ठा अपार॥३२॥

शिष्यास जडला सेवेचा नाद। गुरु घालिती जेव्हा साद।
सनंदनाचा झाला पद्मपाद। धावला वेगे गुरुकडे॥३३॥

जाणती मनी शंकराचार्य। ईश्वरे नेमिला सनंदन।
करावया माझे रक्षण। शिष्यरुपी माझे जवळ॥३४॥

आचार्यांचे जीवनक्रम। काशीवासियांसी परम सुखद।
परी आचार्यांच्या मनी खेद का। भेटेना माताभवानी॥३५॥

काय घडला प्रसंग। पूर्ण झाली कामना कैसी।
अद्भुत रसाळ वृत्तांतासी। जाणावे पुढील अध्यायी॥

इति श्री आदिशंकर लीलामृत। तेरावा अध्याय समाप्त।
कृपा व्हावी सदा प्राप्त। ग्रंथ होवो पूर्ण सार्थ॥३६॥

शुभं भवतु। शुभं भवतु। शुभं भवतु॥

१७-४.२०१६

© www.madhaveeraghuveer.com

॥ॐ॥

# अध्याय चौदावा

जगद्गुरु श्री आदिशंकरा। वर्णावे आपुल्या अवतारा।
अल्प ही कामना पूर्ण करा। प्रार्थिते द्या आधारा॥१॥

समुदाय वाढे नित्य शिष्यांचा। अधिकार जाणुनि प्रत्येकाचा।
आचार्य करिती बोध कैसा। वर्णिले तेराव्या अध्यायी॥

श्रवण मनन निदिध्यासन। वेदान्त मार्गाचे साधन।
नित्य स्वतः आचरुन। आचार्य शिकविती इतरा॥३॥

श्री शंकराचार्यांचे दर्शन। सर्वांस करी प्रसन्न।
स्वतः काहीसे खिन्न। भवानी देईना साक्षात्कार॥४॥

अन्नपूर्णेचे करुनि पूजन। तिच्याचपाशी भिक्षा मागून।
म्हणति दे वैराग्य ज्ञान। दावी आता मार्ग पुढचा॥५॥

प्राप्त जाहले जरी ज्ञान। तैसेच वृत्तीत वैराग्य।
परी हवे सातत्य। साधाया मुक्ति सायुज्य॥६॥

घेतला जरी संन्यास। पुरुषार्थ नुरले कामअर्थ।
परी सतत लोकसंग्रहार्थ। श्रेष्ठांनी जपावा धर्माचार॥७॥

तैसाच हा शंकरावतार। आचार्यरुपे या धरणीवर।
अन्नपूर्णेचे ठोठाविती दार। घडो आई साक्षात्कार॥८॥

नित्याप्रमाणे पहिल्या प्रहरी। स्नानास्तव घाटावरी।
आचार्य जाती घाई घाई। एकलेच शिष्याविना॥९॥

स्पष्ट काही दिसेना। मार्गात कोण आहे कळेना।
जाणले, करी कोणी रुदना। करुणावतार थांबले॥१०॥

© www.madhaveeraghuveer.com

निरखुनी पाहती आचार्य। पतीचे शव घेऊनि मांडीवर।
कोणी स्त्री बैसली वाटेवर। खिन्न शोकमग्न बिचारी॥

तिजला विनविती मृदुशब्दे। मार्गातून जरा दूर होणे।
मोकळी वाट होईल जेणे। मजसि आहे स्नान करणे॥

नाही कोणती हालचाल। मिळाले ना काही उत्तर।
आचार्य विनविती हळुवार। बाजूस घ्यावे शव थोडे॥

न पाहता आचार्यांकडे। म्हणे "तुम्हीच शवास सांगावे।
आपले आपण त्याने हलावे। वाट द्यावी तुम्हा सत्वरे"॥

पतिवियोगाचा आघात। तेणे ही स्त्री शोकार्त।
बोलते ऐसे विपरीत। शवास सांगे हलावे॥

ऐसा करुनि विचार। कळवळले श्री आदिशंकर।
आधीच ते करुणासागर। कळेना काय सांगावे॥

कैसी झाली हिची स्थिती। पतिनिधनाने भ्रष्ट मति।
हळुवारपणा आणुनि चित्ती। आचार्य करिती समजावणी॥

माये दुःखाने भांबावलीस। कैसे कोणी सांगावे शवास।
ते तर आहे चेतनाहीन। कैसे ऐकेल वा हलेल?॥

येणाऱ्या जाणाऱ्या सोयीचे व्हावे। आई शव जरा बाजूस घेणे।
अंत्यसंस्कार जेव्हा करणे। तेव्हा करावे शांतपणे॥

क्षणभर वातावरण पूर्ण स्तब्ध। उठे ना कोणताही शब्द।
एकाएकी म्हणे भगवत्पाद। तुम्हीच सांगा समजावून॥

का बरे शक्ति नसावी शवास। मीच हालवावे तयास।
तुम्ही सांगता ज्या तत्त्वास। गेले का सारे फोल॥

© www.madhaveeraghuveer.com

शक्तिनिरपेक्ष जे ब्रह्म। सर्व जर त्याचेच कर्तृत्व।
दूर सरावे हे शव। आपुले आपण एकटेच॥ २२॥

ऐकता ते सारे शब्द। वृत्तीत झाले स्फुरण।
जाणले मूळ विवेचन। प्रकृति - पुरुष, माया - ब्रह्म॥२३॥

कोण असावी खरे ही स्त्री। ऐसे कूट प्रश्न विचारी।
या गंगेच्या काठावरी। दुःखार्त शोकार्त अजूनही॥२४

नकळत आचार्य पुढे झाले। स्त्रीपुढे मस्तक नमविले।
मनोगत बोलाया उठले। परी काय आश्चर्य॥ २५॥

नव्हते घाटावर कोणीच। नाही स्त्री वा नाही शव।
मोकळी होती वाट सर्व। पुढे जाण्या ना अटकाव॥२६॥

आचार्य जाणाते मनोमन। आई भवानी झाली प्रसन्न।
अन्नपूर्णेने देऊन दर्शन। ब्राह्म मूहुर्ती घडविला साक्षात्कार॥

शंकराचार्य भावविभोर। मनी दाटली भक्ति अपार।
शब्द झाले साकार। भवानी अष्टक स्तोत्ररुपे॥ २८॥

सदा शरण मी तुझिया चरणी। शरणार्थी गे तुजपाशी।
सर्वस्वचि तू आई भवानी। तूच गति गे तूच गति॥२९

शब्दाशब्दामधुनि प्रकटे। सामान्यांसही जे भय वाटे।
संसारातील विविध संकटे। परी भवानी तारी तू गे॥३०॥

कुंठित होते जेव्हा मति। काय कैसी होईल गति।
कोणती दैवते मज रक्षिती। नाशी भवानी भवभीती॥

भवानीसी भावे भजता। चित्तात भरे प्रसन्नता।
आत्मविश्वास उजळे पुरता। मार्ग पुढचा स्पष्ट झाला॥

©www.madhaveeraghuveer.com

कोणी म्हणेल कैसी कथा। भवानी तेथे प्रकटता।
का न दिसली इतरा। चमत्कार की रेजकता।।३३।।

अंतर्यामीचे चैतन्य। जेव्हा होते प्रकटित।
तेव्हाच घडते अघटित। लोक म्हणती चमत्कार।।

जड चैतन्याच्या मननात। भवानी प्रकटे बुद्धीत।
आचार्यांच्या गहन चिंतनात। निष्पन्न झाले सत्यतत्त्व।।

आचार्यांसि कळली खूण। अद्वैताचे करिता समर्थन।
कोणतेही न रहावे न्यून। मातेने घातली ज्ञानभिक्षा।।

शव म्हणजे तरी काय? शक्तिविरहित ऐसा शिव।
शक्ति प्रगटता शिवात। शिवास मिळे जीवरूप।।

स्वतः शीघ्र करता गूढचिंतन। घाटावरती जो झाला भास।
स्पष्ट झाले आचार्यांस। प्रातिभासिक सत्तेचे रूप।।

प्रसन्न झाले शंकराचार्य। आनंदे आळविती अन्नपूर्णेस।
स्तुनि अन्नपूर्णाष्टकस्तोत्रास। भक्तिभाव प्रकटे यथार्थ।।

भक्तिमार्गास्तव देवता वंदन। स्पष्ट करण्या वेदान्तवचन।
घडल्या कोणत्या रचना। जाणावे पुढील अध्यायी।।

इति श्री आदिशंकरलीलामृत। अध्याय चौदावा समाप्त।
कृपा व्हावी सदा प्राज्ञ। ग्रंथ होवो पूर्ण सार्थ।। श्री।।

शुभं भवतु। शुभं भवतु। शुभं भवतु।।

१८.४.२०१६

© www.madhavevraghuveer.com

॥ॐ॥

## अध्याय पंधरावा

जगद्गुरू श्री आदिशंकरा। वर्णिवे आपुल्या अवतारा।
अल्प ही कामना पूर्ण करा। प्रार्थिते द्या आधारा॥१॥

कैसी भवानी प्रसन्न झाली। ज्ञानभिक्षा शंकरा घाली।
बुद्धिस परिपक्वता आली। वर्णिले मागील अध्यायी॥२॥

निर्विशेष ब्रह्माहुनि शक्ति। निराळी नसे केव्हाही।
परमसत्य हेचि पाही। शंकराचार्य उमजले॥३॥

प्रत्येकास हे का न कळे। जन्मे सत्य घेउनि संगे।
कोणत्या उपासनेने उमगे। येईल प्रत्यक्ष अनुभूति॥४॥

काशीक्षेत्री घडली उपासना। बोधक ठरली आचार्यांना।
चित्तशुद्धीस्तव नाना साधना। अंती जाणविती अद्वैत॥५॥

हवे कर्म हवी भक्ति। परी ती आहेत साधने।
चित्तशुद्धी साधे तेणे। पायाभूत जी आत्मज्ञाना॥६॥

आदिशक्ति माता भवानी। आचार्यांवर प्रसन्न होउनि।
साक्षात्कारे देई उघडुनि। ज्ञानचक्षूंचे दिव्य द्वार॥७॥

ज्ञानचक्षु ऐसा उघडता। सरली सर्व मूक चिंता।
उत्तर येऊ लागले हाता। कोणत्याही कूटाचे॥८॥

श्रुतीस्मृतीतील सिद्धांतांचे। स्वतःच करणे पूर्ण मंडन।
आणि करावे उलटे खंडन। धरोनि तर्क प्रतिप्रश्नांचा॥९॥

ऐशापरी निदिध्यासने। भाष्य उमलले बुद्धीत।
जे प्रतिपादिले तर्कसंगत। अजोड मानिती पंडित॥१०॥
सामान्यांसाठी सोपा मार्ग। कधी रचिती सुंदर काव्य।
स्तोत्रे भक्तिमार्गास्तव। लिहिली प्रसंगानुरूप॥११॥

© www.madhaveeraghuveer.com

काशीचे मूळ दैवतास । स्तोत्र कालभैरवाष्टक रचुन ।
अन्नपूर्णा स्तोत्र गाउन । वंदिले भक्तिने सर्वांसव ।।७२।।

ध्यानस्थ बसता आचार्य । मनी प्रकटले गोविंदाचार्य ।।
देती आदेश अनिवार्य । जावे बदरीक्षेत्रास ।। ७३ ।।

पूर्ण होईल आता मनोगत । आनंदित झाले शंकराचार्य ।
भेटतील का गौडपादाचार्य । परमाचार्य मजसी जे ।।

सोडणे मज काशीक्षेत्रा । सुटले का ते खरेच ।
उलगडे सारे काशीतच । प्रत्येकासी हे कूट ।।७५।।

काशी म्हणजे खरे काय । दोन अक्षरी सत्य दडले ।
काशीत जे मज लाभले । सर्वांसि तेचि सांगावे ।। ७६ ।।

ऐसा करिता सहज विचार । काशीपंचक रचना सुंदर ।
स्फुरली अंतरी मनोहर । रूप काशीचे स्पष्ट करी ।।७७

स्तोत्रातून केला साधा बोध । स्वतःत घ्यावा काशीशोध ।
तेणे अंतरी उपजेल प्रमोद । देह हाचि काशीक्षेत्र ।।७८।।

वसली तीर्थे अंतरात । गंगा म्हणजे ज्ञानाचा स्रोत ।
गुरुपदध्यान प्रयाग क्षेत्र । गया म्हणजे श्रद्धा दृढ ।।७९

साक्षी साऱ्या विश्वात्मा । विश्वेश्वर म्हणजे अंतरात्मा ।
विराजमान देही असता । देहचि जाणा तीर्थक्षेत्रा ।।८०।।

एकदा कोणी भाविक दोन । पुसे शंकरास विनवून ।
पूजेच्या यथार्थ सामग्री वीण । कैसे पूजावे विश्वेश्वरा ।
करुणासागर बोलले शंकर । चिंता होऊन हळुवार ।
पूजेचे कोणतेही उपचार । करावे उत्पन्न मनोभावे ।।

© www.madhaveeraghuveer.com

भक्त करिती जे काही अर्पण। बाळगुनि श्रध्दा भक्ति अनन्य।
विश्वेश्वरासी सर्वथा मान्य। मानसपूजा श्रेष्ठ साधन॥

गंगेचे करुनि स्तवन। रचिले मधुर गंगास्तोत्र।
महागणेशपंचरत्न स्तोत्र। वंदिता आदरे धुंडिराज॥२४॥

सजीव अथवा निर्जिव। आचार्य घेती सर्वांचा निरोप।
करुनि विश्वेश्वरा चंदनलेप। ठेविती सुमुहूर्ती प्रस्थान॥

पद्मपादादि अनेक शिष्य। सदा आचार्यांच्या बरोबर।
प्रत्येकाची निष्ठा प्रखर। आचार्य सेवेसी सदा तत्पर॥

सोडुनि मोकळे मैदान। करणे होते गिर्यारोहण।
यात्रा जरी अति कठीण। चित्त सर्वांचे श्रध्दापूर्ण॥२७॥

मनी उठता सद्भावना। अंतर्यामीची ती प्रेरणा।
सदैव करी मार्गदर्शना। नेणे विघ्नांचे हरण॥२८॥

पूजिला जो विश्वेश्वर। तोचि घेउनि जाणार।
सर्व संकटे हरणार। केदारनाथा भेटवील॥२९॥

सुरु झाला प्रवास नीट। काशी हरिद्वार ऋषिकेश।
झाला बदरीक्षेत्रात प्रवेश। योग्य समयी आचार्यांचा॥

क्षेत्री दोन सुंदर पर्वत। परी सूर्य येता वर किंचित।
वाटे ओघळते तेथे रजत। अलौकिक वैभव सृष्टीचे॥
उभे जणू सुवर्णाचे पर्वत। परी सूर्य येता वर किंचित।
पडता। पहिले सूर्यकिरण। दिसे शोभा अवर्णनीय॥३२॥

जरी पर्वता नाम हिमालय। तो तर सौंदर्याचे आलय।
साधका साधण्या मनोलय। निसर्ग देई पूर्ण साथ॥३३॥

©www.madhaveeraghuveer.com

शिष्यांनी साधावा मनोलय। स्वये पुजावे परात्पर गुरुवर्य।
कारिकांवर करुनि भाष्य। गौडपादे रचिल्या ज्या ॥३७॥

कैसे सुचति ऐसे विचार। भोवती येवढी सृष्टी सुंदर।
तरी कैसे भोगापासून दूर। साधक आणि शंकराचार्य॥

व्यवहारी लोकांचे अज्ञान। न कळे साधकांचे मन।
ब्रह्मानंदी जे सदा मग्न। होती सहज ऐशास्थळी॥

अलकनंदेचा खळाळ। वारे आदिशक्तिचा कल्लोळ।
भक्तिभावाची घेऊनि माळ। धावे भेटाया नारायण॥

हिमालयाची उत्तुंग शिखरे। जणू सांगति उच्चस्वरे।
पळती षड्‌रिपु सारे। यारे आनंद लुटाया॥३८॥

ऐशा सुंदर शांत प्रदेशी। शिष्यगणांसह येता शंकर।
भेटाया जे उत्सुक अनावर। विनविती चला मंदिरी॥

तप्तकुंडी करुनि स्नान। घ्यावया नारायणाचे दर्शन।
ठेवोनि चित्त शांत प्रसन्न। मंदिरी प्रवेशिती आचार्य॥

घडले काय देवालयी। तैसेच बदरी क्षेत्रामाजी।
कथा आचार्यांच्या भ्रमणाची। जाणावी पुढील अध्यायी॥

इति श्री आदिशंकरलीलामृत। पंधरावा अध्याय समाप्त।
कृपा व्हावी सदा प्राप्त। ग्रंथ होवो पूर्ण सार्थ॥

शुभं भवतु। शुभं भवतु। शुभं भवतु॥

१९.४.२०१६

© www.madhaveeraghuveer.com

॥ॐ॥
# अध्याय सोळावा

जगद्गुरु श्री आदिशंकरा। वर्णिवे आपुल्या अवतारा।
अल्प ही कामना पूर्ण करा। प्रार्थिते द्या आधारा॥१॥

भवानीसहित शंकर प्रसन्न। काव्यशक्ति झाली उत्पन्न।
भाष्य स्तोत्रे अर्थ रससंपन्न। वर्णिले मागिल अध्यायी॥२॥

मिळाला गुरूंचा आदेश। आचार्य सोडुनि वाराणशीस।
पोचले बदरीक्षेत्रास। विशाल बद्रीच्या मंदिरी॥३॥

दिसे शाळीग्राम शिळा समोर। परी कुठे ना मनोहर मूर्ती।
पूर्वाचार्ये जी केली प्रतिष्ठित। दिसेना चतुर्भुज नारायण॥४॥

अस्वस्थ मनी आचार्य। सगुणोपासनेस्तव देवालय।
असता घडला कोणता प्रलय। मूर्ती दिसेना मंदिरात॥५॥
पुजारी सांगती इतिहास। चिनी दरोडेखोरांचा त्रास।
मूर्तीचा करतील विध्वंस। म्हणून लपविली कुंडात॥६॥

मूळ मूर्ती परी सापडेना। म्हणूनि स्थापिली शिळा येथ।
पूजा चालविली नित्य। मूळ मूर्तीचा शोध व्यर्थ॥७॥

आचार्य उठले सत्वर। ध्यानमग्न कुंडाच्या तटावर।
लोक म्हणती थांबा यतिवर। प्राण गमवाल या प्रयत्नी॥८॥

आचार्यांचा दृढ विश्वास। शोधता हाच जलाशय।
नारायण हरेल प्राणभय। कुंडात उडी घेतली॥९॥

लोक झाले भयभीत। आचार्य केव्हा दिसतील।
आज आमुचे सर्वस्व जाईल। जरी ते प्राण गमावतील॥१०॥
जोडुनि हात भगवंतास। प्रार्थना करिती रक्षावयास।
मूर्तीरूपे लागावे हातास। होवोत विजयी आचार्य॥११॥

आचार्य येती पाण्याबाहेर। हातात मूर्ती मनोहर।
लोक तटस्थ काठावर। जाहले हर्षभरित।।१२।।
परी पाहता निरखून। मूर्ती दिसे खंडित।
आचार्य करिती विसर्जित। आणि घेती पुन्हा शोध।।१३।।

वारंवार येई हाता। तीच मूर्ती बोटे भग्न।
सर्वजण होती विचारमग्न। करावी का प्रतिष्ठापना।।१४।।

आकाशवाणी उठे स्पष्ट। मूर्तीस द्यावे पूर्वीचे स्थान।
कलियुगी हिचेच पूजन। मान्य करी नारायण।।१५।।

यथाशास्त्र मूर्तीचे स्थापन। मंदिरात करिती सर्वजण।
अभिषेक होम हवन। सुरु झाले नित्यपूजन।।१६।।

आकाशवाणी म्हणजे काय। सर्वांतरीचा सूक्ष्म विचार।
करोनि मात रुढींवर। स्पष्ट येई ओठावर।।१७।।
परशक्तीचे आक्रमण। मूर्ती खंडित होण्याचे कारण।
कधी न ठरावी अडचण। जीर्णोद्धार करण्यास।।१८।।

हे असे घडणार कलियुगी। परधर्मी अनेक सत्ताधारी।
वैभव लुटण्यास सर्वतोपरी। आक्रमतील भारत।।१९।।

करतील आपल्या सत्तामदे। मंदिरे मूर्ती सारी उध्वस्त।
न होता क्षणभर मोहग्रस्त। करावा सदा जीर्णोद्धार।।२०।।

आचार्यांचा विचार प्रशस्त। आदरे मानिती समस्त।
अनेक वेळा लुटले सोमनाथ। वैभव प्रस्थापित स्वातंत्र्योत्तरी।।

ऐसी देऊनि इतरा दृष्टी। आचार्य जाती व्यासतीर्थी।
आपली दृष्टी परमार्थी। ठेवूनि राहती ध्यानमग्न।।२२।।
जाहला केवढा प्रवास। बालवयात अपार सायास।
चिंता लागली सर्वांस। मिळेल का आचार्यांना विश्राम।।

© www.madhaveeraghuveer.com

ध्यान हाच ज्यांचा विश्राम। चिंतन हेच ज्यांचे काम।
जेथे राहती तेचि धाम। परिव्राजकाचे हेचि जीवन॥२४॥
जेथे जेथे करिती वास। विद्यादान करिती शिष्यास।
स्पष्ट करिती योगाभ्यास। ज्यासी ज्यात रुचि असे॥२५॥

जरी अल्पायुषी कार्य प्रचंड। चाले ज्ञानयज्ञ अखंड।
मोडावयाचे नास्तिक बंड। पुन्हा वेदान्ता उत्थान॥२६॥

ध्यानात झाले प्रकट। परात्पर गुरु गौडपादाचार्य।
जाणुनि आचार्यांचे भाष्य। मांडुक्यावरील भाष्याचे॥२७॥
संतोषे डोलविती मान। शंकरा तुझे अगाध ज्ञान।
आता तूच करी पूर्ण। प्रस्थानत्रयीवर भाष्य॥२८॥

गीता उपनिषद ब्रह्मसूत्र। आचार्य सांगती अर्थ गूढ।
कोणीही वेदान्तीन रहावा मूढ। शब्दाशब्दावर भाष्य सुरु॥२९॥

हिमालयातील नित्य भ्रमण। अथक चालला प्रवास।
केदारधाम गाठावयास। उत्सुक शिष्य परिवार॥३०॥
बदरीक्षेत्र ते केदारधाम। वाटेत लागे ज्योतिर्धाम।
आचार्य करिती मुक्काम। राजा तेथील सेवाव्रत॥३१॥

होऊ लागला शास्त्रार्थ। जमू लागले अनेक साधक।
तत्वचर्चा साधक बाधक। आचार्य करिती सर्वा मुग्ध॥३२

भाष्याचे सुंदर विवेचन। शिष्यही देती प्रवचन।
आनंदे डोलविती मान। सामान्य वा विद्वान॥३३॥
ज्योतिर्धामी अशी सुरवात। वेदान्ताचे प्रतिष्ठापन।
पूजेत आले पंचायतन। पंचमहायज्ञ घरोघरी॥३४॥

ज्योतिर्धाम ते केदार। प्रथम तीर्थ कल्पेश्वर।
रुद्रनाथ चवथा केदार। तुंगनाथ तिसरे तीर्थ॥३५॥

©www.madhaveeradhi...veer.com

हिमालयाची विशालता। सौंदर्य पावित्र्य मधुरता।
प्रत्येक स्थानी रमणीयता। मोहित करी सर्वांना॥७६॥

द्वितीय केदार मध्यमेश्वर। ओलांडुनी गाठती गौरीकुंड।
श्रमपरिहारास्तव हे तप्तकुंड। केदारनाथाच्या पायाशी॥
उत्तुंग शिखरी केदारधाम। त्रिकोणाकृती विस्तीर्ण पठार।
भगवान महादेवाचे मंदिर। पुराणकालीही प्रसिद्ध॥७७॥

जागृत देव केदारनाथ। भक्तांचे पुरवी सर्व मनोरथ।
कृपाप्रसादाची सदैव साथ। शरण जाता एकदा॥७८॥
मार्ग खडतर कठीण। कोण चालेल श्रद्धेवीण।
नामघोषात चालती चरण। भेटण्या शिवासी स्थाणुरूपा॥७९॥

केदारक्षेत्री आचार्य शंकर। पोचता सर्व शिष्यांसह।
जाणती ही शीतलता दुःसह। इतरांना नाही सोसणार॥८०॥

कोणी म्हणती शिष्या सोडून। गगनमार्गे कैलासगमन।
आचार्यांवर शिव प्रसन्न। देईले पाच स्फटिकलिंगे॥

तैसेच दिधली सौंदर्यलहरी। रचना स्तवमंत्र शास्त्रावरली।
नंदीने जरी हिसकावली। आचार्यांनी पूर्ण केली॥८२॥
केदारक्षेत्री परत जाता। स्थापिले वरलिंग नेपाळात।
नेपाळ नृपावरी वरदहस्त। आचार्य ठेविती प्रेमभरे॥८३॥

सोडिले शिष्यांसहित केदार। गंगोत्रीस स्थापून गंगामंदिर।
उत्तरकाशीस पोचले शंकर। तपोभूमि ती अतिप्राचीन॥
प्रसंग घडले रोमहर्षक। जे पुढील प्रवासात।
त्या सर्वांचा आत्मवृत्तांत। जाणावा पुढील अध्यायी॥

इति श्री आदि शंकरलीलामृत। सोळावा अध्याय समाप्त।
कृपा व्हावी सदा प्राप्त। पूर्ण होवो ग्रंथ सार्थ॥८६॥

शुभं भवतु। शुभं भवतु। शुभं भवतु॥

© www.madhaveeraghuveer.com

॥ॐ॥

# अध्याय सतरावा

जगद्गुरु श्री आदिशंकरा। वर्णिवे आपुल्या अवतारा।
अल्प ही कामना पूर्ण करा। वंदितो द्या आधारा॥१॥

हिमालयामाजी आचार्य। कैसे करिती भ्रमण।
भाष्यरचना आणि जीर्णोद्धार। वर्णिले मागील अध्यायी॥

उत्तरकाशी भूमी पवित्र। मोहित झाले आचार्यांचे मन।
क्षुधा तृष्णेचे नुरले भान। सदा राहती समाधिमग्न॥

ध्यानात प्रकटे जो गहन विचार। विज्ञान नौका साकार।
मृत्यूहीन ज्योतिर्मय ओंकार। मीच ब्रह्म निराकार॥४॥

सोळा वर्षांचे कोवळे वय। परी अंतर्बाह्य झाले ज्ञानमय।
शिष्यांच्या मनी उपजे भय। होणार नाही ना समाधिस्थ॥

विचार करून शिष्यगण। धरती आचार्यांचे चरण।
सांगती जाऊन शरण। करावे भाष्याचे विश्लेषण॥

आवडीचाच तो विषय। शिष्यास शिकवणे शारीरिकभाष्य।
आनंदे मानिती आचार्य। झाले सुरु ज्ञानसत्र॥७॥

एके दिवशी अकस्मात। येई वृद्ध तेजस्वी ब्राह्मण।
विचारी सर्वांसी करी कोण। भाष्य ब्रह्मसूत्रांवर॥८॥

शिष्य करिती वंदन। देती त्या आदरे आसन।
सांगती खंडनपूर्वक विवेचन। करितात आचार्य शंकर॥

ब्राह्मण पाही निरखून। म्हणे सांगा बरे समजावून।
प्रथम सूत्राचे करी विवरण। तृतीय अध्यायातील प्रथमपदा॥

©www.madhaveeraghuveer.com

नमुनि बोलती आचार्य । प्रश्नावरून आले ध्यानी ।
सूत्रांचा मर्मार्थ जाणोनि । आरंभिला आपण संवाद ।।

जैसे जितुके मी जाणतो । आपणासमोर मांडितो ।
आपले समाधान होईतो । विचारावेत प्रश्न ।।७२।।

प्रथम देह सोडुनि जीव । प्रवेश करिता अन्य देही ।
सूक्ष्म भूतांनी वेष्टित जाई । ऐसे मूळ सूत्र ।।७३।।

आचार्य करिती विवेचन । छांदोग्यातील संदर्भ योग्य ।
उद्धृत करोनि करिता भाष्य । मान डोलवि ब्राह्मण ।।

जरी तोषला मनी ब्राह्मण । आचार्यांस करी प्रतिप्रश्न ।
विवेचन राहता अपुर्ण । म्हणे उद्या येईन ।।७५।।

ब्राह्मण करी प्रश्न । आचार्य देती उत्तर ।
चर्चा ऐसी ब्रह्मसूत्रांवर । चालली काही दिवस ।।

कोण असावेत हे ब्राह्मण । पद्मपाद विचारी आचार्यांस ।
असतील का वेदव्यास । शंका मनी येते रोज ।।७७।।

आचार्य म्हणती पद्मपादास । मज ही वाटते हे वेदव्यास ।
उद्या करू शंकेचा निरास । येईल ब्राह्मण तेव्हाच ।।

दुसरे दिवशी येई ब्राह्मण । विचारी पुन्हा गहन प्रश्न ।
आचार्य करुनि सादर नमन । विनविती सांगा आपण कोण?

वेदव्यास कृष्ण द्वैपायन । परीक्षा घेण्या आला आपण ।
ऐसे मानितो आम्ही सर्वज्ञ । सत्यरूप प्रकटावे ।। ८०।।

© www.madhaveeraghuveer.com

ब्राह्मण बोले हासून। खरेच आहे हे अनुमान।
विवेचनाने पावलो समाधान। प्रकट होती महर्षि व्यास॥

मनी मावेना आनंद। आदि गुरुंचे धरुनि चरण।
आचार्यांसह शिष्यगण। गेले व्यासगुरुंना शरण॥२२॥

ऐसी आपली ओळख। देऊन स्वीकारली आसन।
वदति शंकरा कल्याण। तुज करवी साधणे जगात॥२३॥

प्रथम देतो आशीर्वचन। अल्पायुष तुझे वर्ष षोडश।
वाढो आणखी सोळा वर्ष। कार्य जाण्या सिद्धीस॥२४

आवडे तुज समाधियोग। परी अनुमति देईल कोण?
जीवन कार्य पूर्ण केल्याविण। करण्या तुज आत्मसमर्पण॥

येथवरी संपादिलेस ज्ञान। आता करणे परिभ्रमण।
पंथोपपंथांचे वाद खंडन। सुप्रतिष्ठित करणे वैदिकधर्म॥

त्याचसाठी देवाधिदेवे। वाढविले तुझे आयुष्यमान।
या गोष्टीचे राखून भान। करावे पूर्ण कार्य महान॥

एकाग्र करुनि चित्त मन। आचार्य ऐकती व्यास वचन।
म्हणती झाले धन्य जीवन। गुरु व्यासांनी दाविला मार्ग॥

सद्गुरुंची मान्यता लाभली। पूर्वतयारी पूर्ण झाली।
आता पाहिजे संधी साधली। शास्त्रार्थ करण्या पंडितांसवे॥

उत्तरकाशी सोडून शंकर। निघाले शिष्यांसहित भरभर।
हिमालयाचे सोडून पठार। गाठती क्षेत्र प्रयाग॥३०॥

© www.madhavbhagwat.com

करुनि बौद्धांचा पराभव। कुमारील भट्ट पंडीत।
कर्मकांडासी प्रतिष्ठित। करिती अनन्य भक्तीने॥

त्याच भट्टांच्या शोधात। आचार्य गाठती प्रयागक्षेत्र।
तीन नद्यांचे संगमतीर्थ। ज्ञान भक्ति वैराग्य॥

देहशुद्धीचे सोपे साधन। आचार्य करिता संगमी स्नान।
तेजःपुंज काया पाहून। जन म्हणती हा पुरुष कोण?

कुमारिल भट्ट येथेच जवळ। निघाले आम्हा सोडून।
त्यांचेच करण्या कार्य पूर्ण। अवतरले का हे विभूतिमत्व॥

आचार्यांच्या पडता कानी। कुमारील भट्ट घेती पाणि।
त्वरित धावले त्या स्थानी। सोबतीस समुदाय॥

दृश्य मोठे करुणामय। अलौकिक सदाचरणी भट्टाचार्य।
तुषाग्नित बैसले दृढनिश्चय। अग्नी लावलेला तयांनी॥

सामान्य जनांचा सुरु विलाप। का सोसावा सज्जनांनी ताप
ऐसे काय घडले पाप। त्यासाठी हे प्रायश्चित्त॥

कुमारील भट्टांचे शिष्य। सांगती हे धर्मपरायण।
निर्णय करिती स्वये आपण। गुरुवधास्तव स्वशिक्षा॥

लोक करिती आश्चर्य। स्वतः स्वतःसी शिक्षा देणे।
धर्मपरायणांचे हे जगणे। वेदनिष्ठा हे जीवन॥

शंकराचार्यांसि कुमारील भट्ट। नेत्रभावे करिती नमन।
आचार्यही करिती वंदन। शिष्यांसह वेदरक्षका॥

© www.madhaveeraghuveer.com

भट्ट बोलती गद्गद स्वर। माझा आला जवळ शेवट।
घडली आचार्य तुमची भेट। झालो मी कृतार्थ ॥४१॥

बौद्ध गुरुसी केले पराभूत। जीवनाश घडला नकळत।
त्याचेच घेण्या प्रायश्चित्त। केला तुषाग्नि प्रवेश ॥४२॥

घडला आणखी एक प्रमाद। मीमांसेच्या एकांतिक पुरस्कार।
ईश्वराचे अस्तित्वास नकार। नको होते हे घडायाला ॥

असो, आलात का आपण। कोणता हेतू मनात धरून।
सांगावे निःशंक होऊन। काय अपेक्षा आपली ॥४४॥

आचार्य जणू झाले मूक। काय बोलावे कळेना क्षणैक।
चित्त म्हणे विझवून टाक। जलसिंचने हा तुषाग्नि ॥४५॥

भावना वेग आवरुनि घट्ट। म्हणति विनवितो तुम्हा भट्ट।
जीवित संपविण्याचा हट्ट। सोडूनि द्यावा आम्हास्तव ॥

लिहिले अद्वैत सिद्धीसाठी। प्रस्थानत्रयीवर मी भाष्य।
आपण लिहावे त्यावर वार्तिक। विनवितो मनापासून ॥४७॥

भट्टपाद सांगती समजावून। फिरते कालाचे सदा चाक।
वेदोक्त धर्माचा सहज परिपाक। अटळ तुषानल प्रवेश ॥

तुझ्या भाष्यावर वार्तिक लिहिणे। तसेच काही अन्य लिहिणे।
हे तर माझे भाग्य फळणे। परी आलास उशिरा ॥४९॥

परंतु तुझे साधाया कार्य। ऐसा काही सांगतो उपाय।
मंडनमिश्रा जिंकिणे अनिवार्य। हेच मान तुझे ध्येय ॥५०॥

©www.madhuveeraghuveer.com

मंडनमिश्र तर माझा शिष्य। हरला तर तुझा शिष्य।
लिहिल वार्तिक जाणुनि भाष्य। त्यास मागावी वादभिक्षा॥

स्वतः मंडन खराच पंडीत। त्याची पत्नी जाणते शास्त्रार्थ।
तिलाच करावे मध्यस्थ। निःपक्ष जी उभयभारती।

बोलता बोलता भट्टपाद। तुषाग्नित झाले तेजोमय।
आदरे वदती आचार्य। आपला आदेश शिरोधार्य॥

भट्टांचे मुख उजळले। सर्वांस आशीर्वाद दिधले।
बघता बघता अग्नीने वेढले। भट्ट झाले अग्निमय॥

अग्नी जाळीत होता देह। तरीही दावेनि मार्ग सुयोग्य।
जीवनात झाले कृतकृत्य। कुमारिलभट्ट अद्वितीय॥

आठवीत त्यांचे जीवन। आचार्यांचे सुरु भ्रमण।
अचंबित झालेला शिष्यगण। चाले त्यांच्या मागोमाग॥

कळली तितिक्षेची अपूर्वता। भट्टपादांची धर्मपरायणता।
तुषाग्निप्रवेशाचा प्रसंग पाहता। ठसली प्रत्येकाच्या मनात॥

कसा झाला शास्त्रार्थ। मंडनमिश्र आणि आचार्यांत।
त्या घटनेचा वृत्तांत। जाणावा पुढील अध्यायी॥

इति श्री आदिशंकर लीलामृत। सतरावा अध्याय समाप्त।
कृपा व्हावी सदा प्राप्त। पूर्ण होण्या ग्रंथ सार्थ॥५८॥

शुभं भवतु। शुभं भवतु। शुभं भवतु॥

२१.०४.२०१६

॥ॐ॥

## अध्याय अठरावा

जगद्‌गुरु श्री आदिशंकरा। वर्णावे आपुल्या अवतारा।
अल्प ही कामना पूर्ण करा। वंदिते द्या आधारा॥ १॥

व्यासांनी वाढविले आयुष्यमान। कुमारिलांच्या तुषाग्नि प्रवेश।
निघाले गाठावयास मंडनमिश्र। वर्णिले मागील अध्यायी॥

एक मासानंतर आचार्य। पोचले माहिष्मती नगरात।
मंडनमिश्र कुठे राहतात। विचारती नदीवर दासींना॥

ज्या घराच्या ओसरीवर। शास्त्रार्थ करिती मैना, पोपट।
आपापल्या वाणीने स्पष्ट। तेच सदन पंडितांचे॥४॥

ऐकुनि शिष्य आश्चर्यचकित। ज्या घराची ऐसी खूण।
ज्ञानमय सर्व वातावरण। कैसे खरोखर हे मंडनमिश्र॥

सांगे द्वारपाल आचार्यांसी। श्राद्धदिनी नाही भेटणार।
पंडीत आपणा यतिवर। जावे आज परतून॥६॥

आचार्य शिरले घरात। मंडनमिश्रांचा शोक अनावर।
परी म्हणती सांगा यतीवर। कुतो मुंडी-कुठून आला॥७

आचार्य म्हणती हासून। गलदेशात मुंडी गळ्यापर्यंत मुंडन।
मंडनमिश्र बोलती चिडून। पंथास्ते पृच्छ्य मया॥ ८॥

अरे मुंडन नाही विचारीले। मार्ग मी विचारला।
बगल देत प्रश्नाला। आचार्य करिती प्रतिप्रश्न॥९॥

मार्गाने केली का तक्रार। कशाला त्याची उठाठेव।
मंडनमिश्रांच्या वाढ क्रोधभाव। म्हणति 'तुझे बोडके॥१०॥

तरीही हासून आचार्य। म्हणती बोलणात योग्य।
★ चिडून पुसती पंडीतराय। सुरा किं पीता? ॥११॥

मंडनमिश्रांना कळेना। काय म्हणावे या संन्याशा।
कसली धरुनि आशा। आला नेमका श्राद्धाचे वेळी॥

जैमिनी व कृष्णद्वैपायन। ऐकता दोघांचा संवाद।
मंडनामिश्रास घालून साद। म्हणति संन्यासी विष्णुरूप॥

संन्याशाचा न करिता अपमान। आला जो अतिथि होऊन।
त्याचा करावा तू सन्मान। यथोचित यथायोग्य॥१५

मंडनमिश्र आले भानावर। क्रोधास घालून आवर।
म्हणती यावे यतीवर। करावी भिक्षा ग्रहण॥ १६

सांगती स्पष्ट शंकराचार्य। अन्नभिक्षा नाही मागत।
वादभिक्षा घाल झोळीत। कु. भट्टांचेच मनोगत॥१७

कानी पडता गुरूंचे नाव। मंडनमिश्र बोले बदलुनि भाव।
श्राद्धदिनी नको वादाचे नाव। उद्या करु शास्त्रार्थ॥१८

★ तुम्ही करीत शब्दच्छल। आचार्य विचारती सस्मित।
सुरा किं पीता। दारु का असते पिवळी? ॥१९॥

मान्य म्हणती आचार्य। परी शास्त्रार्थाचा निर्णय।
करण्या व्यक्ति एकचि योग्य। उभयभारती आपली पत्नी॥

मंडनमिश्र म्हणती योग्य निवड। सत्यासत्याची तिला चाड।
उद्यापासून तिलाही सवड। परी माझी एक अट॥

© www.madhaveeragnuveer.com

आचार्य म्हणती सांगा सत्वर। मंडनमिश्र-पत्करावा संसार।
जरी वादात तुमची हार। आणि व्हावे मीमांसक॥२१॥

आचार्य घालती प्रतिअट। घ्यावा आपणही संन्यास।
जरी पावलात पराभवास। पत्करावे अद्वैतमत॥२२॥

पत्नी उभयभारती करी स्पष्ट। जरी मी जाणते शास्त्रार्थ।
निर्णय व्हावा सार्थ। योजेन एक नवा मार्ग॥२३॥

देईन दोघांसी पुष्पमाला। घालावी दोघांनी आपुल्या गळा।
सुकेल ज्याची आधी माळा। मानावा तो पराभूत॥२४॥

असे सर्व नियम ठरले। अनेक शास्त्री पंडित जमले।
वाग्युद्ध जणू सुरु झाले। दोघेही पंडित शास्त्रनिष्ठ॥२५॥

मंडनमिश्र करिती प्रथम प्रश्न। जीव ब्रह्म ऐक्याचा आधार।
तत्त्वमसि वाक्याचे सार। आचार्य देती उत्तरा॥२६॥

वाद चाले शांत स्वरे। ना कोणाचा आवाज चढे॥
ना कोणाचा क्रोध वाढे। माळा ताज्याच्या ताज्या॥२७॥

अखेर मंडनमिश्रा उमगले। आचार्यांचे विवरण खोल स्पष्ट।
माझेही अज्ञान करील नष्ट। मज होणे पराभूत॥२८॥

पराभवाच्या शंकेने मनस्ताप। फुले सुकली आपोआप।
ताजेपणाचा झाला लोप। उभयभारती देई निर्णय॥

मंडनमिश्र आज पराभूत। पूर्ण झाले वादसत्र।
मज घेणे संन्यासव्रत। मंडनमिश्र म्हणती पूर्वानुसार॥

© www.madhaveeragnuveer.com

पतीच्या रक्षणार्थ उभी सती। आचार्य म्हणे उभयभारती।
संन्यासास हवी पत्नीची संमती। देईन मी हरले तर।।

सर्वांसि मोठा अचंबा वाटला। वादापूर्वी नव्हता ठरला।
हरल्यानंतर का उद्भवला। प्रश्न पत्नीच्या संमतीचा।।

क्षणभर राहूनि स्तब्ध। आचार्य म्हणती मजसी मान्य।
आपणा जिंकुनि होईन धन्य। चालवावा पुढे शास्त्रार्थ।।

उभयभारती विचारी प्रश्न। संन्याशास वर्ज्य जे कामशास्त्र।
त्याचीच व्हावी चर्चा विस्तृत। जमलेले म्हणती विपरीत।।

आचार्य बोलती हे मोठे। शास्त्रार्थाचा हा विषय आहे।
परी मी मान्य केले आहे। द्यावा काळ अभ्यासास।।

उभयभारती होई आनंदित। म्हणे। द्यावी ७ मासाची मुदत।
जिंकण्या मज वादात। विषय राहील कामशास्त्र।।

आचार्यांचे सुरू विचारमंथन। काय योजिता परमेश्वर।
संन्याशाने अभ्यासावा शृंगार। कशाचा घ्यावा आधार।।

आचार्यांसी झाले स्मरण। उपनिषदातही आहे वर्णन।
कैसे असावे कामजीवन। अभ्यासावे बृहदारण्यका।

सांगती शिष्यास देऊन ग्वाही। आता राहीन एकांती।
जरी येईल आपत्ति। तरीच मज ही दाखवावी।।

अन्यथा आणू नये व्यत्यय। मज करावयाचा निर्णय।
गृहस्थाश्रम आहे का वर्ज्य। ब्रह्मज्ञानी साधकास।

©www.madhaveeraghuveer.com

घातली अटी मज संसाराची । म्हणुनि सक्ती संन्यासाची ।
अन्यथा ख्याति गृहस्थाश्रमाची । वेदान्तधर्महि जाणतो ॥

आत्मज्ञानी मुमुक्षुस । जाती, वर्णाश्रम विचारावे कशास ।
चित्तशुध्दीच्या हव्यास । ह्याच करणे प्रयास ॥४२॥

ब्रह्मचर्येनंतर ~~संन्यास~~ । संसार । संसारानंतर अरण्यवास ।
अखेरीस घेणे संन्यास । क्रम का सांगितला वृथाच? ४३

अलिप्तपणा शिकणे प्रथम । भोगातही साधणे श्रेयस ।
श्रेयसाचे हाती संसार । सोपवुनि साधणे संन्यास ॥

भोग त्याग आणि संन्यास । भक्ति कर्म आणि ज्ञान ।
सर्वांचा सुंदर योग साधुन । वेदांत सांगे करावा व्यवहार ॥

श्रुतिस्मृतींच्या आधारे । सर्व सामान्यांस समजावणे ।
हेही कार्य करुन घेणे । उभयभारतीच्या निमित्ताने ॥

शंकराचार्य लागले कार्यास । दूर करुनि सर्वांस ।
श्रुतिस्मृतींचा वेगळा अभ्यास । सुरु झाला अहोरात्र ॥

काय घडले अखेर । कोणाची जीत कोणाची हार ।
उभयभारती की शंकर । जाणावे पुढील अध्यायी ॥

इति श्री आदिशंकर लीलामृत । अठरावा अध्याय समाप्त ।
कृपा व्हावी सदा प्राप्त । ग्रंथ होवो पूर्ण सार्थ ॥४९॥

शुभं भवतु । शुभं भवतु । शुभं भवतु ॥

२२.४.२०१६

©www.madhaveeraghuveer.com

॥ॐ॥

# अध्याय एकोणीसावा

जगद्गुरु श्री आदिशंकरा। वर्णिवे आपुल्या अवतारा।
अल्प ही कामना पूर्ण करा। वंदिते द्या आधारा॥१॥

कैसा झाला शास्त्रार्थ। मंडनमिश्र झाले पराभूत।
पत्नी उभी करण्या वाद। वर्णिले मागील अध्यायी॥

शंकराचार्य बसुनि एकांती। केंद्रित करिती आपुली मती।
लाविण्यास तत्वांची सुसंगती। उपनिषदांचे पाठ करिती॥

विसरले काही काळापुरते। ध्येय जे साधायचे होते।
नसो विघ्न अडवी मार्गाते। त्याचे निवारण आधी करणे॥

कैसी झाली सृष्टिरचना। प्रश्नोपनिषदातील वर्णना।
वाचता येई स्पष्ट ध्याना। प्राण रयीचे मैथुन॥५॥

बृहदारण्यकोपनिषदातील। सुस्पष्ट करिती संदर्भ।
ब्रह्मचर्य आणि गृहस्थाश्रम। कैसे घडते साहचर्य॥६॥

हळूहळू उकले कोडे। उभाभारतीने का घातले साकडे।
प्रश्न नव्हते तिचे वाकडे। उत्तरी, वेदांताचे मर्म॥७॥

इथून पुढे घालता वाद। शारदेचेच धरावे पाद।
नकळत उठतील अनंत नाद। मार्ग पुढील दावण्या॥

ही नव्हे उभयभारती। साक्षात प्रकटेल सरस्वती।
कुंठित होईल माझी मति। तिच्याशी वाद घालता॥

लोकव्यवहार जपण्यास। आश्वस्त करावे शारदेस।
हेही संकट टाळण्यास। उपाय उरला एकमात्र॥१०॥

© www.madhaveeraghuveer.com

ग्रंथ लिहून काढावा। उभयभारतीस अर्पावा।
जाणोनिया मनिच्या भावा। स्वीकारले ती योग्यभागी॥

आचार्य गढले लेखनात। किती काळ गेला नाही ध्यानात।
शिष्य धास्तावले मनात। कालावधी संपत आला॥१२॥

अखेर एकांत मोडूनि। शंकराचार्यांसमोर जाउनि।
दिलेली घाटी पुढे करोनि। म्हणति चलावे महिष्मतीस॥१३॥

अमरक राजाच्या राज्यातील। एकान्त होता संपणार।
अमरुशतक ग्रंथ कामशास्त्रावर। लिहून झाला संपूर्ण॥१४॥

शिष्यांसहित शंकराचार्य। पोचले महिष्मती नगरीत।
मंडनमिश्र करिती स्वागत। उभयभारती देई आसन॥१५॥

संगती उभयतांस आचार्य। अमरुशतक ग्रंथ करील निर्णय।
मिळतील उत्तरे यथायोग्य। कामशास्त्रीय प्रश्नांची॥१६॥

उभयभारतीने ग्रंथ पाहिला। विवेकपूर्ण निर्णय दिधला।
आचार्य आपण जिंकला। मंडनमिश्रांनी घ्यावा संन्यास॥

आता मंडनमिश्र शिष्य आपुले। मजसीही आपण हरविले।
माझे कार्य जणू संपले। जाईन मीही स्वस्थानी॥१८॥

उभयभारतीचे धरुनि पाय। आचार्य म्हणती 'सरस्वती माय'
तू जाता विद्यांचा लय। होईल या अवनीवर॥१९॥

शृंगेरीस स्थापेन मठ। बनावे ते विद्येचे पीठ।
रहावी वेदांताची मान ताठ। आई तुझ्या वास्तव्ये॥२०॥

©www.madhaveeraghuveer.com

उभयभारती हीच सरस्वती। मनी झाली प्रसन्न अति।
सांगे प्रेमे शंकराप्रती। समजावुनि परिस्थिती॥

म्हणे आता देहत्याग। करणे आहे अनिवार्य।
परी सांगते एक पर्याय। त्याचे करावे पालन॥२३॥

बांधावा शृंगेरीस मठ। स्थापावे तेथे श्रीयंत्र।
तेथेच मी राहीन दिवसरात्र। धारण करुनि दिव्यतेज॥

अवतार संपला शारदेचा। मार्ग ठरला मंडनमिश्रांचा।
शिष्य झाला आचार्यांचा। नाव ठेविले सुरेश्वर॥२४॥

वार्ता पसरली दूरवर। मंडनमिश्र झाले पराभूत।
लोक म्हणती आता निश्चित। जगद्गुरु अवतरले॥

भक्त शिष्यांसह शंकराचार्य। दक्षिण दिशेचा धरुन वाट।
निघाले महिष्मती सोडून। अनेकांना वादात जिंकीत॥

पोचले पंचवटी क्षेत्रात। जेथे राहिले श्री सीताराम।
त्या क्षेत्री करुनी मुक्काम। जीर्णोद्धारिले राममंदिर॥

होते करणे कार्य महान। वेदांताचे तत्त्वज्ञान।
सर्वत्र रहावे भरुन। म्हणून अव्याहत प्रवास॥२८॥

गाठले क्षेत्र पंढरपूर। परब्रह्म लिंग जेथे विटेवर।
कर ठेवुनि कटेवर। राहिले उभे भक्तास्तव॥

आचार्य न्याहाळती नीट। चंद्रभागेच्या तो तट।
म्हणति हे तर योगपीठ। स्फुरले स्तोत्र
पांडुरंगाष्टक॥३०॥

© www.madhaveeraghuveer.com

भक्तिभाव तो आचार्यांचा । ठाव घेई अंतःकरणाचा ।
स्वभाव सामान्य जनांचा । वळला वैदिक धर्माकडे ॥३१॥

श्रद्धेने भेटती लोक । म्हणती करावा उपदेश ।
सर्वांसि आचार्यांचा आदेश । स्वधर्मनिष्ठा राखावी ॥३२॥

पंढरपुराहून श्री शैल्य । ज्योतिर्लिंगातील एक तीर्थ ।
कापालिकांचे जेथे प्रस्थ । तेथे पोचले आचार्य ॥३३॥

आचार्यांसी करणे शास्त्रार्थ । आपले प्रयत्न ठरतील व्यर्थ ।
क्रकच करी साधण्या स्वार्थ । दुष्ट हीन योजना ॥३४॥

आपल्या शिष्य उग्रभैरवास । सांगे, खोट्या नम्रभावे ।
आचार्यांच्या सेवेस लागावे । संधी साधून त्या मारावे ॥

कापालिकात श्रेष्ठ उग्रभैरव । येऊनि आचार्यांपाशी साव ।
म्हणे धरूनि शरणभाव । आलो आपुल्या पायाशी ॥३६

सेवेचे नाटक वठवून । सर्वांची मने आकर्षून ।
एके दिवशी संधी साधून । रडू लागला आचार्यांपाशी ॥

म्हणे तपश्चर्या उग्र केली । त्याची पूर्तता नाही झाली ।
जरी आपली कृपा लाभली । तरीच होईल कार्य माझे ॥

आचार्य तर करुणालय । म्हणती स्पष्ट सांग मनोदय ।
सांग बरे मी करू काय । तुझ्या तपःपूर्तीस्तव ॥

अरे नाही कोणी आसपास । निःसंकोच होऊनि सांग बरे ।
काय आहे मनात खरे । माझ्यापाशी मागणे ॥४०॥

कैसे सांगू म्हणे। उग्रभैरव।मजला आदेशी भगवान।
रुद्रहोमात हवी आहुती महान।सर्वज्ञाचे मस्तकाची॥

जरी करावे मी हवन।योग्य सहाय्यकर्ते केवळ आपण।
विनाविता धरुनि चरण।रुद्रहोमार्थ अर्पावे जीवन॥

आचार्य जाणती मनोमन।परी म्हणाती हसून।
जरी होणार तुझे कल्याण।अर्पिन मी माझे जीवन॥

परी आहे मोठी अडचण।इतर शिष्य हे न मानतील।
तुझ्या हेतूच्या आड येतील।गुपचुप आपण जाऊ दूर॥

उग्रभैरव झाला हर्षित।म्हणे बोलणे आपले योग्य।
अमावस्येचा साधुनि योग।नेईन तुम्हा गुपचुप॥

काय घडले त्यानंतर।उग्रभैरवासह गेले का शंकर।
कथा मनासी लावी घोर।जाणावी पुढील अध्यायी॥

इति श्री आदिशंकरलीलामृत।एकोणीसावा अ. समाप्त।
कृपा व्हावी सदा प्राप्त।ग्रंथ होवो पूर्ण सार्थ॥७८॥

शुभं भवतु। शुभं भवतु। शुभं भवतु ॥

२८.४.२०१६

© www.madhaveeraghuveer.com

(२)

॥ॐ॥

# अध्याय विसावा

जगद्गुरु श्री आदिशंकरा। वर्णिले आपुल्या अवतारा।
अल्प ही कामना पूर्ण करा। वंदिते या आधारा॥१॥

उभयभारतींचा पराभव। श्री यंत्री वास्तव्याचे आश्वासन।
क्रकच उग्रभैरवाचे कारस्थान। वर्णिले मागील अध्यायी॥

उग्रभैरवासि आनंद। म्हणे फसले पूर्ण आचार्य।
अमावस्येला होईल साध्य। मनोरथ गुरु क्रकचाचे॥३॥

आचार्य झाले स्वतः तयार। करण्या स्वतःचेच बलिदान।
आता सोपे होमहवन। मार्ग होईल पूर्ण निर्विघ्न॥४॥

अमावस्येच्या रात्री भैरव। म्हणे आचार्यांस आता चला।
सर्व परिसर शांत झोपला। वेळ नका घालवू॥५॥

आचार्य निघाले सत्वर। टाकती पावले भराभर।
जाग न होवो शिष्यावर। साधू दे भैरवाचे मनोरथ॥

परी राखता परमेश्वर। कोण करु शकेल घात।
सिद्धान्त हा त्रिकालाबाधित। सदा सांगती सज्जन॥

जाग आली पद्मपादा। एकाएकी उठून बसला।
आसपास बघू लागला। नकळत झाला अस्वस्थ॥

शंकराचार्य दिसेनात जागेवर। एवढ्या रात्री कुठे जाणार।
निरखून पाहे सभोवार। झाला चिंताग्रस्त पद्मपाद॥

जाणवले काहीसे विपरीत। उग्रभैरवही नाही दिसत।
नाना शंका उठति मनात। लावले ध्यान एका क्षणात॥

© www.madhavaraghuveer.com

म्हणे झाला पुरा घात। यातून कोण वाचविणार?
केवळ एक नरसिंहावतार। त्यालाच घालावे साकडे॥

पद्मपाद करी स्मरण। लक्ष्मीनृसिंहासी जाई शरण।
म्हणे धावा न लागता क्षण। उग्रभैरव मारील आचार्यांसी॥

भक्तीने कळवळे श्री नृसिंह। पद्मपादासी देई आश्वासन।
घेतले रूप पंचानन। धावला करीत गर्जना॥९३॥

उग्रभैरवासह कापालिक। भांबावले गर्जनेने सकळीक।
पाहती आला अचानक। सिंह क्रूर भयानक॥९४॥

आचार्यांसी नाही भान। लावून बैसले होते ध्यान।
करो कोणाही भैरव हवन। ब्रह्मानंदी पूर्णमग्न॥ ९५॥

जैसा हिरण्यकशिपु मारिला। तैसाच उग्रभैरव फाडिला।
कापालिकांचा नाश केला। साक्षात नृसिंह अवतरला॥

पद्मपाद सर्व शिष्यांसहित। आला धावत, शोधत।
पाहोनि दृश्य भयचकित। उठवी आचार्यांस ध्यानातून॥

आचार्यांनी जाणले सर्व। अमावस्येचे हे आगळे पर्व।
कापालिकांचा गळाला गर्व। प्रकटे साक्षात नृसिंह॥

आदरे करिती त्याचे पूजन। ल.नृ.पंचरत्न स्तोत्र रचून।
घडल्या प्रसंगाचे मर्म जाणून। शिष्यास देती परमबोध॥

शांत झाला अवतार। पद्मपादास आनंद अनावर।
टळले संकट महाघोर। नृसिंहोपासनेचे प्राप्तफळ॥

प्रवास पुढे सुरु झाला। मनात नव्हत्या आता शंका।
ईश्वर आहे पाठीराखा। रक्षितो पोशितो तोच सर्वा॥२१॥

सोडुनि श्री शैल क्षेत्र। गाठती गोकर्ण महाबळेश्वर।
जेथील मूर्ति अर्धनारिनटेश्वर। पाहता चित्त आनंदविभोर॥

उन्नम् स्तोत्र सहज स्फुरून। महाबळेश्वराचे करिती स्तवन।
सर्वांचे मन राही प्रसन्न। मुक्काम केला तीन दिना॥२३॥

घेउनि ध्यानी मतमतांतरे। विवेचन करिती साधार।
यशाची वार्ता पसरे दूर। आणि कीर्ति दिगंत॥२४॥

श्रीवल्ली गावी असेल। जमले अनेक विद्वान।
आचार्यांचे ऐकता विवेचन। मुग्ध झाले सर्वजण॥२५॥

तेथेच प्रभाकर नामे कोणी। धर्मज्ञ ब्राह्मण मुलास आणी।
जड बालक नाही वाणी। मातापित्यांचे डोळा पाणी॥२६॥

आचार्य बघति पुत्राकडे। जाणती नाही जड मूक।
हा नर ब्रह्मज्ञ कोणी एक। विचारती कोठून आलास?॥२७॥

पाहून बाळा तुजकडे। संतोष मनी अतीव वाटे।
संतोषाचे मूळ गाठे। तुझ्या वृत्तीत आनंदे॥२८॥

बालकास जणू खूण पटली। अंतर्यामी ऊर्मी प्रकटली।
वाग्देवता साकारली। बोलू लागला मधुर शब्दे॥२९॥

एकटक बघत आचार्यांकडे। बाळ प्रश्नाचे गूढ उलगडे।
मुखातून वेदांत बाहेर पडे। म्हणे मी 'नित्योपलब्धआत्मा'॥

©www.madhaveeraghuveer.com

आचार्य एकांति देऊन लक्ष। झाला वक्ता मुकचा मुक।
स्तोत्र बनले हस्तामलक। प्रभाकर झाला आनंदित॥

आचार्य विनविते मातापित्यांस। द्यावे मजकडे पुत्रास।
हा जन्मला धर्मकार्यास। पूर्वजन्मीचा सिद्ध पुरुष॥

बाळ बोले मातापित्यास। कळले ना मी आता कोण?
मजसि करावे गुरुस अर्पण। शंकराचार्यांसी मीअनन्यशरण॥

मातपित्यांनी सम्मती देता। जाणुनि बालकाची योग्यता।
संन्यासदीक्षेची करुनि सिद्धता। नाम दिले हस्तामलकाचार्य॥

श्रीवल्ली सोडून पुढे प्रवास। शृंगेरीत पोचले आचार्य।
सत्ताधीश होते वराचालुक्य। शरणभावे करी स्वागत॥

शृंगेरी म्हणता स्मरणात। येतो शब्द उभाभारतीचे।
स्वप्न मठ मंदिर बांधण्याचे। लागले आचार्य कामास॥

धर्मोपदेश त्यांचा अति सुंदर। झाले जनमानस तयार।
उभारावा मठ मंदिर। प्रत्येकाचा पुढे हात॥

न लागला थोडाही उशीर। होऊ लागला मठ तयार।
स्थापून शारदेचे मंदिर। आचार्य बसविती श्रीयंत्र॥

वाढला शिष्य परिवार अपार। कळले त्या वेदांतसार।
आचार्यांच्या रचना मनोहर। आत्मबोध प्रपंच सारादि॥

रचना असे लहान मोठी। अद्वैत वेदांताची त्यात महती।
अभ्यासला साधक दृढमती। एकात्मता अनेकात॥

© www.madhaveeraghuveer.com

भेद पहाणे हे अज्ञान। अभेद मानणे हेचि ज्ञान।
समतेचे तत्त्व महान। आचार्यांनी केले प्रस्थापित॥ ४१॥

सामान्य शिष्य आनंदगिरी। नव्हती विद्वत्ता वा चतुराई।
गुरुमाऊलीचे होण्या उतराई। सदा सेवेत तत्पर॥ ४२॥

सर्वतोपरी भासे दीन। नाही पांडित्य अथवा ज्ञान।
गुरुसेवा हेच साधन। साध्यही जीवनी गुरुसेवा॥ ४३॥

सेवाव्रताने चित्त पवित्र। शुद्ध चित्त निर्मळ पावन।
जरी बाह्यांगी वाटे हीन। अंतर्यामी खरा धनवान॥ ४४॥

एके दिवशी पाठासाठी। आचार्यांपाशी जमले सर्व।
आनंदगिरी सेवेत गर्क। भान नुरले वेळेचे॥ ४५॥

येवो अथवा न येवो गिरी। सुरु करावा पाठ आपण।
जमलो आम्ही सर्वजण। तो तर आहे मंद जड॥ ४६॥

आचार्य म्हणति "थांबा थोडे। येईल आता गिरी इकडे।
भरतोच ना तोही घडे। त्याच्या वाचुन सर्व अडे॥ ४७॥

इतरांचा विचार वेगळा पडे। बुद्धिमान आम्ही या अहंगंडे।
गुरुबंधुची अवहेलना घडे। गिरीसाठी नको थांबणे॥ ४८॥

सिद्ध करण्या सेवेचा अधिकार। गिरीस आज्ञापिती दे पाठ।
जरी समजसी स्वतःसी मठ्ठ। कष्ट हेच तुझे तप॥ ४९॥

आचार्यांची ऐकता आज्ञा। जागृत झाली गिरीची प्रज्ञा।
जिव्हेवरती सर्व विज्ञा। दिधला पाठ उत्कृष्ट॥ ५०॥

© www.madhaveeraghuveer.com

गिरीचा झाला तोटकाचार्य। तत्त्व जणु प्रकटे साकार।
चित्तशुध्दीने मिळतो ज्ञानाधिकार। सर्वांस मिळला अनुभव॥

पद्मपाद, हस्तामलक सुरेश्वर। तोटक हे पट्टशिष्य चार।
आचार्यांची कृपा अपार। धर्मप्रचारार्थ शिष्य तयार॥

शृंगेरीहून कुठे जाणार। आचार्य म्हणती चला सत्वर।
कालडीसी आता परतणार। वाट पाहते आर्याम्बा॥५३॥

झाली का मायलेकरांची भेट। कालडीग्रामी घडले काय।
प्रसंगाचे सर्व गांभीर्य। जाणावे पुढील अध्यायी॥

इति श्री आदि शंकर लीलामृत। विसावा अध्याय समाप्त।
कृपा करावी सदा प्राप्त। पूर्ण होवो ग्रंथ सार्थ॥

शुभं भवतु। शुभं भवतु। शुभं भवतु॥

३.५.२०१६

© www.madhaveeraghuveer.com

॥ ॐ ॥

# - अध्याय एकविसावा -

जगद्गुरु श्री आदि शंकरा। वर्णावे आपुल्या अवतारा।
अल्प ही कामना पूर्ण करा। वांदेन द्या आधारा॥१॥

कापालिकांचा कैसा पराभव। श्रृंगेरीत बांधले मठमंदीर।
कैसा बनला शिष्य परिवार। वर्णिले मागील अध्यायी॥

आचार्य येणार कालडीस। वार्ता पसरे सर्वत्र।
आनंदे पुलकित गात्र। वाट पाहती जन अधीर॥३॥

गेला एकटा कालडीहून। शिष्यांसह येणार परतून।
भव्य आमुचे याचे आगमन। होईल गाव हा धन्य॥४॥

शंकराचार्य येता कालडीस। व्यर्थ न घेता सत्कार।
तत्काळ गाठती मातृद्वार। वचन होते निभावणे॥५॥

वृद्ध आर्याम्बा अंथरुणावर। केव्हा भेटेल बाळ शंकर।
मनपसी विचारी वारंवार। नेत्री भावना अपार॥६॥

शांतपणे आचार्य शंकर। येउने धरती मातेचे चरण।
किती गे झालीस शीण। आता हरेन सारा क्षीण॥७॥

भेटता बाळ अवचित। आर्याम्बा झाली सद्गदित।
म्हणे, सरली माझी खंत। तव भेटीने चित्त शांत॥८॥

केली होतीस शंकरा व्यवस्था। परी आप्तांना नुरली आस्था।
सांगेन सर्व नंतर कथा। देई आधार मांडीचा॥९॥

वैराग्याचा साक्षात पुतळा। तरीही दाटला शंकराचा गळा।
पाणी भरले दोघांच्या डोळा। भेट पाहण्या लोक गोळा॥

© www.madhaveeraghuveer.com

आचार्य वदती प्रेमे पुन्हा। आवरूनि आपुल्या भावना।
संपल्या आई कष्ट वेदना। पूर्ण करीन तव कामना॥

घरात आईची सेविका एक। आणि कुणी वृध्द निर्धन।
यांनीच सांभाळिले रंजांदिना। लुबाडण्या मात्र आप्तजन॥

कळले आई आता सारे। कल्याण करीन या दोघांचे।
आणिक गुह्य जे तुझ्या मनीचे। निश्चये करीन आता पालन॥

आर्याम्बेचे वदे मातृहृदय। शंकरा झालास भगवत्पादाचार्य
केलेस अविश्रांत धर्मकार्य। थकला असशील रे बाळ॥

होउ दे तुझे संध्यास्नान। घास घेई एकदोन।
निवांतपणे मग बोलून। थोडा तरी घे विश्रामा॥

मायलेकरे पावती समाधान। शंकर चुरीत असता चरण।
साधणे आता महाप्रयाण। आर्याम्बा सांगे हृद्गत॥

आजवरी थांबले मी शंकरा। भेटणे होत तुज लेकरा।
आता नको वासनेला थारा। सद्गती लाभेल असे करी॥

महाप्रयाणाचा आला समय। आईसमीप सदा आचार्य।
विचारिती हवे नको काय। तत्क्षणी करिती सर्व सोय॥

शांत वृत्ति तपही थोर। आर्याम्बा म्हणे शंकरास।
बाळा मनीची एकच आस। पहावे सगुण श्रीकृष्णास॥

चतुर्भुज रे त्याची मूर्ति। गळा हार वैजयंती।
डोळे भरुनि पहावी अंती। तेणे लाभेल शांती॥

©www.madhaveeraghuveer.com

आचार्यांनी डोळे मिटले। नम्रभावे हात जोडले।
शब्द वाणीतून प्रकटले। स्तोत्र 'श्रीकृष्णाष्टक'॥२१॥

सहाय्यकारी जो भक्तासी। आवाहन केले त्या कृष्णासी।
दर्शन देई मम मातेसी। प्रकटे साक्षात् श्रीकृष्ण॥ २२॥

आर्याम्बा झाली कृतकृत्य। पुत्राने केले वचन सत्य।
असाध्य ते झाले साध्य याच देही भेटे भगवंत॥२३

भाव उमटले अष्टसात्त्विक। अवघ्राण केले पुत्रमस्तक।
आशीर्वच दिले अनेकानेक। विष्णुपदी पोचली आर्याम्बा॥

सर्वज्ञ पुत्राचे रूप आगळे। शंकराचार्यांचे भरले डोळे।
क्षणमात्र संयम त्यांचा ढळे। मृत्यूस दुज्या क्षणी आदरिले॥

जमले सारे आप्तजन। जगद्गुरूस सांगती शास्त्र।
संस्कार करण्या तू ना पात्र। संन्याशास कुठले गोत्र?

आचार्य सांगती वारंवार। करा जरा नीट विचार।
श्रुति-स्मृति संमत आचार। दिले वचन पूर्ण करावे॥

भ्रष्ट नष्ट बुद्धीचे आप्तजन। शास्त्राहून मानिती रूढी थोर।
म्हणती तुझा हा अधर्माचार। नाही सहन करणार॥

आचार्य सांगती समजावून। संन्यासापूर्वी दिले वचन।
करीन संस्कार आणि दहन। करणे वचनाचे पालन॥

श्रुति स्मृति सांगती गर्जून। करावे सदा आज्ञापालन।
मातापित्यांचे फेडावे ऋण। पहावा त्यांच्यात भगवंत॥

©www.madhaveeraghaveer.com

शास्त्रानुसार असावे वर्तन। रुढीच्या मुळाशी जर अज्ञान।
सर्वथा सदा ते दे सोडून। शुध्दाचरण राखावे।।

तमोगुण हेच ज्यांचे बळ। आप्तजन उठले तत्काळ।
आम्ही सांगू तोच धर्म पाळ। अन्यथा बहिष्कार।।

गर्विष्ठ उन्मत्त कसली जाण। बाळगुनि खोटा अभिमान।।
ज्ञानावताराचा अपमान। शव सोडुनि जाती निघून।।

आचार्यांना झाला खेद। परी जाणत होते सारे वेद।
मातृशरीराचे करुनि तीन भेद। स्वयेच शव नेले वाहून।।

पश्चात्तापे कोणी दग्ध। पुढे आले करण्या मदत।
अंत्यसंस्कार केला विधीविहित। जन सारे चकित।।

राजाच्या कानी गेले वृत्त। अंतरी होउनि संतप्त।
म्हणे दंडीन ते दुष्ट आप्त। धावला सत्वर शंकर-गृही।।

राजा राजशेखरासी ज्ञात। आचार्यांचा पूर्ण वृत्तांत।।
केरळ प्रांताचे हे अमोल रत्न। कैसे मूर्खांनी पीडिले।।

आचार्यांचे धरुनि चरण। राजा म्हणे मी शरण शरण।
मस्तकी सदा करिन धारण। धाल आज्ञा जी आपण।।

आचार्य म्हणती मी संन्यासी। धर्मप्रसारार्थ फिरणे मजसी।
आईची सेवा करणाऱ्यासी। द्यावीत नित्य संपत्ती।।

जरी लोभी आप्तजन। करु नये तू त्या शासन।
ज्यांनी सोडिले धर्माचरण। कर्म भोगतील ते।।

सोडुनि वृथा अहंकार। धरतील जरी भक्तिभाव।
क्षमा करील केशवराज। कालडीचे ग्रामदैवत॥७१॥

आचार्यांच्या सतसहवासात। राजशेखर झाला कृतार्थ।
म्हणे आचार्य समाजहितार्थ। काही नियमावली सांगावी॥

आचार्यांनी मानिली विनंती। मुक्तकाम वर्षुनि केरळप्रांती।
एक सुंदर रचना करिती। राजा म्हणे ही शंकरस्मृती॥

अखेर सांगती राजास। प्रयाण करणे आम्हास।
वेदान्तधर्म शिकविणे सर्वांस। करणे संचार सव दूर॥७४

राजा विनवी आचार्यांस। मज मानावे आपुला शिष्य।
करुनि द्यावे काही सत्कार्य। संगतीचे लाभो भाग्य॥

आचार्य म्हणती तथास्तु। अर्पुनि सेवकासी मातेचीवास्तु।
निर्धनासी देऊनि चीजवस्तु। उचलती पाऊल यात्रस्तव॥

कोठे गेले शंकराचार्य। कोणते केले कैसे कार्य।
वेदान्त्यासी कैसे दिले अभय। जाणावे पुढील अध्यायी॥

इति श्री आदि शंकर लीलामृत। एकविसावा अध्याय समाप्त।
कृपा व्हावी सदा त्राता। पूर्ण होवो ग्रंथ सार्थ॥७८॥

शुभं भवतु। शुभं भवतु। शुभं भवतु॥

२६.४.२०१६

©www.madhaveeraghuveer.com

|| ॐ ||

## - अध्याय बावीसावा -

जगद्गुरु श्री आदिशंकरा। वर्णावे आपुल्या अवतारा।
अल्प ही कामना पूर्ण करा। वदीत द्या आधारा॥१॥

मानस घडविले विष्णुदर्शन। शंकरस्मृति झाली निर्माण।
शास्त्र थोर रुद्रोद्भव। वर्णिले मागील अध्यायी॥२॥

शंकरस्मृतिचे होता वाचन। खवळले रुद्रीप्रिय ब्राह्मण।
आनंदले सर्व विद्वज्जन। सुरु झाल्या वादसभा॥३॥

आचार्यांचे शांत सौम्य वर्तन। विरोधी क्रुद्ध उद्विग्न।
सामान्यास जे घडे दर्शन। तेणेच होई प्रथम निर्णय॥४॥

मुखी शास्त्र धर्म सारे। परी आचरणात काहीनुरे।
अशांना कैसे मानावे बरे। इतरांनी मानिले धर्मत॥५॥

आचार्यांचे सारेच न्यारे। बोलणे तैसेच वागणे।
ब्रह्म सर्वत्र सदा पाहणे। तेणे सर्वत्र आनंद॥६॥

एकेक शास्त्री झाले पराभूत। शंकरस्मृतीस सम्मती देत।
आचार्यांचे बनती भक्त। यात्रा चाले पुढे पुढे॥७॥

केरळ प्रांताची यात्रा संपवुन। शृंगेरीस करावे कार्य जाऊन।
आचार्यांचा हेतू मनोमन। परी राजशेखराचे वेगळे मत॥८॥

आचार्यांस पुन्हा पुन्हा विनवुन। बोलाविले सर्वांस शृंगेरीहून।
म्हणे विजययात्रा यावी घडून। अनेक शिष्य-भक्तांसह॥९॥

दिग्विजय यात्रेचे साधन। धर्मनिष्ठा आणि आत्मबळ।
अद्वैत तत्त्वज्ञानाचे बोल। वेदमंत्रांचा उद्घोष॥१०॥

© www.madhaveeraghuveer.com

धीर गंभीर वृत्तीने आचार्य। विरोधकांनी जरी केले कापट्य।
अथवा पांडित्याचे खोटे नाट्य। सर्वांसी करिती पराभूत॥११॥

सोपी नव्हती पुढील वाट। कित्येकदा ओढवे प्राणसंकट।
संन्यासधर्माची लावुनि नेट। यात्रा चाले पुढे पुढे॥१२॥

आचार्यांचे स्पष्ट विचार। मधुर वाणी सहजोद्‌गार।
अद्वैतमताचा सर्वत्र प्रसार। धर्मयात्रेतुन घडत राही॥१३॥

धर्म सत्य शांती मैत्री। सर्वांचे मूळ तत्त्व अद्वैत।
अविद्येने उपजे द्वैत। ते सोडुनि धरावे अद्वैत॥१४॥

जाणा तुम्हीच आहा भगवंत। तुमचे रूप सच्चिदानंद।
आत्मस्वरूपाचा घेऊनि शोध। करावे सार्थक जन्माचे॥१५

ते परब्रह्म तू आहेस। गुरुपदेशाचा घेऊनि ध्यास।
मी ब्रह्म आहे तत्त्वास। अनुभवावे जीवनात॥१६॥

मग राहील कसली खंत। आत्मविश्वास प्रगटेल धगधगीत।
कार्य घडेल फलाशारहित। त्यासी जीवन्मुक्ति प्राप्त॥१७॥

या आत्मविद्येचा अधिकार। लिंग जात वर्ण भेदातीत।
जो जो मनी मुक्ति इच्छित। त्या प्रत्येकासी आहे प्राप्त॥

ऐसे विचार कानी येता। धर्मयात्रेचे दृश्य बघतां।
दूर होई दुर्बलता। ऐक्य समाजी निर्मिले॥१९॥

दुःखाचा करुनि अंत। आपापल्या कार्यात होऊनि रत।
आत्मतेजा करी जागृत। धर्मध्वजा उचली उंच॥२०॥

आचार्यांना कुठली विश्रांती । करण्या सर्वांची इच्छापूर्ती ।
कुठे स्थापिली देवता मूर्ती । कुठे मंदिराची उभारणी ॥

जैसा समाज उभा पुढती । त्याच्या हिताचे कार्य करती ।
आशीर्वाद कोणा देती । स्तोत्र सुंदर कुणा स्तव ॥

केरळ कर्नाटक रामेश्वर । प्रवासामध्ये शृंगेरी कांचीपुर ।
कलिंगा गाठती आंध्रानंतर । चार्वाक जैन बौद्धांची हार ॥

जगन्नाथपुरी मगध प्रयाग । वाराणसी उज्जयनी गिरनार ।
सोमनाथ प्रभास द्वारकानगर । सिंधू काश्मीर पेशावर ॥

काश्मीर क्षेत्री होते प्रसिद्ध । सरस्वतीचे शारदा पीठ ।
मंदिरात उज्वल सर्वज्ञ पीठ । अजिंक्य अनेकांसी ॥ २५ ॥

ज्ञानसंपन्न व्यक्तीचा अधिकार । आरोहण सर्वज्ञ पीठावर ।
सर्व पंथांचे विद्वत् वर । जेव्हा देतील होकार ॥२६॥

सर्व शास्त्रांचा सूक्ष्म अभ्यास । तत्त्वज्ञानाची धरुनि कास ।
समन्वयपूर्वक विवेचन खास । मान्य व्हावे सर्वांस ॥

यासाठी चारी द्वारावर । बसती अनेक विद्वत्वर ।
गूढ प्रश्न पुसती सत्वर । जो चढू पाहे पीठावर ॥२७॥

सर्व शास्त्री पंडित । जरी होतील पराभूत ।
खुद्द शारदेने द्यावे मत । तेव्हाच घडे आरोहण ॥

शिष्य विनविती आचार्या । विजययात्रेची संपन्नता ।
शारदा पीठाची मान्यता । घेउनि करावी सांगता ॥३०

नव्हता ज्ञानाचा अहंकार। नव्हती सन्मानाची हाव।
गाजवावे आपुले नाव। हे ही नको आचार्यांस ॥३१॥

परी हट्ट शिष्यांचा। वेदान्ताची वाढावी प्रतिष्ठा।
शारदा चरणी सर्वांसि निष्ठा। आरोहणातून व्यक्त व्हावी॥

विचारपूर्वक उठती शंकर। उभे राहती पीठसमोर।
पूर्व पश्चिम दक्षिण उत्तर। प्रदक्षिणेचा धरती मार्ग॥

मार्गी बैसलेले तत्त्वज्ञ। कणाद गौतम नैय्यायिक।
बौध्द जैन मीमांसक। करिती नाना तऱ्हेचे प्रश्न॥

कोणी पाहती तपासून। खरेच का हे सर्वज्ञ।
माझ्या पंथाचेही तज्ज्ञ। तत्त्वाधिष्ठित वादविवाद॥३५॥

पदार्थतत्त्व नेमके काय। अस्तिकाय म्हणजे काय।
आमच्या पंथाचे मर्म काय। वेदान्ताहून कसे भिन्न॥

सौम्य शांत मधुर स्वरे। आचार्य देती उत्तरे।
ऐकुनी प्रसन्न होती सारे। सर्वशास्त्रविशारद खरेच हे॥

विनविती चलावे मंदिरात। शारदेचे काय मनोगत।
दैवीवाणीचा अपूर्व स्रोत। येईल का कानावर॥३८॥

आचार्य जोडुनी दोन्ही हात। उभे राहून मंदिरात।
शारदेची विनवणी आर्त। करिती अत्यंत आदरे॥

शारदा होऊनि प्रसन्न। गंभीर दैवी वाणीने बोलत।
वत्सा, संतोषले माझे चित्त। खरेखर तू सर्वज्ञ॥४०॥

©www.madhaveeraghuveer.com

करी पीठावर आरोहण। तूच सर्वथा असशी योग्य।
सर्वज्ञ म्हणूनि सर्वां मान्य। राहशील चिरंतन॥

नम्रपणे आदिशंकर। चढले सर्वज्ञ पीठावर।
लोक करिती जयजयकार। वार्ता पसरे सर्वत्र॥

चारी दिशांच्या तीर्थयात्रा। संपन्न होई धर्मयात्रा।
वैभव आदर वेदमंत्रा। लाभे आसेतुहिमाचल॥४३

आचार्यांचे अखंड भ्रमण। पंथोपपंथाचे मार्तंड शरण।
वाद संपता धरिती चरण। प्रचारक होती वैदिकधर्माचे॥

जगन्नाथपुरीस गोवर्धन मठ। द्वारकेस कालिका पीठ।
चार दिशांस चार मठ। चिदंबरक्षेत्री नटराज मंदिर॥

चालावे कार्य शतकानुशतके। म्हणोन व्यवस्था विचारपूर्वक।
ग्रंथरचना जाणीवपूर्वक। मठाम्नायसेतु नामक॥४६॥

जाणीव होती अल्पायुष्याची। शिदोरी संपत आली३२वर्षांची।
आता तयारी महासमाधीची। हवी कराया सत्वर॥

आचार्य राहू लागले मौन। कुणासही पडेना मने चैन।
राजेश्वर सांगे विनवून। कांचीस चलावे आता आपण॥

आचार्यांच्या मिळता होकार। राजशेखराच्या मनी विचार।
आचार्यांनी चढावे सर्वज्ञ पीठावर। महोत्सव व्हावा कांचीस॥

शंकराचार्यांचे सर्वज्ञत्व। सिद्ध झाले जे काश्मीरात।
नोंदले रहावे इतिहासात। म्हणून स्थापावे कांचीत॥

— — .

©www.madhaveeraghuveer.com

सर्व भक्त आणि शिष्य। राजशेखरासी पूर्ण सहमत।
आपापले सांगती मनोगत। कैसे असावे सर्वज्ञपीठ॥५१॥

ज्येष्ठ शिष्य सुरेश्वराचार्य। त्यांचा सल्ला मागे राजशेखर।
जाणता आचार्यांचे विचार। मिळेल का त्यांचा होकार॥५२

सांगती सुरेश्वर मनापासून। आचार्यांस रुचेल सिंहासन।
द्यावेस तू बनवून। होकार मिळविणे आमचे काम॥

काश्मिरातील शारदा पीठ। सर्वांना करून पराभूत।
आचार्यांनी केले पादाक्रांत। त्याचीच करू पुनरावृत्ती॥

चढण्या सर्वज्ञ पीठावर। बनवाव्या पायऱ्या चौपन्नाव।
त्यांचे सांगतो विवरण। सर्वांनी घ्यावे समजावून॥

चौसष्ट कलांच्या चौसष्ट। चौदा विद्यांस्तव चौदा पायऱ्या।
षड्शास्त्राच्या सहा पायऱ्या। षडंग वेदांच्या आणि दहा॥

त्यावरी राजा हवे तैसे। सिंहासन रत्नजडित सोन्याचे।
ठरेल वैभव तुच्छ साचे। श्रीमत् शंकराचार्यांपुढे॥५७॥

आचार्यांसह शास्त्रार्थ वाद। अजून करणे असेल कोणास।
पंथोपपंथीच्या पंडितांस। आमंत्रित करावे कांचीस॥

वादसभेच्या अखेरीस। जो कोणी सर्वज्ञ ठरेल।
तोच कांची पीठावर चढेल। सर्वांच्या सम्मती साक्षीने॥

आचार्य हे करतील मान्य। सत्तावैभवाचा जरी ना लोभ।
वेदान्तप्रतिष्ठेचा परी लोभ। सांगा कैसा सोडवेल॥६०॥

© www.madhaveeraghuveer.com

तेच त्यांच्या जीवनाचे ध्येय। त्यासाठी कष्ट अनिवार्य।
तैसे पीठारूढत्वही अपरिहार्य। सांगू आम्ही आग्रहाने॥

चार दिशांना चार मठ। शिष्यासाठी केले प्रतिष्ठित।
आम्हा वाटते सदा खंत। नाही स्थापिले गुरुपीठ॥

सुरेश्वराचार्य झाले सद्गदित। अश्रू उभे नयनात।
शब्द अडकले कंठात। मौनेच संपले मनोगत॥

काय घडले भविष्यात। योजनेस मिळे का होकार।
झाले का आरूढ पीठावर। जाणावे पुढील अध्यायी॥

इति श्री आदिशंकर लीलामृत। बाविसावा अध्याय समाप्त।
कृपा व्हावी सदा प्राप्त। पूर्ण होवो ग्रंथसार्थ॥

शुभं भवतु। शुभं भवतु। शुभं भवतु॥

४.५.९६

© www.madhaveeraghuveer.com

॥ॐ॥

## - अध्याय तेवीसावा -

जगद्गुरु श्री आदिशंकरा। वर्णावे आपुल्या अवतारा।
अल्प ही कामना पूर्ण करा। वंदिते द्या आधारा॥१॥

दिग्विजय यात्रेचे त्रोटक वृत्त। तत्वज्ञानाचे छोटेसे सार।
कांचीत गुरुपीठाचा संकल्प। वर्णिले मागील अध्यायी॥२॥

दिग्विजय यात्रेची दिशा बदलून। ठेविले कांचीचे प्रस्थान।
आचार्यांची आज्ञा घेउन। निघाला आधी राजशेखर॥३॥

आचार्यांस नको थोडाही त्रास। सर्वांचा यास्तव प्रयास।
आचार्यांसी एकच ध्यास। श्रेष्ठत्व पावावे अद्वैत॥४॥

करिता केव्हाही शास्त्रार्थ। पंथोपपंथासी मूळ साधन।
संपून करिती समाधान। आपल्यात घेती मिळवून॥५॥

सर्व नद्यांचा सागरी लय। तैसे सर्व देव केशवमय।
मध्य मूर्ती मानुन ब्रह्ममय। मांडावे पूजेत पंचायतन॥

शैव वैष्णव किंवा सौर्य। शाक्त अथवा गाणपत्य।
पंथ हे भेदांचे अपत्य। जाणोनि करावा अभेद॥७॥

ब्रह्म भासते सृष्टीरुपाने। भेद बनती जीवकल्पने।
कल्पना सोडता अभेद बाणे। उरते केवळ अद्वैत॥८॥

सर्वांस समजावे तत्त्वज्ञान। आचार्य देती स्पष्टीकरण॥
सुंदर साधे विवेचन। करिती सिद्धांत नियमांचे॥९॥

यात्रा पोचली कांचीनगरी। धावले नगरजन प्रवेशद्वारी।
नंदीवर्मन राजा स्वागत करी। भव्य उत्सव कांचीचे॥१०

© www.madhaveeraghuveer.com

नगरी होती नाना मंदिरे । कामाक्षी मंदिराचे स्थान आगळे ।
आचार्यांनी स्वये कोरिले । श्रीचक्र देवीच्या कर्णफुली ॥

चंद्रमौळीश्वराचे दर्शन । महात्रिपुरसुंदरीचे यथार्थ पूजन ।
आचार्य पुसति प्रयोजन । नगराच्या धामधुमीचे ॥७२॥

नंदीवर्मन तथा सुरेश्वर । नम्रता आर्यांनीक धरून ।
आचार्यास प्रार्थिती विनवून । करावी सर्वांची इच्छा पूर्ण ॥

सर्वज्ञ पीठाचे चालले काम । सर्वांच्या मुखी आपुले नाम ।
कांची बनावे आपुले धाम । चरणी सर्वांची विनवणी ॥

आचार्य करिती हास्यविनोद । पुसती 'यात्रेचा हाच का बोध ।
संन्याशास कसा घराचा शोध । तो तर सदा अनिकेत ॥

सुरेश्वर म्हणति हासून । अनिकेत जरी तुम्ही आचार्य ।
भक्तशिष्यांना हवा ना आश्रय । निर्मिला नाचार मठ ॥

शिष्यांनाही वाटते मनोमन । असावे एक गुरुपीठ ।
राजशेखरांचीही इच्छा उत्कट । बनते आहे कांची पीठ ॥

कांचीतील पाचवे पीठ । मानतील सर्व गुरुपीठे ।
सर्वज्ञांचे सर्वज्ञपीठ । मोक्षपुरीतील जणू मुकुट ॥७८॥

आचार्य वदती हासून । राजैश्वर्य येता सहाय्यास ।
बद्ध करू पाहता संन्याशास । याहूनही शोधेन मुक्तिमार्ग ॥
एकांती करिती विचारमंथन । अनेकातून शोधले एकत्व ।
तैसे कांची मठ मूळ तत्त्व । व्हावे इतर पीठांचे मूळपीठ ॥७९॥

आवश्यकता पडेल भविष्यात । मठाधिपती चारी दिशांतून ।
कांची मठात एकत्र येऊन । धर्मप्रसाराचे घेतील निर्णय ॥८०॥

©www.madhaveeragni.com

सर्व आहेत जमलेले। उत्साहाने काही हरविले।
आनंदाने कामास लागले। आता पुरवावा बालहट्ट॥२२॥
आचार्यांचा मिळता होकार। उत्साहाला आले उधाण।
सर्वज्ञ पीठावर आरोहण। केव्हा करतील आचार्य॥२३॥

चौल देशाच्या राजाने। दवंडी देवविली सर्वत्र।
अखेरचे हे शास्त्रार्थ सत्र। कुणीही यावे वादास॥२४॥

अनेक पंडित उभे वादास। परी शरण जाती अखेरीस।
अद्वैतवादी शंकराचार्यांस। विनविती करावे पीठारोहण॥२५

इतुक्यात आला एक समूह। ताम्रपर्णीतीरस्थ ब्राह्मणांसह।
या आठ वर्षांच्या बालकासह। म्हणती करावा शास्त्रार्थ॥२६

आचार्य म्हणती अवश्य। सर्वज्ञ ठरेल बालक जर।
बसेल हाची पीठावर। कोणीही न मानावा संदेह॥२७॥
सुरु झाला शास्त्रार्थ। तीन दिवस सतत वाद।
आचार्य साधती सुसंवाद। प्रसन्न मनी बालकावर॥२८॥

तीव्र बुद्धी वादकौशल्य। आचार्य करिती कौतुक।
परी अखेर झाला नतमस्तक। विनवी मानावे मजसी शिष्य॥

संपला अखेरचा वाद। सर्वज्ञत्व ठरले निरपवाद।
उठले श्री शंकराचार्य भगवत्पाद। सर्वांची विनंती मानून॥

आचार्य निघाले पीठासन्निध। जमलेले मुनी पंडित विद्वान॥
पदोपदी आचार्यां वंदून। अर्पिती आपापली भेट॥३१॥
सरदार मानकऱ्यांसमवेत। नदीवर्मन सुधन्वा राजसेन।
माना लववून कर जोडून। उभे मागीत कटाक्षार्थ॥३२॥

सामान्य जनास कळाले पूर्ण। विरागी संन्याशाचे श्रेष्ठपण।
पंडीत राजे धरिती चरण। सर्वस्व करिती त्या अर्पण॥३३॥

©www.madhuraveeradhuveer.com

पद्मपादाचार्यांचा हात धरून। आनंदे पीठारूढ होऊन।
सुवर्णासन केले पावन। एकमेवाद्वितीय संन्याशाने॥

कोणी करिती बाद्यांच्या गजर। कोणी करिती जयघोष।
कोणी उधळिती सुवर्णपुष्प। कैसा वर्णावा तो समारंभ॥

जगद्गुरु श्री भाष्यकार। जय पूज्य पादवर्य।
ब्रह्मात्मैक्य बोधय स्वामिन् अद्वैताचार्य। घोष चाले मार्गावर॥
हस्तामलक त्रोटक सुरेश्वर। हाती धरती छत्र चामर।
स्वर्णदीप तोरण मकर। मिरवावली आणि आयुधे॥३८॥

आचार्यांना करूनि दंडवत। प्रसन्न चित्ते गाती स्तवन।
सामान्यांचे गायन नर्तन। कलाकारही करिती वंदन॥

घोष करिती वरचेवर। जय जय शंकर।
हर हर शंकर। कांची शंकर कामकोटी शंकर॥
समारंभाची करिता सांगता। सर्व शिष्यांना उपदेश।
राजमंडळास धर्मादेश। आणि इतरां आशीर्वाद॥४०॥

चारी शिष्यांना देती निरोप। पूर्वीच रचले मठाम्नाय।
सर्वांसी आहे ते मान्य। त्याचेच घ्यावे मार्गदर्शन॥

शिष्य जरी संन्यासी। होती तरीही कासावीस।
केव्हा घडेल पुन्हा सहवास। जगद्गुरूंचे प्रसन्न दर्शन॥
मृदु अंतःकरणाचे आचार्य। उरी धरिती शिष्य।
स्पर्श तो मंगल दिव्य। शिष्यांस करी आश्वासित॥

हस्तामलक तोटक पद्मपादाचार्य। निघती साधाया पुढील कार्य
शृंगेरी पीठाचे सुरेश्वराचार्य। थांबले गुरूच्या आज्ञेने॥

सांगती त्यास मनोगत। सुरेश्वरा याही पीठावरी।
नेमला पाहिजे उत्तराधिकारी। नाही उरला फार अवधी॥

©www.madhaveeraghuveer.com

अंतिम वाद ज्याच्याशी केला। तोच शिष्य मी निवडला।
मनी काही बेत केला। पटते पाहा का योजना॥४६॥

गुरुपीठावर बालक नेमला। प्रौढ बसले शिष्यपीठावर।
न उद्भवो कोणतेही अवडंबर। यामुळे पुढे भविष्यात॥४७॥

संन्यासदीक्षा देऊन त्याला। जरी पीठाधीश केला।
तरी प्रतिपाळ पाहिजे केला। त्याचा तुम्ही सुरेश्वर॥४८॥

संसार अर्धाच टाकून। संन्यास घेतला, तू शिष्यवर।
मनी तुझ्या वात्सल्य अपार। वर्षवावे या बालकावर॥४९॥

सुरेश्वर झाले सद्गदित। ऐकता गुरुमाऊलीचे मनोगत।
जाणुनि माझे हृद्गत। सुप्त वासना केली तृप्त॥५०॥

ऐसा होता सुसंवाद। बालकास दिले दीक्षानाम।
श्री चरणेन्द्र सरस्वती सर्वज्ञात्म। सोपविले सुरेश्वराचार्य हाती॥

आत्मपूजार्थ जे पाचवे लिंग। चंद्रमौलीश्वर नामे योगलिंग।
श्री सुरेश्वराचार्यांचे हातून। दिधले श्री चरणेंद्र सरस्वतीस॥

काय घडले भविष्यात। आचार्यांचे उदात्त जीवनात।
मिळतो का काही इतिहास। जाणावे पुढील अध्यायी॥

इति श्री आदि शंकर लीलामृत। तेविसावा अध्याय समाप्त।
कृपा होवो सदा प्राप्त। ग्रंथ होवो पूर्ण सार्थ॥५४॥

शुभं भवतु। शुभं भवतु। शुभं भवतु॥

५-५-२०१६

©www.madhaveeraghuveer.com

॥ॐ॥

## - अध्याय चोवीसावा -

जगद्गुरु श्री आदिशंकरा। वर्णावे अमुल्या अवतारा।
अल्प ही कामना पूर्ण करा। वंदिते या आधारा॥

वाद सभानुन सर्वा जिंकून। सर्वज्ञ पीठावर आरोहण।
कामकोटी पीठाचे व्यवस्थापन। वर्णिले मागील अध्यायी॥

बाल वयाचा चरणेंद्र सरस्वती। शिष्य म्हणून जमला मनी।
चरित्र वृत्तान्त विचारुनि। अंतःकरणाचा ठाव घेई॥

म्हणे अहो गुरुवर्य। शंकराचार्य हीच पदवी।
प्रत्येक मठाधिपती लावी। आपली ओळख करी त्यायोगी॥

शंकराचार्य सांगती हसून। कशास हवी खूण।
ओळखावे आपणास आपण। हेच सर्वश्रेष्ठ ज्ञान॥५॥

आले होते हस्तामलक। त्यांना विचारले मी तू कोण।
म्हणती नित्योपलब्धी जाण। तोच त्यांची होती खूण॥

होतो तुम्हा एवढा लहान। गुरु गोविंदयती पुसती तू कोण।
शिवोऽहं मी सांगितले जाण। तीच माझी ओळख॥८

बाह्य नाम बाह्य वेष। पदवी अथवा सन्मानस्थान।
ही नव्हे रे अंतरीची खूण। नित्य जाणावे चिदानंदरूप॥

बालस्वामी घाली वाद। प्रत्येकास कसा होईल बोध।
आणि घेणार तरी कसा शोध। हवी मुक्तान विद्या॥९

इतुक्यात आला एक शिष्य। म्हणे थोडक्यात सांगा
आत्मबोध
नको कटकटीचा शोधाशोध।
आपण साक्षात असताना॥१०

© www.madhaveeragnuveer.com

आचार्य हासुनि पुसति त्यास। सांग बाळा प्रकाशवी कोण?
शिष्य म्हणे सोपा प्रश्न। दिवसा सूर्य रात्री दीप॥११॥

पुन्हा विचारिती आचार्य। जेव्हा नाही दिवा नाही सूर्य।
कसे पाहसी दृश्य। सांग जरा त्वरा करून॥१२॥

शिष्य तत्काळ तत्परतेने। माझ्या डोळ्यांनी देई उत्तर।
आचार्य पुसति सत्वर। डोळे मिटता मग कोण?॥१३॥

सांगे शिष्य विचार करून। गुरुजी मनःचक्षु सदा जागृत।
आचार्य हासून पुसत। कोण उजळिते मनबुद्धिस॥१४

शिष्य समजला पूर्ण। म्हणे मीच की हो आचार्य।
मी मूळ चिदानंदमय। त्याला सोपा आत्मबोध॥१५॥

बालस्वामी होते ऐकत। संवाद दोघांचा समस्त।
म्हणती होऊन आनंदित। किती सारभूतसा आत्मबोध॥

आता करा ना शिष्यबोध। बसलो धरुनि हीच आस।
मन निमित्ते सर्व शिष्यास। द्यावा साधनसंबंधी उपदेश॥

सहज सोपी प्रासादिक। रचना केली उपदेशपंचक।
वस्तुतः ते साधनपंचक। रचिले शंकराचार्यांनी तत्काळ॥

संन्यासी वा गृहस्थाश्रमी। असो कोणी भक्त वा ज्ञानी।
त्या सर्वांसी मार्ग दावुनि। सहाय्यभूत साधनसा॥१९॥

नित्यनेमे करिता पठण। अर्थाचे करिता मनन।
संसारतापाचे सर्वथा शमन। मिळेल शांती परमानंद॥

शंकराचार्यांचे ऐसे शिकवणे। साधकाचा अधिकार ओळखून।
योग्यतेनुसार मार्ग दावून। प्रत्येकास करणे उन्नत॥

शिकत होते बालस्वामी। पीठाधीश म्हणून पावावे मान्य।
यासाठी आचार्यांचा प्रयास। काळाचा विचार वेगळा॥

आला आला जवळी काळ। म्हणे संपविणे आता खेळ।
माझ्यासह तूही चल। स्वधामी पोचणे तुज आता॥

आचार्य वदति त्यास। अरे मित्र तू माझा प्रिय।
उगाच का दाविसी भय। आली का आता वेळ?२४॥

काळ सांगे आला नाही। सूचना देण्यास झालो पाही।
पराभूत दोनदा तुझ्यापायी। आता मात्र जिंकेन॥ २५॥

आचार्य विचारती काळास। पराभवाची अजून बोच।
का बाळगिसी उगाच। जन्मापासून सखा तू॥२६॥

काळा तुझे चक्र फिरते। म्हणून जन्ममरणाचे फेरे।
जन्ममृत्यूच्या मध्यात बारे। राहिले ते जीवन॥२७॥

कालातीत केवळ ब्रह्म। बोल ऐकता मृत्यु कंपित।
ज्ञानापुढे तो सदा लज्जित। ज्ञानेच मिळे मुक्ति॥२८॥

आचार्य जाणती मनोमनी। काल कोणी दुजा नाही।
तमोशक्ति भगवान महेशाची। संहारकर्ता वा विष्णूची॥

उत्पत्ति तेथे लय निश्चित। लयापूर्वी उत्पत्ति निश्चित।
म्हणून शोधणे अनादि तत्त्व। जन्ममृत्युरहित परब्रह्म॥

जेथून आलो तेथे जाणे। त्यासाठी साधन होणे।
सदैव जीवासंगे राहणे। मृत्युसारखा नाही मित्रा॥३१॥

आचार्यांसी न देता आलिंगन। काळ गेला अन्यत्र निघुन।
जाता म्हणे, पुन्हा येईन। तेव्हाच मित्रा आलिंगेन॥३२॥

काळाच्या भेटीने आचार्य प्रसन्न। म्हणती झाले कार्य संपन्न।
प्रतिष्ठा पावले वेदान्त ज्ञान। अनायासे जाईन स्वरूपासी॥

कधी बसुन शांत मौन। ऐकती स्तोत्र शिष्य मुखातून।
स्वतः ही गाती आवर्जून। मृत्युंजय मानस पूजा॥३४॥

पूर्वीच केलेल्या असंख्य रचना। प्रसंगानुरूप ऐकविती भक्तांना।
क्वचित करती रचना। छोटेशी परी यथार्थ॥३५॥

ब्रह्मानंदी सदा मग्न। खाण्यापिण्याचे नुरले भान।
कधी शिवाचे गाती भजन। मुखी सदैव आनंद आनंद॥

शरीरास पडले सदा कष्ट। कसे रहावे धष्टपुष्ट।
परी मनी सदा संतुष्ट। सर्वथा दिसती तेजःपुंज॥३७॥

शरीराभोवती तेज फाकले। मृदु ताम्र दिसती पाउले।
स्निग्ध वात्सल्य दृष्टीत भरले। आचार्यांचे रूप वर्णनातीत॥

दर्शनास येती असंख्य जन। मुग्ध होती घेता दर्शन।
वाटे कृतार्थ झाले जीवन। भवार्णवी भेटे भगवंत॥

कानांवर जयघोष निरंतर। जय जय शंकर आदि शंकर।
भवतापाचा पडे विसर। दिसो लागे जगाचे सुंदर॥

©www.madhaveeraghuveer.com

प्रेमळ मधुर शब्दात। ज्याच्या त्याच्या योग्यतेनुसार।
आचार्य सांगती अल्पसे सार। वैदिक धर्मातील तत्त्वांचे॥

भासमान ते तात्कालिक। ज्यावरी भासे ते चिरकाल।
जो नित्यानित्य जाणेल। त्याचे षड्रिपु शमतील॥

भासमान तेचि असत्य। ज्यावरी भासे ते सत्य।
जाणावे अंतरी सत्यासत्य। संपावे तरी सुखदुःख॥

मायावरण दूर सारिता। प्रत्यय येईल आनंदाचा।
ब्रह्मकंद जो आनंदाचा। अभ्यासाने अनुभव घ्यावा॥

चित्तशुद्धि हे करुनि साधन। दूर करावे मायावरण।
हृदयी प्रकटे ब्रह्मज्ञान। सार्थचि होईल जीवन॥

आचार्यांच्या वाणीमधून। प्रकटत राहि तत्त्वज्ञान।
श्रोत्यांचे मन होई लीन। वाटे कृतार्थ जीवन।।ध्य॥

आत्मबलाची होई जाणीव। दीन-हीनता जाई संपून।
स्वस्वरूपाचे येई भान। करु लागतो नेटे साधन॥

संपत आला जीवनाध्याय। शिष्यांसी नेमके कोणते काय।
सामान्यांसी कथिले काय। जाणावे पुढील अध्यायी॥

इति श्री आदिशंकरलीलामृत। चोविसावा अध्याय समाप्त
कृपा व्हावी सदा प्राप्त। ग्रंथ होवो पूर्ण सार्थ॥

शुभं भवतु। शुभं भवतु। शुभं भवतु॥

६.५.२०१६

॥ॐ॥

## - अध्याय पंचविसावा -

जगद्गुरु श्री आदि शंकरा। वर्णावे आपुल्या अवतारा।
अल्प ही कामना पुर्ण करा। प्रार्थिते घ्या आधारा॥१॥

जगद्गुरुंच्या सान्निध्यात। नित्य राहणे हेच शिक्षण।
बालस्वामी करिती ग्रहण। वर्णिले मागील अध्यायी॥

मुख्य पाच स्थापिले मठ। वेदान्त धर्माचे पंचप्राण।
मठाधिकारी नेमले सुजाण। कार्य चालावे अखंडित॥३॥

जाणत होते आचार्य। चार शिष्य चार मठावर।
सर्वांचा हवा एक विचार। तरच घडेल धर्मप्रसार॥४॥

प्रत्येक मठाचे क्षेत्र निश्चित। तेथे रहावे कार्यमग्न।
तेथुनच द्यावे दक्षिणादान। क्षेत्री निर्मावे मठ नवीन॥

धर्माचा असावा अभिमान। राखावे परी सदा भान।
करु नये कुणाचा अपमान। असावे सर्वसमावेशक॥६॥

जो खरा अद्वैताभिमानी। राहील त्याची मधुर वाणी।
गुंतणार ना मानापमानी। कर्मफल संन्यासी वृत्तीचा॥

शांत सौम्य आचरण। शोभे पीठाधीश स्वामीस।
आस्तित्वेही सामान्य जनास। लाभावे शांती प्रेम आधार॥

चारी दिशांचे मठाधिकारी। जाणती मनोगत अंतरी।
वागू पाहती आचार्यांपरी। आपापल्या मठ क्षेत्री॥९॥

नास्तिकांचा प्रभाव संपला। वेदान्त चण्डांशु प्रखर झाला।
सर्वत्र पुन्हा होऊ लागला। वेदान्ताचा जयघोष॥१०॥

© www.madhaveeraghuveer.com

काम क्रोध लोभ मद मत्सर।व्यापु पाहती प्रत्येकाचे अंतर।
तेणे धर्माचा पडोनि विसर।चिंता शोक मोहादि अनावर।

श्रुतिस्मृतिंची थोर शिकवण।विसरत होते सकल जन।
आचार्यांनी केले जागृत भान।आणि चित्त संस्कारित॥१२॥

मातापित्यांना करावे वंदन।गुरुसी द्यावा सदैव मान।
स्वधर्माचा असावा अभिमान।काम करावे आसक्तीवाचून॥

चारी मठातून हाच आदेश।पीठाधिकारी देती सर्वांस।
वाढे लोकांचा विश्वास।मानिती हे खरे धर्मपीठ॥१४॥

कांची मठात बालस्वामी।घेती मनीच्या शंका फेडुनी॥
आचार्यांना प्रश्न विचारुनी।जेव्हा मिळेल संधी॥ ॥१५॥

असाच केला एकदा प्रश्न।अवतार मानिलात बुध्ददेव।
शून्यवादाचा केला पराभव।नव्हे का हे परस्परविरुध्द॥

जगद्गुरु सांगती समजावुन।घातलास ना वाद सतत।
माझ्याशी तीन दिनपर्यंत।परी झालास प्रेमे आधीन॥

वादाचा झाला तत्त्वावरुन।एकमेकांना लेखले हीन।
अरे सांगुन गेले विद्वान।वादे वादे जायते तत्त्वबोधः।

आपणा दोघात झाला वाद।सत्य शाश्वत उरले काय।
श्रुतिमत जे दोघांसी मान्य।संपले तेथेच मतभेद॥

बुद्धावतार झाला भूतकाली।त्यांचे अनुयायी माझे भोवती।
वेदान्तधर्माची हानी करती।शून्यवादाच्या प्रतिपादने ॥२०
परी ना जाणले त्यांनी तत्त्व।सिद्धार्थ बनला संन्यासी।
त्यागुनि राज्य पत्नी पुत्रासी।तपाचरणे तो वैदिक मुनी।

©www.madhaveelaghiveer.com

पुरे पेलता चित्तशुद्धी। वैराग्ये प्रगटली ज्ञानबुद्धी।
अश्वत्थाखाली अनुभूती। अंती प्रगटला गौतमबुद्ध॥२२॥

जैसी जेव्हा समाजस्थिती। तिजनुसार पृथ्वीवर।
भगवंत घेई अवतार। कधी पूर्ण कधी अंश॥२३॥

बुद्धापूर्वी कृष्णावतार। संहारकर्ता कालमात्र।
जगास देई गीताशास्त्र। खल निर्दालन सज्जन तारण॥
लोटला काळ वाढे मांसाशन। मुक्या प्राण्यांचा व्यर्थ संहार।
चालला यज्ञाच्या नावावर। हा नव्हता वैदिक धर्म॥२५॥

तामस आहारे तामस वृत्ती। वाढल्या समाज चित्ती।
कधी ना वाटे कोणा तृप्ती। जणू लोपली दैवी संपत्ती॥

आसुरी वृत्तिचा करण्या नाश। क्रोध-लोभाचे तुटावे पाश।
सर्वाभूती पहावा ईश। सांगण्या घेतला बुद्धावतार॥

कृष्णावतारी शास्त्र बोलणे। बुद्धावतारी मौन राखणे।
आचरणाने जगा शिकविणे। का न मस्तक नमवावे॥
हे सूक्ष्म तत्त्व न जाणता। बुद्धानुयायांनी भुलविले समस्ता।
म्हणती गौतमाचा धर्म वेगळा। वैदिक मताना मानणारा॥

म्हणून लागले करावे। बौद्धमतांचे सशास्त्र खंडन।
आणि वेदान्तधर्माचे मंडन। अद्वैत तत्त्वानुसार॥३०॥

बाळा नीट समजून घे। बुद्धानुयायांचे शून्यत्व।
वेदान्त्याचे पूर्णत्व। दृष्टिकोनातील भिन्नत्व॥३१॥

बघ हा पेला अर्धा भरला। पाहणाऱ्याचा दृष्टीकोन निराळा।
कोणी म्हणे अर्धा भरला। कोणी म्हणे अर्धा रिकामा॥

© www.madhaveeraghuveer.com

ब्रह्मदृष्टीने पाहता पूर्णत्व। शून्य दृष्टीने पाहता शून्यत्व।
व्यावहारिक सत्तेने सुखदुःख। परमार्थतः सच्चिदानंद॥

श्रुतींना मानिती ते आस्तिक। श्रुतींना नाकारती ते नास्तिक।
आस्तिक अनुभविती पूर्णत्व। नास्तिक म्हणती अखेर शून्य॥

याचसाठी अरे बाळा। मांडुक्यावर सुंदर सोप्या।
गौडपादांनी कारिका रचल्या। जोपासली वेदांत परंपरा॥

तुजही करणे तेचि कार्य। वेदांताचे सर्व तथ्य।
जग मिथ्या ब्रह्म सत्य। अनुभवावे स्वस्वरूप॥३६॥

स्वस्वरूपाची ओळख पटता। कोणत्याही भेदरहित तुझ्या।
बुद्धीत होईल स्पष्ट सारा। पंथोपपंथांचा समन्वय॥

बालस्वामींचे झाले समाधान। वैदिकधर्माचे आचरण।
पंथ विसरुनी धरावे चरण। कळले मजला गुरुवर्य॥

श्री शंकराचार्य ध्यानमग्न। असता, जमुनि शिष्यगण।
पूर्व प्रसंगाचे करुनि स्मरण। कथा सांगते अविस्मरणीय॥

कथेतून चर्चा सुरु। चर्चेतून तत्त्वमंथन।
मंथनातून शंकापरिहार। संतोष पावे श्रोतृगण॥

अशाच काही सुंदर स्मृति। सांगती आचार्यांची महती।
कधी एखादी चमत्कृति। जाणावे पुढील अध्यायी॥

इति श्री आदिशंकर लीलामृत। पंचविसावा अ. समाप्त।
कृपा व्हावी सदा प्राप्त। ग्रंथ होण्या पूर्ण सार्थ॥४२॥

शुभं भवतु। शुभं भवतु। शुभं भवतु॥

९.५.२०१६

©www.madhaveeraghuveer.com

॥ ॐ ॥

## - अध्याय सव्विसावा -

जगद्गुरु श्री आदि शंकरा । वर्णावे आपुल्या अवतारा ।
अल्प ही कामना पूर्ण करा । प्रार्थिते द्या आधारा ॥१

बालस्वामींचे शंका निरसन । का केले बौद्धांचे खंडन ।
वेदान्तधर्माचे प्रतिपादन । वर्णिले मागील अध्यायी ॥

आचार्य जेव्हा ध्यानमग्न । त्यांचे विषयी स्वानुभव ।
शिष्य आपुल्या स्मरणातून । सांगती अहमहमिकेने ॥३

एक शिष्य म्हणे आनर्जुन । स्मरणशक्तीचे आचार्या वरदान ।
प्राप्त असावे जन्मापासून । राजशेखराचे द्या उदाहरण ॥

राजशेखर साहित्यप्रिय । लिहिले त्याने एक नाटक ।
वाचून दाविले आचार्यांस । काव्य एके काळी ॥५॥

तदनंतर गेले आचार्य । धर्मप्रसारार्थ प्रांती इतर ।
दुर्दैवे पीडिला राजशेखर । नाटक झाले भस्मसात ॥६।

कालांतराने भेटता आचार्य । राजशेखर झाला शिष्य ।
एके शास्त्रचर्चा दिव्य । मनी धरोनि शरणभाव ॥७।

सांगा मजसि राजशेखर । मधेच पुसती आचार्य ।
साहित्य रचना नवीन काय । राजासि सुचेना उत्तर ॥८

अखेर सांगे मनोगत । आता नाही मन रमत ।
साहित्य कला क्षेत्रात । नाटक गेले अग्नीत ॥९॥

स्वर झाला सद्गदित । अश्रु उभे नयनात ।
शब्द पुढे उमटेनात । राजशेखर दिसे म्लान ॥१०॥

© www.madhaveeragnuveer.com

करुणालयाचे शंकराचार्य । वात्सल्य ओतप्रोत नयनामृत ।
बदले किंचित हासून । स्मरते तुझे नाटक ॥११॥

राजा काहीसा भांबावला । म्हणे "मलाहि स्मरते तैसे ।
परि मूळ लेखना एसे । कैसे आता होईल?" ॥१२॥

आचार्य सांगती 'लेखणी उचल । लिहून घे सांगतो तैसे ।
नंतर सांग योग्य की कैसे । होईल ते लिखाण ॥१३॥

किंचित थांबुनि करती स्मरण । राजशेखर घेई लिहून ।
बघता बघता संपले सांगून । जैसे होते तैसेचि ॥१४॥

हर्षाला नुरला पारावार । स्मरणशक्तीचे अपूर्व दर्शन ।
राजा धरी आचार्य चरण । वंदी क्षमा मनोभावे ॥१५॥

आचार्य म्हणाले उठ राजा । होउ दे आनंदित सारी प्रजा ।
नाटकाचा प्रयोग करी जा । संधी उत्तम कलाकारा ॥

राजा विचारी होउनि शांत । कैसे राहिले सर्व स्मरणात ।
आपणासी तर व्याप अनंत । नाटक त्यापुढे अति क्षुद्र ॥

आचार्य सांगति समजावुन । ध्यानात घे नीट पंचीकरण ।
कळेल कैसे घडते स्मरण । शास्त्रशुद्ध स्पष्टीकरण ॥

कशाचेही करिता श्रवण । आपमहाभूताचे स्निग्धत्व ।
चित्तवृत्तिशी करी निगडीत । परी हवा अभ्यास ॥१९॥
पृथ्वी महाभूताचे स्थिरत्व । आस्मिता होउनि जागृत ।
ठसा उमटे अंतःकरणात । धारणाशक्ति प्रत्येकाची ॥२०॥

आठवा वेदपठनाची रीती । एकाग्र मनाने ध्यानस्थिती ।
त्या योगे वाढे स्मरणशक्ती । परी हवा अभ्यास ॥२१॥

©www.madhaveraghuveer.com

तुझे पूर्वी ऐकला नाटक। विषय होता वेदान्ताशी निगडीत।
सामान्यांसही करी आकर्षित। म्हणोनि राहिले स्मरणात॥

परमेश्वराचे खरे इच्छित। तू मी तर निमित्तमात्र।
त्यासी हवे ते घडे निश्चीत। म्हणून स्मरले नाटक॥ २३॥

ऐकता नाटकाची कथा। दुसरा शिष्य सरसावला।
म्हणे असाच आहे बोलबाला। पद्मपादाचार्यांच्या चतुःसूत्रीचा॥
जमलेला भक्त शिष्य। आतुरतेने विचारती त्यास।
सांगावे त्याही प्रसंगास। जरी स्वतः अनुभविला॥ २५॥

सुरु झाली दुसरी कथा। केरळ यात्रेत आचार्यांच्या।
आश्चर्यकारक प्रसंग घडला। महाशूर नामक तीर्थक्षेत्री॥

एके दिवशी अकस्मात। भेटीस आले पद्मपादाचार्य।
आनंदे पुसति शंकराचार्य। आहे ना सर्व क्षेमकुशल॥

पद्मपादांचे मन उचंबळे। टपटपा अश्रूंची धार गळे।
गुरुचरणांशी टेकले डोके। शब्द उमटेना मुखातून॥

उठविती आचार्य शिष्यास। वात्सल्यभावे कुरवाळीत।
आपुल्या हाते नेत्र पुसत। वदति सांग काय घडले?॥२९॥

आचार्यांचा हात फिरता। दुःखावेग दूर झाला।
सांगू लागले कर्मकथेला। कर्मकांडी मामाने घात केला॥

ब्रह्मसूत्र भाष्यावर। विजयडिंडिम नामे टीकाग्रंथ।
लिहून झाला साद्यंत। मामाने तो पाहिला॥ ३१॥

मज वाचावयाचा म्हणून। घेतला माझी स्तुति करुन।
मी परतलो यात्रेहून। म्हणे नष्ट झाला अग्नीत॥३२॥

©www.madhaveeraghuveer.com

अद्वैत मतापुढे नाही टिकाव। मामाच्या मनी उपजला वैरभाव।
वरी वरी दाखवुनी प्रेमभाव। विषप्रयोगही केला मनवर॥

आता काय करु मी आचार्य। पुन्हा कैसी ती रचना घडेल?
केली होती टीका सखोल। अभ्यास मननाचा परिपाक॥

जगद्गुरु म्हणती पद्मपाद। सोसल्यास तू अनंत आपदा।
विजयडिंडिम हो ग्रंथसंपदा। नाही झाली पूर्ण नष्ट॥

ब्रह्मसूत्रातील पहिल्या चार। सूत्रांवरची तुझी टीका।
पूर्वीचे दाविली नव्हतीस का। स्मरणात आहे ताजी माझ्या॥

तुझी टीका बहारदार। म्हणून कोरली स्मृतिपटलावर।
लवकरच करील तुला अमर। उचल लेखणी सांगतो मी॥

आचार्य क्षणैक स्तब्ध बसले। पद्मपाद तयार झाले।
लेखणी घेऊन सरसावले। चतुःसूत्री टीका यथापूर्व॥

झाले विस्मित सारेजण। म्हणती कैसे हे अगाध स्मरण।
शब्यकृतीचे पुन्हा उद्धरण। पद्मपाद पावले समाधान॥

ऐकता ऐशा रम्यकथा। म्हणती धन्य झाली भारतमाता।
युगांनी अवतार ऐसा लाभला। कैसे ज्ञान लोपेल?

ध्यानावस्था संपता उठोन। आचार्य पाहती सर्वांस।
पुसती चालला कशाचा प्रयास। काय साधले जमुनी?

लहानगा एक निष्पाप बटु। सांगे ऐकता तुमची कीर्ति।
सर्वत्र पसरली ख्याति। आपुल्या स्मरणशक्तीची॥ ४२

©www.madhavaraghuveer.com

आचार्य सांगती सर्व स्पष्ट। होऊ नये उगाच थाट।
वाढवू नये गुरुचा थाट। मूळ कार्यास लागे नाट॥४३॥

कीर्तन हे तर भक्तिसाधन। कशास करावे ईश्वरावाचून।
तत्त्वाचे करावे चिंतन। वाढवू नये भक्तिमाहात्म्य॥४४॥

हे आहे कामकोटि पीठ। सर्वदा व्हावे सर्वज्ञ पीठ।
प्रत्येकाने आणावी ज्ञानवीट। ज्ञानमंदिर उभारावे॥४५॥

होवोनिया अतीव धीट। मार्ग चालू नये धोपट।
करुनिया विचार श्रेष्ठ। मार्ग चालावा पुढील॥४६॥

ठेवण्या ज्ञानदीप तेवता। हवी अभ्यासाची दृढता।
क्षणही उसंत न घेता। साधकाने करावा शास्त्रार्थ॥४७॥

ऐसे जरी घडेल। तरीच ज्ञान ना लोपेल।
वेदानधर्म फोफावेल। प्रत्येका आनंद लाभेल॥४८॥

श्री शंकराचा ज्ञानावतार। सर्वांस करी योग्य बोध।
वेळोवेळी करुन सावध। सर्वत्र नेणे आनंद॥४९॥

परी ज्याने केला देहधारण। त्यास होणे देहमुक्त।
मिळते का काही इतिवृत्त। जाणावे पुढील अध्यायी॥५०॥

इति श्री आदि शंकर लीलामृत। सव्विसावा अध्यायसमाप्त।
कृपा व्हावी सदा प्राप्त। ग्रंथ होवो पूर्ण सार्थ॥५१॥

शुभं भवतु। शुभं भवतु। शुभं भवतु॥

१०.५.२०१६

©www.madhaveeraghaveer.com

॥ ॐ ॥

## -अध्याय सत्ताविसावा-

जगद्गुरु श्री आदिशंकरा । वर्णावे आपुल्या अवतारा ।
अल्प ही कामना पूर्ण करा । प्रार्थिते या आधारा ॥१॥

कळले आचार्यांसी स्पष्ट । काळ झाला मनी अधीर ।
बत्तीस वर्षे झाली पार । आता देणे दृढ आलिंगन ॥२

आचार्य राखिती पूर्ण मौन । देती सर्वांस आशीर्वचन ।
अंतरी सतत लागेल ध्यान । जीवन्मुक्ताचे अंतिम दिन ॥

आठविती शिवगुरूंचे शब्द । मृत्यू नर तुझा सुहृद ।
येता होऊ नको हतबुद्ध । मृत्यूवर मात करी सुबुद्ध ॥४

तसेच आठविती काळाचे शब्द । येईन जेव्हा परतून ।
देईन दृढ आलिंगन । होणार नाही पराङ्मुख ॥५॥

काळ म्हणजे परमेश्वर । सोडी इथेच देह नश्वर ।
चैतन्यास ठावी आपुले घर । जेथूनि आले तेथेचि जाणे ॥

देह म्हणजे पंचमहाभूत । होती जैशी एकत्र ।
तैसी तैसी आकृति उमटत । म्हणती कुरूप वा सुंदर ॥

परी चैतन्याचे रूप निराळे । मोहक सुंदर आगळे ।
भरुनी राही विश्व सगळे । तेणे अनाहतनाद गगनात ॥

वायूची लहर खेळे । तेजाचे रूप सळसळे ।
जल सर्वत्र खळखळे । सुगंधाची लाट पृथ्वीमुळे ।

परी संसारी वेळ कोणा । चैतन्याशी हितगुज करण्या ।
धाव धावे विषयी रमण्या । जड द्रव्याचे आकर्षण ॥

© www.madhaveeraghuveer.com

चैतन्य जाता निघुन। काय करायचे देह जपुन।
अग्नीस करून अर्पण। राहू देऊ नये शेवा ॥११॥
अस्थि रक्षा सर्व काही। जलामध्ये सोडून पाही।
स्थूल देहाची नामनिशाणी। मिटवावी संपूर्ण ॥१२॥

परी वेडे भाविक जन। दात, नख, केस ठेवती जपून।
अथवा समाधी बांधून। अनित्यासी देती नित्यत्व ॥१३॥

हेच टाळायाचे मज। सांगितले कित्येकदा गूज।
मरणाऱ्याचे काय काज। जपावे त्याचे जीवनतत्त्व ॥१४॥

परी होउनि भावनाविवश। विसरती धर्माचा आदेश।
आणि ज्ञानियांचा उपदेश। बांधति भव्य समाधिस्थळ ॥

जरी हे सर्व टाळायाचे। संन्यासधर्मा पाळायाचे।
ईशान्य दिशेस धरायाचे। चालत राहणे अखंड ॥१६॥

आठवावी स्मृतिवचने। संन्याशाचे कैसे वागणे।
देह पडेल तेथे पडू देणे। नाही कोठे गुंतून पडणे ॥१७॥

जरी नाही कोठे गुंतणे। कैलासासी संलग्न होणे।
अंत करणाचे हेच सांगणे। त्यासाठी हवी कांची सोडणे ॥

देहासह की देहविरहित। कांची क्षेत्रातून गाठणे केदार।
आचार्यांचा महान विचार। कोण कैसा कळणार ॥१९॥

कामाक्षी मंदिराचे मागील बाजूस। शंकराचार्य घालून सिद्धासनास।
सांगे कांची पीठाचा इतिहास। पावले विदेह मुक्तीस ॥२०॥

कोणी म्हणती आचार्य। जाऊन केदारक्षेत्रात।
ध्यानस्थ झाले गुहेत। तेथेच त्यांची समाधी ॥२१॥

© www.madhaveeraghuveer.com

कोणी म्हणती हिमालयात। आचार्य झाले कोठे गुप्त।
कोणासी नाही माहीत। केव्हा झाले स्वरूपी लीन॥

समन्वयवादी देती निर्णय। सोडून देह कांचीत।
आत्मज्योती चारी पीठात। झाली एकच वेळी प्रज्वलित॥

अलौकिक व्यक्तिमत्व आचार्यांचे। अलौकिक जग सोडणे।
ज्या ज्या क्षेत्री चालली चरणे। श्रद्धेने मस्तक नमावेणे॥

आचार्यांचा अखंड प्रवास। कांची क्षेत्री गेला संपुष्टास।
विजययात्रांचा इतिहास। नंतर नाही उपलब्ध॥२५॥

ज्योतीने ज्योत उजळत। तेजोमय केला देश भारत।
मठ स्थापुनि चारी दिशात। वैदिक धर्म प्रतिष्ठित॥

पूर्णत्वा जाता आपुले ध्येय। कोणीही अवतार नारायण।
आपुल्या मूळ परमात्मस्वरूपात। विलीन होती तत्काळ॥

तैसेच श्री शंकराचार्य। अमर करुनि शांकर वेदांत।
मिळून गेले शिवरूपात। अद्वैतासी परम स्थान॥

कैसे फेडावे त्यांचे ऋण। कैसे करावे नामस्मरण।
कोणते ठेवावे आचरण। भांबावले शिष्यगण॥२८॥

आचार्य गेले निघोन। जाहले प्रत्येक मन खिन्न।
परी आचार्यांचे शब्द आठवुन। लागली जोमाने कार्यासी॥

शिष्यांच्या मनी एकच भाव। जगती नाही अन्य कोणी।
भगवत्पादाचार्य शंकरावाणी। जगद्गुरु हे
ज्ञानखाणी॥३१॥

©www.madhaveeraghuveer.com

आचार्या: शंकराचार्या: । सन्तु जन्मनि जन्मनि ।
हीच करिती मागणी । नारायणाचे चरणी ॥३२॥

येथून पुढे भविष्यात । पेलवे ना ज्यांना अद्वैत ।
मत्सर होऊन जागृत । धिक्कारतील आचार्य भाष्य ॥३३

परी पुन्हा उगवेल ज्ञान सूर्य । भाष्यकारा ते वाट पुसत ।
अजाण भक्तांसि सांगेल सार्थ । ज्ञानेश्वरी-गीतेचा भावार्थ ॥

विज्ञान युगातील विचारवंत । पाश्चात्य विचारांचे पंडित ।
विविधतेतून एकात्मतेचा मंत्र । म्हणतील दिधला शंकराचार्ये ॥

परी पदवी मंडित विद्वान । म्हणतील आचार्या बौद्ध प्रच्छन्न ॥
कुणी म्हणतील संन्यासी धूर्त । देतील दूषणे अनंत ॥

देशोदेशींचे तत्त्वज्ञ । मानोत कोणताही पंथ ।
परी आचार्य प्रणीत अद्वैतमत । सर्वा दिसे अग्रगण्य ॥

विरोधी भक्तीने कोणी प्रेरित । आचार्यमताचे करण्या खंडन ।
उठेल परी करोनि मंडन । म्हणतील एकमेवाद्वितीय हे ॥

भक्तीमार्गाचे प्रेमळ साधक । आचार्यांची स्तोत्रे सुंदर ।
हृदयी ठेवतील निरंतर । उपासनेचे श्रेष्ठ साधन ॥३९॥

आचार्य म्हणजे एकत्व । आचार्य म्हणजे अभेदत्व ।
आचार्य म्हणजे समानत्व । आचार्य म्हणजे साक्षात ज्ञान ॥

॥ केले सर्वांस खुले द्वार । मुक्तीचा प्रत्येकास अधिकार ।
बंधाचा सदा धिक्कार । स्वतंत्रतेचा पुरस्कार ॥ ४१ ॥

©www.madhaveeragnuveer.com

मुक्तिचा सदा जयजयकार। आत्मतेजाचा जणु सागर।
वंदिले मी आदि शंकर। कलियुगातील ज्ञानावतार॥

जरी नाही मज अधिकार। सर्वांच्या कृपेने येथवर।
वर्णिला आदि शंकरावतार। त्यांनीच दिले लेखनबळ॥

जरी पावले स्त्रीजन्मा। कार्य करून घेतले उमारमणा।
चालले शोधित पाउलखुणा। कळले स्त्रीधर्म नाही उणा॥

रुढींनी दिला नकार। श्रुतिस्मृतींनी दिला अधिकार।
आत्मज्ञानाच्या मार्गावर। स्त्री पुरुष भेद निराधार॥४५॥

त्रुटी आढळतील विद्वाना। नम्रत्वे करिते क्षमायाचना।
अंतरीचा भाव जाणा। हीच अखेर प्रार्थना॥

लेखन करिता आनंद। मनन करिता आनंद।
भोगला आनंदी आनंद। आता थांबली लेखणी॥

झाली ग्रंथ संपादणी। प्रसन्न होता शूलपाणी।
वृत्ति आता उदासवाणी। सांभाळा गुरुवरा शंकरा॥

निर्मल होऊन पदी लीन। विनवी उरले जे जीवन।
कर्मभोग सारे संपून। लाभो अंती स्वस्वरूप॥४९॥

इति श्री आदि शंकर लीलामृत सत्तावीसावा अध्याय समाप्त
कृपा श्री आपुली झाली प्राप्त। तेणे ग्रंथ झाला समाप्त॥

शुभं भवतु। शुभं भवतु। शुभं भवतु॥

११ मे २०१६
वैशाख शुद्ध पंचमी
शंकराचार्य जयंती।

©www.madhaveeraghuveer.com

॥ ॐ ॥

॥ [illegible] ॥

## श्री शंकराचार्य आरती

जयदेव जयदेव आदिशंकरा श्री आदिशंकरा
अज्ञानासि हरुनि उद्धारिसी जगता
जयदेव जयदेव -------- ॥ ध्रु. ॥

जगती झाले थोर ज्ञानावतार
व्यासानंतर प्रकटे आदिशंकर।
भाष्यकारा पुसतु ज्ञानेश्वर बोले
ब्रह्मानंदी डुंबुन वारकरी चाले।
जयदेव जयदेव ---------------- ॥१॥

नास्तिक मत करिती श्रुतिमत उद्ध्वस्त
त्यांचे खंडन करुनि स्थापिसी वेदांत।
अज्ञानाने जगती पडल्या ज्या रुढी
मोडुनि सांगसी सर्वा ज्ञानाची प्रौढी॥
जयदेव जयदेव ---------------- ॥२॥

स्तोत्रे सुंदर रचुनी सामान्यांसाठी
भक्तिमार्गी त्यांची रुचि तू वाढविसी।
चित्तशुद्धी साधुनि पावली सन्मार्गा
सामान्यांसही ज्ञानबोध तू केला॥
जयदेव जयदेव ---------------- ॥३॥

ज्याचेपासुनि उगवे ज्ञानाचा स्रोत
गुरु त्यासी मानावे पुसू नये जात।
काशीक्षेत्री रचुनि मनीषापंचक
सर्वांसाठी केला। अद्वैत बोध॥
जयदेव जयदेव ---------------- ॥४॥

© www.madhaveeraghuveer.com

॥ ॐ ॥

# ॥ शंकरदेशिकाष्टकम् ॥

विदिताखिलशास्त्रसुधाजलधे
महितोपनिषत्कथितार्थनिधे ।
हृदये कलये विमलं चरणं
भव शंकर देशिक मे शरणम् ॥१॥

करुणावरुणालय पालय मां
भवसागरदुःखविदूनहृदम् ।
रचयाखिलदर्शनतत्त्वविदं
भव शंकर देशिक मे शरणम् ॥२॥

भवता जनता सुहिता भविता
निजबोधविचारण चारुमते ।
कलयेश्वरजीवविवेकविदं
भव शंकर देशिक मे शरणम् ॥३॥

भव एव भवानिति मे नितरां
समजायत चेतसि कौतुकिता ।
मम वारय मोहमहाजलधिं
भव शंकर देशिक मे शरणम् ॥४॥

सुकृतेऽधिकृते बहुधा भवतो
भविता पददर्शनलालसता ।
अतिदीनमिमं परिपालय मां
भव शंकर देशिक मे शरणम् ॥५॥

जगतीमवितुं कलिताकृतयो
विचरन्ति महामहसश्छलतः ।
अहिमांशुरिवात्र विभासि गुरो
भव शंकर देशिक मे शरणम् ॥

गुरुपुंगव पुंगवकेतन ते
समतामयतां न हि कोऽपि सुधीः ।
शरणागतवत्सल तत्त्वनिधे
भव शंकर देशिक मे शरणम् ॥७॥

विदिता न मया विशदैककला
न च किञ्चन काञ्चनमस्ति गुरो ।
द्रुतमेव विधेहि कृपां सहजां
भव शंकर देशिक मे शरणम् ॥८॥

इति श्रीमद् तोटकाचार्य विरचितं श्री शंकरदेशिकाष्टकं संपूर्णम् ॥

© www.madhaveeraghuveer.com

।। ॐ ।।

जगद्गुरो श्री भाष्यकार जय पूज्य पादवर्य।
ब्रह्मात्मैक्यं बोधय स्वामिन् अद्वैताचार्य।।

## श्रीमद् आद्य शंकराचार्य

इ. स. ७८८ ते ८२०

भारत वर्षाच्या प्राचीन व अर्वाचीन इतिहासात श्रीमद् आद्य शंकराचार्य हे एक थोर ज्ञानी व तत्त्वज्ञ असे व्यक्तिमत्व होऊन गेले. अखिल भारताच्या एकात्मतेची मूर्ति घडविणाऱ्या अद्वैतवादी वैदिक तत्त्वज्ञानी श्री शंकराचार्यांनी भारतखंडाच्या चारही कोपऱ्यांमध्ये वैदिक धर्माचा ध्वजा फडकवली.

वेदांच्या आधाराने आणि वेदांतसूत्रांच्या पायावर त्यांनी आपले नवीन तत्त्वज्ञान उपदेशिले. भारतात धार्मिक तटबंदी उभारण्याचे ऐतिहासिक कार्य त्यांनी करून दाखविले

पं. जवाहरलाल नेहरूंनी 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया' या ग्रंथात शंकराचार्यांबद्दल अत्यंत गौरवपूर्ण उद्गार काढले आहेत. ते म्हणतात - "आचार्यांनी नाना प्रकारच्या मतमतांतरांनी त्रस्त झालेल्या भारतीय मनाला भेदामध्ये अभेद पहाण्याची शिकवण दिली. आपल्या अद्वैत सिद्धांताच्या आधारे ही शिकवण भारतीयांच्या अंगी बाणवण्याचा त्यांनी महान प्रयत्न केला. अशा प्रकारचे कार्य साधण्यास अनेक पिढ्या खर्ची घातल्या तरी पुरे पडावयाचे नाही इतके प्रचंड कार्य आचार्यांनी आपल्या अवघ्या बत्तीस वर्षांच्या आयुष्यात साधले. त्यांच्या विचारधारेचा प्रभाव आधुनिक भारतात देखील तेवढ्याच तेजाने जाणवत आहे. ते थोर तत्त्वज्ञ, महापंडित, प्रतिभावान कवी, समाज-सुधारकांतील अग्रणी आणि चतुर संघटक होते आचार्यांनी आपले कार्य बौद्धिक, तात्त्विक आणि धार्मिक या तिन्ही स्तरांवर करून निरनिराळ्या विचार-धारांना एकसूत्रात आणण्याचा प्रयत्न केला.

© www.madhaveeraghuveer.com

॥ ॐ ॥

लोकजीवनात रूढ असलेले पंथ-भेद नष्ट करून सर्वांना ज्ञानाने मोक्ष मिळू शकतो हे पटवून दिले आणि ज्ञानोपासनेचा मार्ग दाखवून दिला.

श्री शंकराचार्यांनी उपनिषदे, गीता व ब्रह्मसूत्रे या प्रस्थानत्रयीवर भाष्य लिहिले आणि आपला अद्वैत सिध्दांत प्रस्थापित केला तेच हे शांकरभाष्य! अद्वैत म्हणजे जीव, शिव हे दोन नव्हेत, एकच आहेत. आणि ब्रह्म हे चराचर सृष्टी व्यापून राहिले आहे.

अद्वैत हेच सत्य आहे हे शंकराचार्यांनी सिध्द केले. सर्वव्यापी, निर्गुण-निराकार ब्रह्म चोहीकडे भरलेले आहे. त्याच्या शक्तीने मायामय जगत उत्पन्न झाले आहे. जीवात्मा हा त्या ब्रह्माचा अंश आहे आणि खरे ज्ञान झाल्यावर जीवात्मा त्या परमात्म्याशी एकरूप होऊन जातो.

श्लोकार्धेन प्रवक्ष्यामि यदुक्तं ग्रन्थकोटिभिः।
ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या जीवो ब्रह्मैव नापरः॥

मध्यार्जुनाच्या सभेत शिवमंदिरात आचार्यांनी हा सिध्दांत मांडला तेव्हा शिवलिंगातून स्वतः शिवशंकर प्रकट झाले व उजवा हात उभारून त्यांनी घोषणा केली. अद्वैत हेच सत्य आहे.

पुढे आचार्यांनी आसाम, उज्जयिनी, काश्मीर इ० अनेक ठिकाणी प्रवास केला. अनेक विद्वानांना वादात जिंकले. आपल्या तत्त्वज्ञानाचा प्रसार केला. त्यांचे तत्त्वज्ञान हे भौतिक सुखदुःखाच्या पलिकडे कल्पनेपलीकडे असलेल्या आनंदाचा अक्षय ठेवा आहे.

हे कार्य पुढे चालू रहावे यासाठी पश्चिमेला द्वारका, पूर्वेला जगन्नाथपुरी, उत्तरेस बद्रिकेदार व दक्षिणेला शृंगेरी अशी चार पीठे स्थापन केली कांची येथे पाचवे मध्यपीठ स्थापन केले.

© www.madhaveeraghuveer.com

पंचायतन - शिव, विष्णु, सूर्य, देवी, गणपती

संन्यासाचे दहा प्रकार - गिरी, पुरी, भारती, तीर्थ सरस्वती, आश्रम, वन अरण्य, पर्वत आणि सागर

© www.madhaveeraghuveer.com

## एकश्लोकी प्रकरण ग्रंथ
### गृह्णाति इति ग्रंथः।

किं ज्योतिस्तव भानुमानहनि मे
रात्रौ प्रदीपादिकम्।
स्यादेवं रविदीपदर्शनविधौ
किं ज्योतिराख्याहि मे।
चक्षुस्तस्य निमीलनादि समये
किं धीर्धियो दर्शने
किं तत्राहमतो भवान्परमकं
ज्योतिस्तदस्मि प्रभो॥

विनम्रभावे प्रणाम करुनि शिष्य विचारी आचार्यां
गुरुजी, आत्मा कसा कुठे तो मजलागी तुम्ही सांगा ना
किंचित हसुनि, बरे म्हणुनि, प्रश्नच करिती शिष्याला
सांग बाळ रे! विचार करुनि, प्रकाश देई कोण तुला?

दिवसा दिनकर मला दाखवी, रात्रि दिवा तो मदतीला
शिष्य देतसे उत्तर झटकरी, गुरु विचारी प्रश्न पुन्हा।
बरे असो पण, रविदीपाविण, सांग दिसे रे कसे तुला?
डोळे बघती तत्पर उत्तर, शिष्य देतसे गुरुवर्या॥

डोळे मिटता दिसे कसे तुज, गुरुजी पुसती त्यास पुन्हा
मनचक्षुने बघतो गुरुजी, अनुभव बोले शिष्याचा
प्रेमभराने गुरुजी पुसती, मनास उजळी कोण तुझ्या?
मीच अहो! हे उत्तर मिळता, गुरुजी सांगती तत्त्वाला

तूच ब्रह्म रे बाळा असशी! जिवाशिवाचा मेळ सदा
मीच ज्योति, मी प्रकाश कळले, गुरुजी तुमची थोर कृपा
बोलुनि ऐसे वंदुनि चरणे शिष्य धरीतसे निजमार्ग
आत्मबोध हा आचार्यांनी केला सुंदर अति सोपा॥

© www.madhaveeraghuveer.com

## - ॐ एकात्मता मंत्र -

यं वैदिका मन्त्रदृशः पुराणाः
इन्द्रं यमं मातरिश्वानमाहुः।
वेदान्तिनो निर्वचनीयमेकं
यं ब्रह्मशब्देन विनिर्दिशन्ति॥

शैवा यमीशं शिव इत्यवोचन्
यं वैष्णवा विष्णुरिति स्तुवन्ति।
बुद्धस्तथार्हन् इति बौद्धजैनाः
सत् श्री अकालेति च सिक्खसन्तः॥

शास्तेति केचिद् कतिचित् कुमारः
स्वामीति मातेति पितेति भक्त्या।
यं प्रार्थयन्ते जगदीशितारं
स एक एव प्रभुरद्वितीयः॥

© www.madhaveeraghuveer.com